म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९२

वंदे मातरम्

# स्वावलंबी ग्रामसंघटना

व

# चंद्रभागेच्या वाळवंटावर

म्हणजेच

गजानन नारायण कानिटकर,
संचालक, देशसेवाश्रम, पुणें,

यांची

'खेडेगांवांतील सर्वस्वावलंबी स्वराज्य'

या विषयाबद्दलची

## कैफियत आणि इतर लेख व व्याख्यानें

खर्चवेंच जाऊन उरलेली रक्कम
...कार्याकडे खर्च केली जाईल.

... आठ आणे

REFBK-0004354

प्रसिद्धीदिन

— ता. १५ ऑगस्ट १९३१ —

REFBK-0004354

सं. नि. ४७३
६।८।३२

८३५७

# स्वावलंबी ग्रामसंघटना

## १. किल्ले प्रतापगड

दास डोंगरीं रहातो । यात्रा देवाची पहातो ॥

—श्रीरामदास.

शिवजन्मोत्सवाचा तो दिवस—कांहीं कामानिमित्त महाबळेश्वरीं गेलों होतों. काम सोळा आणे झालें; परतण्याचा विचार केला; मोटार स्टँडकडेही निघालों. इतक्यांत किल्ले प्रतापगडच्या बाजूला दृष्टि गेली. मनांत एक कल्पना आली. 'गांधी-आयर्विन तह झाला आहे. कामाची पूर्वीइतकी निकड नाहीं. थोडीशी विश्रांति घ्यावयाला काय हरकत आहे? अनायासें इकडे आलों आहों. आजच्या शुभ दिवशीं प्रतापगडची यात्रा तरी करूं. खरी कर्मभूमि ती. महाराजांच्या ऐन उमेदींतला कुस्ती खेळायचा तो आखाडा. चला, एकदां चक्कर तर मारून येऊं.'

शुभस्य शीघ्रम्—मनांत येण्याचा अवकाश. त्याप्रमाणें करण्यासारखी मजा नाहीं. लगेच डब्यांत साठेबंधूंच्या बिस्किटांचे पांच सहा पुडे भरले. आणखी-ही कांहीं फराळाचें सामान बरोबर घेतलें; जामानिमा चढवला; हातांत सोटा घेतला; 'घरीं परत यायला उशीर होईल' अशा अर्थाचें एक कार्ड टपालपेटींत टाकलें व आमची स्वारी मोहिमेवर निघाली.

'धोपटमार्गा सोडुं नको' हा अनुभवसिद्ध उपदेश; पण तो ऐकला तर त्यांत 'आमचेपणा' तो काय राहिला? सरळ रस्त्यानें जावें कीं नाहीं? पण नाहीं. किल्ला समोर दिसतो आहे. चुकण्याची भीति नाहीं. मधूनच गेलों तर तास अर्धा तास लवकर जाऊं, या विचारानें आमची स्वारी मधूनच सटकली. डोक्यांत सारखा विचार चालू. समेट तर झाला. यांतून

पूर्ण स्वराज्य निघेल कां? सारखी भवति न भवति चालू होती. पहिले दोन तास हां हां म्हणतां निघून गेले. वर बघितलें; वाटलें कीं, आतां किल्ला बराच जवळ आला असेल. पण तो कसला बस्ताद! निघतांना जितका लांब दिसत होता, त्यापेक्षां अणुमात्रही कमी नाहीं. आतां कमाल झाली! मधलाच मार्ग धरण्यांत चूक तर नाहींना झाली? पण छे! 'चूक' हा शब्द आमच्या कोशांत सांपडणें अशक्य! चूक झाली अशी कल्पना मनांत येऊं दिल्याबद्दल तोंडांत मारून घेतली व पुढें चालूं लागलों.

**होतां होतां आठांचे दहा झाले**; दहाचे बारा वाजले; सूर्य डोक्यावर आला; अजून किल्ला दूरच होता. वाट चुकली. एक टेंकडी चढून वर जावें तों पुढें दुसरी आहेच! आतां मात्र धीर सुटला. पाय तक्रार करूं लागले. शेवटीं एका ओहोळावर स्नान केलें, डबा उघडला, आंतल्या पदार्थांवर ताव मारला व पुन्हां चालूं लागलों.

**अरे! पण या कानठळ्या कशानें बसल्या?** खास वाघाचीच गर्जना ती! शेजारच्या कड्यावरून हळूच खालीं डोकावलें तों काय चमत्कार! पुढें चार पांच हरणांचा लहानसा कळप वायुवेगानें धांवतो आहे व मागें एक चांगला भला मोठा पट्ट्या वाघ ताड्ताड् उड्या मारीत त्यांचा पाठलाग करतो आहे! अरे बापरे! प्रसंग तर मोठा कठीण आला. सोटा सरसावला, मनाचा हिय्या केला व उलट दिशेनें धूम ठोकली.

**परमेश्वराची लीला कळणें अशक्य**! लहानपणीं अर्ध्या मैलाच्या शर्यतीकरितां शाळेंत धांवण्याची संवय केली होती ती आतां उपयोगी पडली. तीन चार फर्लांग सारखा धांवत होतों व पुढेंही धांवलों असतों; पण करणार काय? मध्येंच विघ्न आलें. धांवतां धांवतां पाय घसरून नेमका एका खोलगटांत जाऊन पडलों. खालीं किती मिनिटें पडत होतों तें कळलें नाहीं. शेवटीं धाडदिशीं जमिनीवर आपटलों. डोळे उघडून पहातों तों भोंवतालीं कांहींच दिसेना. बरोबर विजेची टॉर्च आणिली होती म्हणून बरें झालें. कळ दाबली. त्याबरोबर बत्तीच्या प्रकाशानें सर्व जागा स्पष्ट दिसली. मी एका प्रचंड गुहेमध्यें अचानक येऊन पडलों आहें ही गोष्ट माझ्या लक्षांत आली. पण बाहेर पडण्याचा मार्ग कोठेंच दिसेना. टॉर्च हातांत घेतली व सभोंवार फिरवली. मधोमध बलभीमाची एक प्रचंड मूर्ति दिसली.

तिच्यासमोर सुमारें एक फूट उंचीची लांबट आकाराची एक विस्तीर्ण शिळा पडली होती. एका कोंपऱ्यांत स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याचें एक लहानसें टांकें होतें. पाणी इतकें स्वच्छ होतें कीं, तळाशीं स्वच्छंदानें विहार करीत असलेले लहानमोठे मासे डोळ्यांना स्पष्ट दिसत होते. दुसऱ्या कोंपऱ्यांत भिंतीला उभ्या केलेल्या जुन्या काळच्या एकदोन तरवारी दिसल्या. म्यानें खराब झालेलीं होतीं. आंतील पातीं मात्र जशींच्या तशीं पांढरीं स्वच्छ असून त्यांची धारही कायम होती.

**मनांत विचारांचें काहूर उठलें.** आपण आलों कोठें? हा प्रकार आहे तरी काय? बाहेर पडायला मार्ग कसा सांपडणार? व ही गुहा कोणाची? वगैरे अनेक बऱ्यावाईट कल्पना मनांत आल्या. **शिवकालीं** तपश्चर्येकरितां **समर्थांनीं** अशा अनेक प्रकारच्या गुंफा तयार करविल्या होत्या ह्या दंतकथेची आठवण झाली. त्या गुंफांपैकीं तर ही एक नसेलना? खास असली पाहिजे. हा विचार मनांत येतांच शरीर थरारुन गेलें; अंगावर रोमांच उभे राहिले; अष्ट सात्त्विक भावांनीं मनावर मोहिनी टाकिली; शिळेवर बसल्या जागींच लवंडलों; पुढें काय झालें तें कळलें नाहीं. '**दास डोंगरीं रहातो। यात्रा देवाची पाहतो॥**' हे शब्द कोणी तरी कानांत गुणगुणल्याचा भास मात्र झाला.

---

# २. तीन शतकांपूर्वीं

'आम्ही वैकुंठवासी। आलों याचि कारणासी।
बोलिले जे ऋषी। साच भावें वर्ताया॥'

— श्रीतुकाराम.

**सरासरी तीन तास निघून गेले असावेत.** कोणीतरी थंडगार पाणी अंगावर शिंपडल्याचा भास झाला; खडबडून जागा झालों. पिशवींतला लोटा आणि दोरी काढली. टाक्यांतून पाणी काढून मुखप्रक्षालन केलें. परत फिरलों; शिळेवर मारुतिरायाच्या मूर्तीला साष्टांग नमस्कार घातला व

पुढील प्रार्थना केली; ‘ **बजरंगा** ! किती अंत पहाणार ? **अवतार घे.** तीन शतकांपूर्वी **समर्थांच्या** रूपानें महाराष्ट्रास दर्शन दिलेंस. जागोजाग मठ-स्थापना करून **आनंदवनभुवनाला** त्यांनीं कृतकृत्य केलें. आर्यसंस्कृतीवरील संकटांपासून तिचें रक्षण झालें. **हनुमंता** ! आज कां निद्रा घेतलीस ? विसाव्या शतकानेंच काय पाप केलें आहे ? केलेल्या अपराधांची क्षमा कर. **महाराष्ट्रावर** पुन्हां आपल्या कृपेची छाया पाड. युवकांत आज नवचैतन्य उत्पन्न झालें आहे; त्यांना मार्ग दाखीव. ’ अशा अर्थाची दहापांच मिनिटें तरी मीं मनोभावानें प्रार्थना केली व शिळेवर उठून उभा राहिलों, तों काय चमत्कार वर्णावा ! समोरील **बजरंगाची** मूर्ति कोठेंच दिसेना ! त्या ठिकाणीं विलक्षण तेज तळपत होतें. डोळे दिपून गेले. थोड्या वेळानें त्या तेजोवलया-च्या आंत अत्यंत शोभायमान अशी एक सुंदर मूर्ति दिसली. तिचे ओंठ हलूं लागल्याचा भास झाला. पुढील शब्द कानीं आले—‘ बाळा ! शांत हो. खालीं बैस. पूर्वसंचिताचा हा खेळ आहे ! पूर्वपुण्याईनें तुला आज येथें आणिलें आहे. सावधान चित्तानें मी काय म्हणतों तें ऐक. शुद्ध बुद्धीनें केलेली प्रार्थना कधींही वांया जात नाहीं; हा अनादि कालचा सिद्धांत आहे; तुझ्या प्रार्थनेनें मला या ठिकाणीं खेंचून आणिलें. हिमगिरीपलीकडे **श्वेतद्वीपांत शंभलग्रामीं रघुरायाच्या** सेवेंत आम्हीं निमग्न होतों. इकडे यावें लागलें. वत्सा ! काय तुझें म्हणणें आहे ? ’

पुन्हां मीं **मूर्तीकडे नजर टाकिली**. ओळख पटली. छे ! शंकाच नाहीं. **समर्थांची**च मूर्ति ती ! हात जोडले व म्हटलें, ‘ **महाराज** ! **दयानिधे** ! **गुरुवर्य** ! आज आर्यसंस्कृतीवर पुन्हां पाश्चिमेकडून गंडांतर आलेलें आहे. अनेक आपत्तींमधून **भरतभूमि** निभावली; पण आजची आपत्ति जबरदस्त आहे. उपाय सांगावा; मार्ग दाखवावा. जगाला शांतीची जरूरी आहे. अखिल जगताचे डोळे **हिंदभूकडे** लागले आहेत. या भूमींतील **महात्म्याकडून** शांतिब्रह्माचा संदेश केव्हां मिळेल याची चारी खंडें चातकपक्ष्याप्रमाणें वाट पहात आहेत. **महात्मा** म्हणतो, ‘ परतंत्र **भारत** जगताचें गुरुस्थान घेऊं शकत नाहीं. प्रथम तें स्वतंत्र झालें पाहिजे. ’ हें स्वातंत्र्य **आर्यावर्ताला** केव्हां मिळेल ? पूर्ण स्वराज्याची स्थापना या पुण्यभूमींत केव्हां होईल ? बोला, **गुरुवर्य** ! बोला ! ’

मर्तीनें स्मित केलें व पुढील शब्द उच्चारिले, ' बेटा! तीनशें वर्षांपूर्वी हाच प्रश्न आमच्यापुढें होता. हिंदुस्थानांत सर्वत्र मठस्थापना करून आम्हीं तो सोडविण्याचा प्रयत्न केला. तात्पुरतें यश आलें. आजचा काळ अत्यंत भिन्न आहे. प्रचंड प्रयत्न करावा लागेल. यश आल्याशिवाय रहाणार नाहीं. परमेश्वरी संकेतच तसा आहे. '

' गुरुजी! कार्याचें दिग्दर्शन कराल काय? आपल्या आज्ञेच्या बाहेर तिळमात्रही हें बालक जाणार नाहीं; विश्वास ठेवावा. ' मी म्हणालों.

स्वामी म्हणाले, ' वत्सा! त्याबद्दल अणुमात्रही शंका नाहीं. सावधान चित्तानें श्रवण कर.'

---

## ३. जगदंबेची भूक

ईश्वरस्सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन! तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥

—भगवान् श्रीकृष्ण.

महाराज म्हणाले, ' बाळा! पूर्ण स्वराज्याची स्थापना करण्याची तुम्ही गोष्ट बोलतां; हेतु चांगला आहे. कर्म मात्र महाकठीण आहे. बाबा! अजून कशाला कांहीं पत्ता नाहीं. इतर गोष्टी सोडून देऊं; पण या भरतखंडांत सात लक्ष खेडीं आहेत. त्यांची स्थिति आज काय आहे, याचा तुम्हीं विचार केलात काय? फुकट तोंडाची वाफ दवडण्यांत काय अर्थ? अरे! या सात लक्ष खेड्यांचीही गोष्ट बाजूला राहूं दे. तुझा महन्महाराष्ट्रच घे. वर नर्मदा; खालीं तुंगभद्रा; एका बाजूला हिंदी महासागर व दुसरीकडे पूर्व समुद्र. या मर्यादांमधील अफाट प्रदेशाची आज काय स्थिति आहे? त्यांत जवळजवळ पन्नास हजारांवर खेडीं आहेत. त्यांची संघटना झाल्याशिवाय स्वातंत्र्यदेवता तुम्हांला दर्शन देईल काय? गोष्टच अशक्य! ती जगदंबा इतकी अल्पसंतुष्ट खास नाहीं. खुळ्या! तिची भूक फार मोठी आहे. तिचें समाधान होण्याकरितां ती महामाया तुझ्या देशांतील सहस्रावधि तरण्याबांड

युवकांच्या बलिदानाची आज मुक्तकंठानें मागणी करीत आहे. वत्सा! एकच गोष्ट विचारतों. अरे! धर्माच्या नांवाखालीं तुम्ही लोकांनीं आज काय काय अनाचार मांडले आहेत? देशांत कोट्यवधि लोक अर्धपोटीं असतांना भारतांतील चारी वर्णांना आज त्यांची दाद कशी नाहीं? सात कोटि बांधव बहिष्कृत आहेत! गाईगुरांच्या चरबीनें माखलेल्या सुताचे कपडे घालून तुम्ही भजन करितां, क्षेत्रांच्या वाऱ्या करितां, पांडुरंग कसा प्रसन्न होणार?'

स्वामींच्या या शब्दांनीं काळजाला घरें पाडलीं. मनाला खेद झाला. उद्वेगाच्या भरांत मी बोलून गेलों: 'भगवन्! असें कसें म्हणूं शकतां? गेल्या शंभर वर्षांत भारतसंतानांनीं मातृभूमीकरितां कांहींच कां त्याग केला नाहीं? दत्त, दादाभाई, बानर्जी, तय्यबजी, रानडे, टिळक, आगरकर, गोखले, गांधी......'

महाराज मध्येंच म्हणाले, 'थांब, थांब, उतावळा होऊं नकोस. या महापुरुषांची सेवा महाविष्णूच्या दरबारीं रुजू आहे. पण वेड्या! स्वातंत्र्य ही मंडईतील तीन दमड्यांची कोथिंबीर खास नाहीं. इतिहासाला विचार. त्या देवीच्या मनाची शांति करण्याकरितां गतकालांत रक्ताच्या नद्या लोटल्या आहेत. सोनपतपानपत कसें विसरलास? जगताच्या नशिबानें शांति-ब्रह्माचा उपदेश करणारा मदंशभूत महात्मा आज भारतांत अवतीर्ण झालेला आहे यावर जाऊं नकोस. याच्या अमदानींत भारतसंतानांना अहिंसाव्रत तंतोतंत पाळूनही कदाचित् हजारोंनीं स्वत:चें बलिदान करावें लागले. जिवंत फांशी—जिवंत मरण—पत्करावें लागेल. ग्रामसंघटनेच्या पवित्र स्थंडिलावर अगणित युवकांच्या आहुत्या पडल्याखेरीज त्या जगन्मातेची तृप्ति होईल, असें तुला वाटतें काय?'

स्वामींचें म्हणणें मला थोडेंसें पटलें. मीं प्रश्न केला, 'स्वामिन्! भविष्यकालीन कार्याचें दिग्दर्शन करावें अशी चरणांजवळ प्रार्थना आहे.'

स्वामींनीं प्रेमानें परिपूर्ण अशी दृष्टि मजकडे टाकिली. जणूं काय अमृताचाच वर्षाव होत आहे, असा मला भास झाला. ते म्हणाले, 'गेल्या पांच-पन्नास वर्षांत भारतांत विलक्षण विचारक्रांति झाली यांत शंका नाहीं. आपलें स्वातंत्र्य हें दुसऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून नसून सर्वस्वीं आपल्या हातांत आहे, या भावनेचा जनतेच्या मनांत बलवत्तर प्रादुर्भाव झाला आहे

हें खास. परमेश्वराच्या कृपेवांचून आपलें कार्य होणें नाहीं, असेंही अनेक बोलूं लागले आहेत; पण काय करावें? परमेश्वराविषयीं यथार्थ कल्पनाच अजून लोकांना नाहीं. तो जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं भरून उरलेला आहे; स्थावरजंगम विश्व हें त्याचें बाह्यस्वरूप आहे; किंबहुना या विश्वांतील यच्चयावत् प्राणिमात्र त्याचींच स्वरूपें आहेत. यांची—या दरिद्रनारायणांची—सेवा केली तरच ती परमेश्वरास पावते, या तत्त्वाचा आत्मसाक्षात्कार ज्या दिवशीं भारतीयांना होईल, त्याच दिवशीं भरतखंडाच्या स्वातंत्र्ययुगाला सुरुवात झाली असें समज. एक गोष्ट खरी कीं, या लक्षावधि ग्रामदेवता व त्यांच्या सान्निध्यांत राहणारे कोट्यवधि दरिद्रनारायण यांच्या आक्रोशानें आर्यावर्तांतील अनेक व्यक्तींचीं व संस्थांचीं चित्तें वेधलेलीं आहेत. ठिकठिकाणीं या बाबतींत लहानमोठे प्रयत्नही सुरू झाले आहेत, होत आहेत अगर होण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. पण काय सांगूं तुला! ग्रामसंघटना म्हणजे काय? ती कशी व कोणीं करावी? तिला लागणाऱ्या पैशाचा पुरवठा कोठून व कसा व्हावा, या गोष्टींची निश्चित कल्पना फारच थोड्या लोकांना आहे!'

'तर मग आपण याबद्दलचा सविस्तर खुलासा कराच.' मी लगेंच उद्गारलों. स्वामी पुन्हां हंसले व म्हणाले, 'हां! हां! जरा थांब; अशी घाई करूं नकोस. बाबारे! त्यासाठींच तर रघुरायाचे चरण सोडून मी आज या ठिकाणीं आलों आहें. तेहतीस कोटि बंदिस्थ देवतांना मुक्त करणाऱ्या दाशरथी रामचंद्राची मला तशीच आज्ञा आहे. त्या कार्याला सुरुवात करण्यापूर्वी आपण दोघेही बुद्धिमंतांमध्यें वरिष्ठ व शक्तिमानांमध्यें श्रेष्ठ अशा जितेंद्रिय बजरंगबलीचें क्षणभर स्मरण करूं या. तोच आपल्याला शक्ति देईल, बुद्धि सांगेल व युक्ति शिकवील.'

समर्थांनीं समाधि लाविली. मीहि नेत्र मिटून हनुमंताचा धांवा करूं लागलों.



## ४. मांजराच्या गळ्यांतील घंटा

‘ बोलाचीच कढी बोलाचाच भात। जेवुनियां तृप्त कोण झाला।। ’

—श्रीतुकाराम.

मी एकदम दचकलों. डोळे उघडले. पहातों तों स्वामी पूर्वीपेक्षांही शतपटीनें जास्त देदीप्यमान अशा तेजानें तळपत असलेले मला दिसले. त्यांनीं प्रचंड असा भुभुःकार केला. मी दचकण्याचें हेंच कारण.

महाराज हंसले व म्हणाले—‘ बेटा! घाबरूं नकोस. रामावतारीं घेतलेल्या भूमिकेचें मधूनमधून स्मरण होतें. असो. आपण आपल्या मार्गाला लागूं या. प्रश्न असा कीं, ग्रामसंघटना म्हणजे काय? या मुद्याच्या प्रश्नावर आजपर्यंत कित्येक रणें माजलेलीं आहेत. निकाल केव्हां लागेल भगवंताला माहीत! या बाबतींत ‘ मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला।। ’ हा मामला आमचे वेळींही होता. आजही तोच प्रकार चालू आहे. ’

‘ कित्येकांच्या मतें उठावें, खेडेगांवांत जावें, चार व्याख्यानें द्यावींत, परकीय राज्यकर्त्यांना सर्वस्वीं दोषी ठरवून देशाच्या हलाखीची सर्व जबाबदारी त्यांच्या माथीं मारावी व खेडवळांत प्रखर असंतोष उत्पन्न करावा म्हणजे ग्रामसंघटनेचें बरेंचसें कार्य उरकेल. ‘ रुसावें, फुगावें आपुलियावरि। उरला तो हरि सकळही।। ’ ही वृत्ति कोठेंच फारशी दिसून येत नाहीं. सर्वत्र बहिर्मुख कारभार! ’

‘ हा एक प्रकार झाला. दुसऱ्या कांहींच्या मतानें साक्षरता म्हणजे परब्रह्म! तिची खेडेगांवांत पाद्यपूजा होऊन एकदांची प्रतिष्ठापना झाली, कीं काम फत्ते! यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें खेडेगांवांतील आजच्या नरकाचें–निरयगतीचें–नंदनवन बनण्यास फारसा अवधि लागणार नाहीं. सर्व अनर्थांच्या मुळाशीं निरक्षरता! भेटेल त्या रोग्याला सोनामुखीचा काढा देण्यांतलाच हा प्रकार! ’

‘ अशा अनेकांच्या अनेक कल्पना आहेत. कोणी गोरक्षणाच्या पाठीमागें आहेत. कोणी सहकारी पतपेढ्या स्थापन करीत आहेत. कोणी

तालमी उघडण्यांत निमग्न आहेत, तर कोणी हातांत टकळी व खांद्यावर खादीचे तागे घेऊन गांवोगांव भटकत आहेत. बेबी वुइक, शेतकी प्रदर्शनें, मोफत वाचनालयें, ग्रंथसंग्रह वगैरेंची धामधूम मारे जिकडेतिकडे चालली आहे. अर्थात् यांतील एकही गोष्ट अशी नाहीं कीं, जी देशहिताला बाधक आहे. यांपैकीं प्रत्येकींत उपयुक्ततेचा थोडथोडा अंश आहे.'

'मग आपलें म्हणणें काय? महाराज! आपलें म्हणणें तरी काय?' मीं प्रश्न टाकला.

'सांगतों, ऐक. माझ्या मतानें या गोष्टींपैकीं कोणतीही एक गोष्ट एकटी ग्रामसंघटनेचें कार्य पूर्णपणें तडीस नेण्यास समर्थ होणार नाहीं. **ह्या सर्व गोष्टींची व्यवस्था एकसमयावच्छेदेंकरून, साकल्यानें, कायमची कल्पनेंतून प्रत्यक्षांत आणणें म्हणजेच ग्रामसंघटना.**' **स्वामींनीं** उत्तर दिलें व ते पुढें म्हणाले—

'असें पहा कीं, खेडेगांवांत अगर शहरांत असंतोष पसरविण्याचे बाबतींत फारशी दगदग घेण्याची आज जरूरी आहेच असें नाहीं. कोठेंही असा एखादा हरीचा लाल मला दाखवशील कां कीं, ज्याला परराज्याबद्दल मनापासून प्रेम वाटत आहे. अरे! भूक व उपासमार हे असंतोषाचे असे कांहीं जबरदस्त प्रचारक आहेत कीं, त्यांच्या कार्यापुढें मोठा **सुरेंद्रनाथ बानर्जी** आणलास तरीही त्याचें वक्तृत्व कुचकामाचेंच ठरेल. फ्रेंच राज्यक्रांति कोणीं घडवून आणिली? सर्व **फ्रान्स** देशाला श्रीमंतांच्या रक्तानें कोणीं न्हाऊं घातलें? **पॅरिस**लगतच्या **सीन** नदीचें काळेभोर पाणी तांबडेंलाल कोणीं केलें? याच पराक्रमी प्रचारकांनीं.'

'**हीच स्थिति साक्षरताप्रसाराची.** त्यानें कार्य होईल असें म्हणावें तों अनेक साक्षर विद्वान् देशकार्याबद्दल उदासीन असलेले आपणांस आढळून येतात! फार कशाला? एवढ्यावरही ते थांबत नाहींत! विश्वविद्यालयाच्या पदव्यांनीं मंडित अशा कित्येक पंडितांनीं देशाचा द्रोह करून महत्पुण्य संपादन केल्याचींही उदाहरणें नाहींत काय? माझ्या वेळींही हीच स्थिति होती. अतएव नुसता साक्षरताप्रसार तुमच्या पदरांत इष्ट फळ टाकील ही समजूत खोटी!'

'तोच प्रकार इतर गोष्टींचा. सहकारी पेढ्यांनीं कित्येक ठिकाणीं अनर्थ केल्याचे दाखले आहेत. गोरक्षणाचे कार्यासाठीं गल्लोगल्लीं भिक्षा मागत फिरणारी मंडळीही कांहीं थोडी का आहेत ? तरीही हमरस्त्यावरून गाई-बैलांचे तांडेच्या तांडे वांद्र्याच्या रस्त्यानें चाललेले अजूनही दिसतात ! बाळकृष्णबोवा चौंडयांनीं यत्नाची शर्थ केली तरीही वांद्रें बंद पडत नाहीं. गेल्या दहा वर्षांत खादीची उत्पत्ति चाळीस लाखांच्यावर गेलेली नाहीं; तोच मामला शेतीसुधारणेचा. तात्पर्य, या सर्व गोष्टींचा प्रश्न खेडेगांवांत यशस्वी रीतीनें सोडविण्यासाठीं पुढाऱ्यांनीं कांहीं विशेष योजना अगर युक्ति काढल्याशिवाय ग्रामसंघटनेचा—म्हणजेच—स्वराज्याचा प्रश्न निकालांत निघणें नाहीं; कळलें माझें म्हणणें काय तें ? '

' पटलें. बरोबर पटलें. मांजराच्या गळ्यांत घांट बांधल्याशिवाय उंदराचा तरणोपाय नाहीं ही गोष्ट ठरली. पुढचा प्रश्न, ही घंटा मांजराच्या गळ्यांत बांधावयाची कोणीं ? ' मी म्हणालों.

महाराज म्हणाले—' सांगतों. तेंच आतां सांगतों. '

---

## ५. फुकट फौजदार व लष्करच्या भाकरी !

' प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण ॥ '

—श्रीरामदास.

स्वामी म्हणाले, ' सतराव्या शतकांत मला जो अनुभव आला त्याचा आजही उपयोग करून घेणें अत्यंत जरूरीचें आहे. त्या वेळींही ' म्लेंछ दुर्जन उदंड । बहुतां दिसांचें माजलें बंड ॥ ' असा प्रकार होता. परमप्रतापी क्षत्रिय-कुलावतंस शिवरायानें या बंडाचा बींमोड करण्याकरितां जिवापाड खटपट चालविलेली होती. त्याचा सार्वजनिक प्रपंच निर्वेधपणानें चालण्यासाठीं जरूर ती पार्श्वभूमिका राष्ट्रामध्यें निर्माण केल्यावांचून गत्यंतर नव्हतें. तुकाराम-महाराजांचा यासाठींच अवतार होता. ' सांगणें नलगे; सर्वज्ञ तूं

राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ।। ' असा उपदेश शिवाजी-राजांना करून त्यांनीं आपला देह ठेविला. याच उद्देशानें मी मालकाच्या हुकुमानें या कर्मभूमीवर अवतीर्ण झालों; बारान् बारा चोवीस वर्षे तपश्चर्या केली; स्वतंत्र सांप्रदायाची स्थापना केली; रामकथेचा सर्वत्र प्रसार करून तिचें रहस्य जगताच्या मनोभूमिकेवर बिंबविण्याची पराकाष्ठा केली. ' ब्रह्मगोळ अवघा भरावा । श्रीरामदास्यें ।। ' या ध्येयाचा सांप्रदायिकांस उपदेश केला. त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें व्हावयाचें तें कार्य होऊन गेलें. ग्रामसंघटनेचा प्रश्न यशस्वी रीतीनें सोडविणें असेल तर आजही हल्लींच्या मनूला अनुसरून व योग्य तो फेरफार करून त्याच मार्गाचें अवलंबन करणें जरूर आहे. '

' पहिला सिद्धांत हा कीं, फुरसतीअंतीं देशकार्याचे दिवस आतां राहिले नाहींत, हें प्रत्येक कार्यकर्त्यानें लक्षांत ठेविलें पाहिजे. या कार्याला चोवीस तास वाहिलेले कार्यकर्ते असतील तरच तें कार्य सुव्यवस्थित व परिणामकारक रीतीनें होईल. आरामखुर्चीचें राजकारण यापुढें परवडणार नाहीं. ' मी आपला उद्योग करीन व फुरसतीचे वेळीं राष्ट्राच्या कार्याकडे पाहीन ' हा दंडक भारतांत कांहीं दिवस चालला. यापुढें चालणार नाहीं. काम होणार नाहीं, कदाचित् झालेलें काम नासेलही. म्हणून ज्यांना पोटाची विवंचना नाहीं, अतएव चोवीसचे चोवीस तास ज्यांना राष्ट्रकार्याकडे देणें शक्य आहे, असेच कार्यकर्ते या कार्यासाठीं असले पाहिजेत व ते पगारी असले पाहि-जेत हें तत्त्व केव्हांही विसरून चालावयाचें नाहीं. घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याची पाळी त्यांचेवरतीं येतां कामा नये. पगारी मनुष्य असल्यास जितक्या जबाबदारीनें कामें होतात, तशीं एकादा एकांडा फुकट फौजदार करूं शकत नाहीं. '

' एक प्रश्न विचारूं का ?' मीं मध्येंच विचारलें. ' महाराज ! सत-राव्या शतकांत आपले शिष्य पगारी असल्याचें इतिहास तर सांगत नाहीं. ' ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । ' ओम् भवति ' या पक्षा । रक्षिलें पाहिजे ।। ' हा दंडक त्यांस घालून देऊन भिक्षांदेहीचें व्रत आपण त्यांच्या गळ्यांत अडकविलें होतें, असेंच आपला दासबोध सांगतो. '

**स्वामींना हंसूं आवरेना.** ते म्हणाले, 'वाः! आमच्या तंगड्या आमच्याच गळ्यांत नामी अडकविल्यास! वत्सा! तुझी शंका योग्य आहे. पण एक गोष्ट तूं विसरलास. हल्लींची परिस्थिति व त्या वेळची परिस्थिति यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. त्या वेळच्या महाराष्ट्रापुढें पोटा-पाण्याचा प्रश्न आजच्यासारखा अत्यंत तीव्र व प्रखर स्वरूपांत नव्हता. आनंदवनभुवनांत त्या वेळीं धनधान्यादिकांची पूर्ण रेलचेल होती. बळीराजाचा वंशज त्या वेळीं हल्लींप्रमाणें मनुष्यकोटींतून जवळजवळ पशुकोटींत गेलेला नव्हता. त्यामुळें एक मूठ भिक्षा मागितली असतां ती दहा मुठी मिळत असे. 'दहा मुठी कोणीं आणिली तर एकच घेत जा' असा निर्बंध मला त्या वेळीं घालून द्यावा लागला. तो काळ आज राहिला नाहीं. आज खेड्यांतील शेतकऱ्यालाच जेथें दुपारची भ्रांत येऊन पडली आहे, तेथें तो इतरांना काय भिक्षा घालणार? ही एक गोष्ट आणि तात्त्विक दृष्ट्याही मला ती गोष्ट हल्लींच्या मनूंत अयोग्य, अतएव त्याज्य वाटूं लागली आहे. तुकोबा-रायांनीं '**भिक्षापात्र अवलंबिणें। जळो जिणें लाजिरवाणें।**' असें म्हटलें तेंच खरें. कारण असें पहा कीं, माझ्या सांप्रदायांत आज जे लोक आहेत त्यांना ती एक प्रकारची कायमची जहागीरच होऊन बसली आहे. रंगित छाटी अंगावर चढवावी, हातांत कुबडी घ्यावी, सकाळीं तास दोन तास हिंडावें, माझ्या नांवानें चार दोन श्लोक म्हणावेत, भली मोठी झोळी धान्यानें भरून घरीं आणावी, घरच्या माणसांसह यथेच्छ पुरखा झोडावा व उरलेल्या वेळांत वाटेल ते वेडेवांकडे प्रकार व धंदे करावेत. हा खाक्या आज अनेक ठिकाणीं चाललेला आढळून येतो. कोणाचेंही नियंत्रण नाहीं. कोणालाही ते जबाबदार नाहींत. यापुढें तरी नवीन कार्यकर्त्यांनीं असा प्रकार करूं नये ही इच्छा.'

# ६. सर्वच त्याचे यजमान

न्याय असा जगतीं । पहा कीं ॥
चाकरा मलीदा, मिळे धन्याला धत्तूरा हातीं ॥
—कै. सदाशिवराव लवाटे.

'आणखी कोणकोणते गुण कार्यकर्त्याचे अंगीं असले पाहिजेत?' मी विचारता झालों.

स्वामी कांहीं वेळ सचिंत बसले व म्हणाले, 'कार्यकर्ता पगारी असून चोवीस तास त्या कार्यास वाहिलेला असला पाहिजे; बिनपगारी स्वयंसेवकांच्या हातून प्रमुखाला मोजकें काम घेतां येत नाहीं व स्वयंसेवकालाही कार्याची तितकी जबाबदारी वाटत नाहीं ही गोष्ट जितकी सत्य आहे तितकीच दुसरीही गोष्ट महत्त्वाची आहे. कार्यकर्ता नेमून दिलेल्या कार्यांत पूर्णपणें निष्णात असला पाहिजे. तो मुंबई विश्वविद्यालयाचा पदवीधर नसला तरी चालेल; पण व्यवहाराच्या युनिव्हर्सिटीची पदवी मात्र त्याला मिळालेली असली पाहिजे. 'घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहूनि जाड ॥' हें त्याच्या जीवनकलेचें रहस्य असावें. खेडेगांवांत सशास्त्रपद्धतीनें संघटना व्हावी अशी इच्छा असेल तर ग्रामसंघटनेचीं जेवढीं अंगें व उपांगें आहेत त्यांत तो पारंगत असला पाहिजे.'

'(१) थोडक्या श्रमांत व वेळांत लोकांस लेखन, वाचन व जमाखर्च इत्यादि रोजच्या व्यवहारांत लागणाऱ्या गोष्टी शिकविण्याची कला त्यास अवगत असली पाहिजे.'

'(२) 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।' हें वचन जगन्मान्यच आहे. अर्थात् अज्ञान व उपासमार यांपासून होणाऱ्या खेडवळ रोगांना कोणतीं औषधें कशीं द्यावीं ही माहिती त्यास असली पाहिजे. खेडेगांवांत नारू, हिंवताप, खोकला, क्वचित् प्रसंगीं महामारी, डोकेंदुखी वगैरे रोग सामान्यतः आढळून येतात. क्षयादि श्रीमंती रोग शहरांनीं आपल्याकडे घेतलेले आहेत. प्रथम उल्लेखिलेल्या रोगांचें निदान करून त्यांच्यावर औषधयोजना करण्याइतकें ज्ञान कार्यकर्त्याला असलें म्हणजे झालें.'

'(३) 'मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण। तिसरें तें सावधपण। सर्वविषयीं ॥ ही माझी सतराव्या शतकांतील कार्यकर्त्याच्या लायकीची कसोटी होती. आजही ती कायम आहे. स्वामी रामतीर्थांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे रोख व्यवहारधर्म, पौर्वात्य संस्कृतींचें रहस्य, पूर्वजांचा मोठेपणा, प्रचलित राजकारण, खादीचें अर्थशास्त्र वगैरे विषयांबद्दल आपले विचार लोकांना पटविण्याची हातोटी त्यास साधलेली असली पाहिजे. 'शहाणे करावे जन। पतित करावे पावन। सृष्टीमध्यें भगवद्भजन। वाढवावें ॥' हा त्याच्या प्रपंचयात्रेचा मूलमंत्र असावा.'

'(४) शेतकरी म्हणजेच हिंदी राष्ट्र. दैवदुर्विपाकानें तो आज मनुष्यत्वालाही पारखा झाल्यासारिखा आहे; राष्ट्रीयत्वाची गोष्टच बोलण्याची सोय नाहीं. कान असून तो ऐकूं शकत नाहीं, डोळे असून पाहूं शकत नाहीं व तोंड असून बोलूं शकत नाहीं. त्याचीं यच्चयावत् इंद्रियें शिथिल झालीं आहेत. गात्रें थंडगार पडलीं आहेत. शारीरिक, बौद्धिक, नैतिक व आर्थिक अर्धांगवायूनें त्यास झपाटलें आहे. यमधर्माचे पाश त्याच्या गळ्यांत पडलेले आहेत. मृत्यु त्याच्यापासून फारसा दूर नाहीं. हिंदी राष्ट्राचे आपण एक घटक आहोंत; तस्मात् हिंदवी स्वराज्याबद्दल आपलें कांहीं कर्तव्य आहे, या भावनेला तो पराङ्मुख झालेला आहे. इतकेंच नव्हे, तर आपण मनुष्य प्राणी आहोंत याचेंही त्या बिचाऱ्याला भान राहिलें नाहीं. तो बसेल तेथेंच थुंकतो; वाटेल तेथें शौच करतो; घाणेरडें पाणी पितो; पुरेसा प्रकाश व हवा नसलेल्या पडक्या घरांत राहतो. यःकश्चित् कारणावरून भावाबंदाशीं तंटा करून कोर्टाची पायरी चढतो; वकिलांचे उंबरठे झिजवितो व घरांदारांवरून गाढवाचे नांगर फिरवून घेतो. बापड्याला पत्रही वाचतां अगर लिहितां येत नाहीं; फार कशाला? स्वतःची सहीही करितां येत नाहीं. वाटेल त्यानें यावें व त्यास टांग-मारावी; पांच रुपये द्यावेत व पन्नास रुपये लिहून घ्यावेत. त्याची व त्याच्या बायकापोरांची अब्रू घ्यावी; त्या बिचाऱ्याला या सर्व गोष्टी सहन कराव्या लागतात. त्याच्या गोठ्यांत पूर्वींइतके गाईबैल दिसत नाहींत. बहुतेकांनीं केव्हांच कसाईखाना पाहिलेला आहे. त्याच्या पोराबाळांना दुधाचा अगर तुपाचा टांकही भेटत नाहीं. डोळ्यांत तेज कोठून उरणार? त्यांचे गाल खोल गेले आहेत. पोट खपाटीं जाऊन उराड्याचें खुराडें झालें आहे. गुरें

विकलीं जाऊन खाटिकखान्यांत गेलीं म्हणून शेतांत शेण पडत नाहीं. त्यामुळें जमिनींतला कस गेल्यास नवल तें काय? ती पूर्वीइतकें पीक देत नाहीं. बांधबंधारे व ताली मोडून अगर वाहून गेल्या व जमिनींत खांच-खळगे पडले; अर्थात् जमिनीचें फूल पावसाच्या पाण्याबरोबर दरसाल वाहून जाणारच; जमिनींत ओल रहात नाहीं; भरपूर पीक येत नाहीं. पट्टीसाठीं तलाठ्याचा तगादा लागलेला. उंबऱ्यांत महार अगर पठाण धरणें धरून बसलेला. कमरेच्या कशांत दांतावर हाणायलाही शिबराई नाहीं. गाडीभर धान्य विकावें तेव्हां हल्लींच्या स्वस्ताईत दीडदोन रुपये दिसतात; मग पट्टी देणार कोठून? पिकावर रोग पडला तर विचारावयाचें कोणाला अशी पंचाईत पडते. अंथरूण बघून पाय पसरण्याचें महत्त्व त्यास कळत नाहीं. येईल ती जमा व होईल तो खर्च, हा त्याच्या संसाराचा हिशेब असतो. सुबत्तेच्या काळांत चार पैसे हातीं आले कीं, कपडेलत्ते, लग्नकार्यें इत्यादि गोष्टींत तो भरमसाट खर्च करतो. एरव्हींच्या काळांत चिंध्या पांघरणें व विलायती मांजर-पाट आंगावर घालणें यांत त्याला कांहींच कमीपणा वाटत नाहीं. सावकार पाहणें ही गोष्ट शौचमुखमार्जनादि नित्यविधीइतकीच त्याच्या आंगवळणीं पडलेली आहे. सरकारला कोट्यवधि रुपये पट्टी भरणारा शेतकरी हा मालक असून बारा रुपयांच्या पट्टेवाल्यापासून तों हजारों रुपये खिशांत टाकणारे कलेक्टरकमिशनरादि लहानमोठे अधिकारी हे त्याचे नोकर आहेत; त्याचा प्रपंच नीट चालला नाहीं तर त्याबद्दलचा जाब या नोकर-शाहीला विचारण्याचा त्याला जन्मसिद्ध हक्क आहे, ही गोष्ट त्याच्या गांवींही नसते. त्याच्याच पैशांतून चाललेल्या शिक्षण, आरोग्य, न्यायदान व शेतकी वगैरे अनेक सरकारी खात्यांचा फायदा त्याला मिळूं शकत नाहीं. या सर्व आपत्तींतून शेतकऱ्याची सुटका करणें व बळीचा वंशज व जगाचा पोशिंदा असा जो तो त्याचा प्रपंच पुन्हां पूर्ववत् गुटगुटीत करणें याचेंच नांव ग्राम-संघटना. ही घडवून आणण्यास जरूर तें सर्व व्यावहारिक ज्ञान खेडेगांवांतील कार्यकर्त्याला असलें पाहिजे.'

'(५) '**देवो दुर्बलघातकः**' हा जगाचा न्याय आहे. शेतकरी हा दुर्बळ झालेला आहे. या दुबळ्याला हरघडी अडवणारे व नडवणारे सरकारी अगर खाजगी लोक कोठच्याही खेडेगांवांत भरपूर पहावयास सांपडतात.

पोलीसपाटील, तलाठी, जमादार, हवालदार, फौजदार, फडणीस, रजिस्ट्रार, मामलेदार, वकील, मुन्सफ, प्रांत, कलेक्टर व कमिशनर हे सर्वच त्याचे यजमान! त्याची कोंबडी, त्याच्या घरांतलें दूध, त्याच्या परसांतलें सरपण, मळ्यांतला हुरडा, गोठ्यांतील बैल व आंगणांतील गाडी या सर्वांवर त्यांची मालकी! दुर्बळाचा वाली ईश्वरही नसतो; अशा स्थितींत या सज्जनांपासून त्याचें रक्षण करण्याला जरूर त्या कायद्याचेंही ज्ञान कार्यकर्त्याला असलें पाहिजे.'

'( ६ ) नाइलाजानें गुरांची चरबी लावलेलें गिरणीचें अगर विलायती कापड पांघरून त्यास आपल्या व आपल्या बायकापोरांच्या अब्रूचा बचाव करावा लागतो. या आपत्तीपासून त्याची मुक्तता करण्यासाठीं खादीची उत्पत्ति व निपज हाच एक मार्ग. या मार्गाचीही त्यास माहिती पाहिजे.'

'( ७ ) त्याला व त्याच्या मुलांबाळांना वक्तशीर व्यायामाचें महत्त्व पटवून देऊन त्यांच्यांत नसलेली शिस्त लावण्याकरितां जरूर त्या व्यायामपद्धतीची व कवाइतीच्या शिक्षणाचीही कार्यकर्त्यांस माहिती असली पाहिजे; कारण आज नाहीं उद्यां खेड्यांतील क्षात्रवृत्तीच्या लोकांवरच परचक्रनिवारणाची जबाबदारी येऊन पडणार हें खास. वास्तविक ही गोष्ट केव्हांच व्हावयास पाहिजे होती. तसें झालें असतें तर आज शेतकऱ्याच्याच पैशांतून कोट्यवधि रुपये लष्करी खर्चांत नाहींसे होतात, ती आपत्ति थांबली असती व त्या पैशांचा विनियोग खेड्यांतील लोकांचें आरोग्य, शिक्षण वगैरेसारख्या लोकोपयोगी कार्यांकडे करतां आला असता. दुसरी गोष्ट; हिंदुस्थानच्या लोकांचें रक्षण करण्यास परदेशांतून पलटणी आणून ठेवाव्या लागणें ही निसर्गाच्या विरुद्ध व अपमानास्पद अशी गोष्ट नाहीं का? मानहानी आणखी ती कशी असते? शिवाय खरोखरच तसा प्रसंग आला तर या परस्थांच्या हातून **भारताचें** कितपत रक्षण होऊं शकेल याची मला शंकाच आहे. कारण महायुद्धांत त्यांची परीक्षा झालीच. बेल्जममध्यें मॉन्सपासून जवळजवळ समुद्रकिनाऱ्यापर्यंत दांतीं तृण धरून **फॉन क्लकच्या** जर्मन फौजेपुढें त्यांना पळतां भुई थोडी झाली, ही गोष्ट जगत्प्रसिद्धच आहे. या लोकांनीं **शिवाजी, राणा प्रताप, अकबर** या विभूतींच्या वंशजांचें रक्षण करण्याचा आव आणावा हें केवढें आश्चर्य! हिंदुस्थानांतल्याच मराठे, शीख, रजपूत, गुरखे, पठाण वगैरे बहाद्दरांनीं इप्रेसच्या रणांगणावर पंच-

प्राणांच्या आहुति देऊन ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं इंग्लिश लोकांची अब्रू बचावली, ही गोष्ट विसरून कशी चालेल? म्हणून शक्य तितक्या लवकर खेडेगांवांतल्या जवानांना लष्करी शिक्षण देऊन राष्ट्रीय सैन्य उभारण्याची योजना मध्यवर्ति सरकारला करावीच लागेल व त्या कार्याला खेड्यांतील कार्यकर्त्यांनें मदत केली तर तें काम फारच सुलभ होईल; म्हणून या शिक्षणाच्या ज्ञानाची आवश्यकता.

( ८ ) आज देशांत शेतकऱ्यांच्याच पैशांतून सरकारी अधिकारी नेमले गेलेले आहेत. अर्थात् एका अर्थानें ते त्यांचे नोकर आहेत. पण दैवाचा फेरा असा कीं, ज्याप्रमाणें दोन डोळ्यांची गांठ कधींच पडत नाहीं, त्याचप्रमाणें मालक व नोकर यांची गांठ पडण्याचा कपिलाषष्ठीचा योग क्वचितच येतो. इकडे शेतकऱ्यांच्या पिकांवर रोग पडलेला असतो; तिकडे शेतकीखात्यांतील अधिकारी टोलेजंग हवेल्यांत बसून खर्डे घांशीतच असतात. एकाला दुसऱ्याचा पत्ता नसतो ! इकडे गांवांतल्या शेकडों लोकांचे हात अगर पाय नारूनें भप्प सुजलेले असतात; तिकडे आरोग्यखात्यांतील छोटेबडे अधिकारी खुशाल मोठमोठ्या पगारांचीं ओझीं बिनधोक घरीं नेत असतात. एकाला दुसऱ्याचा पत्ता नसतो ! असे किती प्रकार वर्णावेत ? असें कां होतें ? कारण एकच. नोकर व मालक यांची सांगड घालणारा निरपेक्ष **मध्यस्थ** खेडेगांवांत नसतो, हेंच या अनर्थाचें बव्हंशीं कारण आहे. हीच गोष्ट लहानमोठ्या राष्ट्रीय पुढाऱ्यांची. एकीकडे अधिकारी व पुढारी व दुसरीकडे शेतकरी यांचेमधील **मध्यस्थाचें** काम करण्यास जरूर तें ज्ञान, धीटपणा, निरपेक्षबुद्धि व निरलसता कार्यकर्त्यांचे अंगीं असली पाहिजे.

( ९ ) '**उपाधीसि विस्तारावें। उपाधींत न संपडावें ।।**' या वचनाप्रमाणें कार्यकर्त्यांनें कृषिकर्मांच्या उपाधींत स्वतःला गुरफटून घेणें केव्हांहि शहाणपणाचें होणार नाहीं. कारण शेती दोन प्रकारची. कोरडवाहू अगर बागाईत. पहिली अत्यंत अनिश्चित; कारण सर्वस्वीं मेघराजाच्या कृपेवर अवलंबून. दुसरी अत्यंत खर्चाची. भरमसाट भांडवल ओतावें, तेव्हां फळ देणार ! दोन्हीहि कार्यकर्त्यांचा इतका वेळ खातील कीं, त्यांना ग्रामसंघटनेच्या इतर गोष्टींकडे बघण्याला वेळ सुद्धां सांपडणार नाहीं; म्हणून हा इषारा दिला आहे. असें जरी आहे तरी कार्यकर्त्याला कृषिकर्माबद्दल शक्य तितकी तात्त्विक

माहिती असली पाहिजे. शेतकीखात्यातर्फे होणाऱ्या शोधांशीं त्याचा परिचय असणें जरूर आहे. शेतीच्या उत्पन्नाचें एकरीं प्रमाण कसें वाढवितां येईल, याबद्दल ठिकठिकाणीं प्रयोग चालू आहेत; त्या प्रयोगांबद्दलची माहिती त्यानें गांवकऱ्यांस पुरविण्याविषयीं सदैव तत्पर असलें पाहिजे. बांधबंधारा-दुरुस्ती, शेणखत व सोनखत यांचें संवर्धन, बींबियाण्यांची निवड, फायदेशीर कुंपणपद्धति, माल किफायतशीर रीतीनें खपविण्यास जरूर तें ज्ञान आणि गोरक्षण व पशुसंवर्धन इत्यादि विषयांचे बाबतींतहि त्याच्या सल्लामसलतीचा फायदा शेतकऱ्यांस नेहमीं मिळाला पाहिजे.

( १० ) कॉंग्रेसकमिट्या, लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या, ग्रामपंचायती, कायदेकौन्सिलें, खाजगी व सरकारी, सहकारी व इतर पेढ्या वगैरे संस्थांची संघटना व कार्यपद्धति यांच्या तात्त्विक ज्ञानाशींहि त्याचा परिचय असला पाहिजे.

कमींत कमी इतक्या गोष्टींत खेडेगांवांतील पगारी कार्यकर्ता पारंगत असेल तरच ग्रामसंघटनेचें कार्य पायाशुद्ध रीतीनें होऊं शकेल; नाहींतर ' जेथें पाहे तेथें देखीचे पर्वत । पायावीण भिंत तांतडीची ।। ' हा प्रकार आज सररहा जिकडेतिकडे चालला आहेच. '

**अरे बापरे !** कार्यकर्त्यांची लायकी शाबित होण्यास जरूर त्या सद्गुणांची यादी ऐकून माझी तर छाती दडपूनच गेली. मी म्हणालों, ' **स्वामिन् !** इतक्या योग्यतेचा मनुष्य सांपडावयाला नको व ग्रामसंघटनेचें कार्यहि व्हावयास नको; असेंच कीं नाहीं ? '

**स्वामींचा चेहरा या वेळेस फारच गंभीर दिसला.** जरा थांबून ते म्हणाले, ' अलबत् ! इतक्या योग्यतेचा कार्यकर्ता असेल तरच काम निभेल; नाहींतर त्यानें या खटपटींत पडूंच नये. अशा प्रकारचें शिक्षण कार्यकर्त्या उमेदवारांस देण्याची धमक ग्रामसंघटनेचें कार्य हातीं घेणाऱ्या पुढाऱ्याच्या अंगीं नसेल तर त्यानें भलत्या भानगडींत पडूं नये. **तुकाराममहाराजांनीं** म्हटल्याप्रमाणें ' **नाहीं तरी सुखें असावें संसारीं । फजीती दुसरी करूं नये ।।** ' या वचनाचा त्यानें जप करावा व खुशाल घरीं राहून पोराबाळांचा प्रपंच सुखानें चालवावा; त्यांत यत्किंचितहि पाप नाहीं. '

---

# ५. रत्नं समागच्छतु कांचनेन

' बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपकर्षति । '

—भगवान् श्रीकृष्ण.

मला वाटलें कीं, सद्गुणमालिका आतां संपली. तर्क चुकला. महाराज पुढें म्हणाले, ' दोन सिद्धांत झाले. वत्सा ! आतां तिसरा सिद्धांत ऐक. कार्यकर्त्यांच्या पायांत पगाराची रुपेरी बेडी असणें हें जितकें आवश्यक आहे तितकेंच त्याचे हातपाय विवाहशृंखलेनें बद्ध करून टाकणेंहि अपरिहार्य होय. '


महाराजांच्या तोंडून हें वाक्य ऐकतांच मी विरघळूनच गेलों. स्वामी निष्ठावान् ब्रह्मचारी. ' स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाणा, मृत्तिकेच्या। ' हा त्यांचा संप्रदाय. त्यांच्या तोंडून विवाह-शृंखलेची गोष्ट ऐकतांच अचंब्याची पराकाष्ठाच झाली ! मागलापुढला विचार न करितां ' स्वामी ! मज गरीबाची आपण मस्करी तर करीत नाहीं ना ? ' असे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडले.

' छी ! छी ! ' महाराज म्हणाले, ' वत्सा ! ही गोष्ट तूं स्वप्नांत सुद्धां आणूं नकोस. हा थट्टेचा विषय नव्हे. बाळा ! हे चेष्टेचे कां दिवस आहेत ? आसेतुहिमाचलापर्यंत भारत पारतंत्र्याच्या वणव्यांत सांपडला असतांना बेटा ! मस्करी कोण करील ? मी सतराव्या शतकांत 'सावधान' हे शब्द कानीं पडतांच लग्नमंडपांतून निसटून गेलों यावर जाऊं नकोस. त्यावेळीं तसेंच कारण होतें. तें व्रत माझ्यापुरतेंच होतें. सांप्रदायिकांच्या-साठीं नव्हतें. ' या कारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम । परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया।। ' असा उपदेश मीं त्या वेळींहि माझ्या सांप्रदायिकांस केला नाहीं काय ? बाबारे ! अधिकार पाहूनच उपदेश करावा लागतो. कामक्रोधादि मतंगजांचे प्रचंड आघात सोसून त्यांना दश-दिशांना धुडकावून लावणारे शुकाचार्य विरळा ! वत्सा ! ' शैले शैले न माणिक्यं, मौक्तिकं न गजे गजे, साधवो न हि सर्वत्र । चंदनं न वने वने ।। ' ही गोष्ट विसरून चालावयाची नाहीं. अतएव अविवाहित स्थितींत

ग्रामसंघटक नेहमीं धुतल्या तांदुळासारखा पवित्र राहीलच ही गोष्ट खोटी; म्हणून त्याचा ग्रामसंस्थेचा शिक्षणक्रम संपतांच त्यास चतुर्भुज करूनच पुढाऱ्यानें त्याला कार्यास लावावें, ही उत्तमांतील उत्तम गोष्ट ! एक वेळ तो ज्ञानांत कमी भरला तरी परवडेल; पण चारित्र्याचे बाबतींत तो सर्व ग्रामस्थांस आदर्शभूत असा चिमखडाच असला पाहिजे. '**सीझरची पत्नी संशयातीतच असली पाहिजे**' ही **तमसातीरस्थ शेक्सपिअर**कवीची जगत्प्रसिद्ध उक्ति तुझ्या वाचनांत आली नाहीं काय?'

**वरील बिनतोड उत्तरानें 'शुनःकपाले लगुडप्रहारः' अशी माझी स्थिति झाली.** पुन्हा शंका म्हणून विचारावयाची नाहीं असा मीं बेत केला. कान उघडे ठेवणें व येतील ते शब्द ऐकून घेणें हा उत्तम मार्ग, अशी मीं मनाची समजूत करून घेतली व स्वस्थ बसलों.

'**वच्चा!' स्वामी पुढें म्हणाले,** 'दुसरी गोष्ट अशी कीं, हें जग कांहीं नुसत्या पुरुषांचेंच बनलें नाहीं. '**अर्धनारीनटेश्वर**' या स्वरूपांत परमात्म्यानें अनेकदां आपल्या भक्तांस दर्शन दिलेलें आहे. या न्यायानें महिलावर्गास विसरून कसें चालेल? त्यांच्या मनावरहि सद्भावनांचे संस्कार योग्य काळीं योग्य प्रमाणांत व्हावयास नकोत काय? हें कार्य कोणीं करावयाचें? माझ्या मतानें या कार्याचा बराचसा वांटा ग्रामसंघटकाच्या सहधर्मचारिणीनें उचलिला पाहिजे. श्रमविभाग हा जगाचा नियम आहे. त्या नियमानुसार पुरुषवर्गाकडे पतीनें पहावें व स्त्रीवर्गाकडे पत्नीनें लक्ष द्यावें; आणि म्हणूनच कविकुलगुरु **कालिदासानें** म्हटल्याप्रमाणें '**रत्नं समागच्छतु कांचनेन**' अशी माझी अनुज्ञा आहे.'



## ७. कुबेरहि कंगाल होईल !

' सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः

आतांपर्यंत घडून आलेल्या वृत्तांताचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. पुण्यास परत जायला निघालों काय! मध्येंच प्रतापगड-ची यात्रा करण्याची लहर आली काय! यात्रा राहिली बाजूलाच; तिसराच बनाव एकाद्या कादंबरींतील हकीगतीप्रमाणें घडून आला काय! सर्वच गोष्टी अजब! मी स्वप्नसृष्टींत तर नाहींना, असाहि मनाला संशय आला. खात्री करून घेण्याकरितां दोन चिमटेहि मीं आपल्याला घेतले. खात्री झाली कीं, मी जागा आहें. जागृतावस्थेंतीलच हे सर्व प्रकार आहेत. कशी तरी घडून आलेली ही गोष्ट नव्हे. यांत खास ईश्वरी संकेत आहे. जें ध्येय अनेक वर्षांपासून आपण उरापोटाशीं बाळगिलें त्यासंबंधींची अंतिम पूर्तता घडवून आणण्यासाठींच ईश्वरानें हा प्रसंग योजिलेला असावा अशी मनाची खात्री झाली व लगेच महाराजांना मीं पुढील मुद्याचा प्रश्न टाकला. मी म्हणालों, ' गुरुवर्य ! ग्रामसंघटना म्हणजे काय, ती कोणीं करावी, ती करणाराच्या अंगीं कोणकोणते गुण असावेत, वगैरे अनेक बाबीं-बद्दल मी भ्रमांत होतों. त्या भ्रमाचा आपल्या कृपेनें आज निरास झाला. आतां एकदोनच महत्त्वाचे प्रश्न आपल्याला विचारावयाचे राहिलेले आहेत ... ... '

' जरूर जरूर. ' मी पुढें बोलावयाच्या अगोदरच महाराज उद्गारले. ' बाबारे ! वैकुंठांतील निर्विकल्प समाधीच्या ब्रह्मानंदाची लूट करण्याचें सोडून आज मी या ठिकाणीं अवतीर्ण झालों आहें, यांत कोणचाच हेतु नाहीं अशी कां वेड्या ! तुझी समजूत आहे ? तशी असेल तर जितक्या लवकर तिचा तूं त्याग करशील तितका मला आनंद होईल. बाबारे ! आम्ही राजाधिराज रामचंद्राचे सेवक; एक क्षणहि फुकट घालविण्याची आम्हांला मुभा नाहीं; कारणाशिवाय येथें आमच्यासारख्याचें आगमन कसें होईल ? जगतांतील अनंत दीनदुबळ्यांचा आक्रोश आज रघुरायाच्या कानांवर गेलेला आहे. येथील यमयातनांतून जगताची मुक्तता होण्याचा समय फारसा

लांब नाहीं. त्यासाठींच भारतांत त्रिभुवनवंद्य महात्म्याचा अवतार. त्याच्या कार्याला हल्लींपेक्षां सहस्रावधि पटीनें तेज चढण्यासाठी भारत स्वतंत्र झाला पाहिजे, हें तूं म्हणालास तें सर्वथैव सत्य आहे. हा चमत्कार भारतांतील लक्षावधि खेडीं स्वतंत्र झाल्याखेरीज घडणें नाहीं. तें कार्य तुझ्यासारख्या युवकांच्या हातून घडवून आणावें, अशी ईश्वरी योजना आहे. यासाठीं तुमच्या मनोभूमिकेची पूर्व तयारी होणें अत्यावश्यक आहे. तें कार्य नीटपणें करून घे. तुझ्या सर्व शंकांचें परिमार्जन शक्य तितक्या लवकर झालें पाहिजे. कारण ग्रामसंघटनेचें कार्य शक्य तितक्या लवकर होणें जरूर आहे. बोल, कोणचाहि किंतु मनांत न बाळगतां जें कांहीं तुला विचारून घ्यावयाचें असेल तें विचार.'

'महाराज! पैशाची व्यवस्था काय?' मीं भीतभीतच विचारलें.

'बरोबर, अगदीं बरोबर! योग्य मुद्दा काढलास. कारण सर्व गोष्टींचीं सोंगें आणतां येतात; पण यां जगतांत पैसा ही अशी एक चीज आहे कीं, जिचें सोंग कोणीहि कधींहि आणूं शकत नाहीं. तो प्रश्न तर अगोदर सोडविला पाहिजे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, या प्रश्नाचा पायाशुद्ध रीतीनें फारच थोड्या लोकांनीं आजपर्यंत विचार केलेला आहे. कां? असा गोंधळल्यासारखा किमर्थ पाहतोस?'

'एखादा टिळकस्वराज्यफंडासारखा प्रचंड फंड जमवून ही गोष्ट नाहीं कां होणार?' माझा त्या गोष्टीवर विश्वास नव्हता, तरीहि मीं मुद्दामच हा प्रश्न टाकला.

'वेडा रे वेडा!' स्वामी हंसून म्हणाले. 'असा विचार कर. हिंदुस्थानात किती खेडेगांवें आहेत? सात लक्ष. पण जाऊं द्या. अखिल हिंदुस्थानचा प्रश्न आपण जरा बाजूलाच ठेवूं या. तुझा महाराष्ट्रच घे. त्यांत किती खेडीं आहेत?'

'दहा ते पंधरा हजार असावींत.' मीं चट्कन् उत्तर दिलें.

'अगदींच चूक.' स्वामी गंभीर मुद्रा करून म्हणाले. 'खुळ्या! महाराष्ट्र म्हणजे तुझ्या काँग्रेसचे दहा जिल्हेच, असें कां तूं समजतोस? भल्या माणसा! खरा महाराष्ट्र तर त्याच्या बाहेरच आहे. आज तो सबंधच्या सबंध निजामाच्या राज्यांत समाविष्ट झालेला आहे. माझा जन्म कोठें झाला?

जांबेंत. हें गांव कोठें आहे? निजामशाहींत. **जनार्दनस्वामी**, साधुवर्य **एकनाथ** व इतर अनेक पुण्यप्रतापी संतांच्या अवतारकार्यांची भूमि कोणची? तीहि मोंगलाईतच! यापुढें **महाराष्ट्राचा** विचार करतांना तुम्हांस उत्तरेस **विंध्याद्रि** व **नर्मदा**, दक्षिणेस **तुंगभद्रा**, व एकीकडे **पूर्व समुद्र**, व दुसऱ्या बाजूला **हिंदी महासागर** याच मर्यादा डोळ्यांपुढें ठेविल्या पाहिजेत.'

ग्रामसंघटनेचा विचार करीत असतां मोंगलाईला वगळतां येणार नाहीं ही कल्पनाहि मला नव्हती.

**एकेक ऐकावें तें नवीनच!** 'गुरुजी!' मी म्हणालों, 'हें शक्य कसें आहे? **मोंगलाई** तर एका संस्थानिकाच्या ताब्यांत! खालसा मुलुखांतील **महाराष्ट्र** व मोंगलाईतील **महाराष्ट्र** यांचें लग्न कसें लागणार?'

'**बच्चा! अरे! यांत कांहींच कठीण नाहीं.** गोष्ट अगदीं शक्य आहे. काल किती झपाट्यानें पुढें धांवत आहे याची कल्पनाहि तुला नाहीं. बेट्या! ब्रिटिश **साम्राज्याच्या** पाशवी सामर्थ्यापुढें वेड्या **गांधींच्या** आत्मिक सामर्थ्याची फट्फजीती उडेल, असें कालच जगाला वाटत होतें ना? आज तो भ्रम अजिबात नाहींसा झाला आहे. तीच स्थिति उद्यां खालसा मुलूख व संस्थानें यांच्या बाबतींत झाल्याशिवाय रहाणार नाहीं. भारतीय संस्थानिक किती झाले तरी **दाशरथी रामाच्या** परंपरेंतील आहेत. '**स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि। आराधनाय लोकानां मुञ्चतो नास्ति मे व्यथा॥**' हा **रघुपतीचा** संप्रदाय आहे. इस्लामी संस्थानिकांना सुद्धां या दंडकापुढें आज ना उद्यां मान वांकवावीच लागेल; म्हणून तुला काळजी करण्याचें कारण नाहीं. प्रारंभीं संकटें येतील; अडचणींचा झंझावात सुटेल; ग्रामसंघटनेचें तारूं खवळलेल्या दर्यांत बुडतें कीं काय अशीहि किंचित् कालपर्यंत कार्यकर्त्यांना भीति वाटेल; परंतु ही अवस्था फार वेळ टिकणार नाहीं. शेवटीं यश मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. कार्यकर्त्यांची कसोटी मात्र प्रथम चांगलीच पाहिली जाईल. प्रारंभींची परीक्षा उत्तीर्ण होऊन रघुरायाची कृपा झाली कीं, मग '**मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि निरसूनि जातें।**' हा माझा अनुभव आहे. तात्पर्य, या **महन्महाराष्ट्रांतील** पन्नास हजारांवर गांवांची आपणांस संघटना करणें आहे, ती पायाशुद्ध

रीतीनें झाली पाहिजे, ही गोष्ट होण्यास प्रत्येक गांवांत स्वतंत्र, पगारी, शिक्षित ( trained ) व विवाहित कार्यकर्ते असणें जरूर आहे, इतके सिद्धांत निश्चित झाले.

'**यापुढचा महत्त्वाचा प्रश्न पैशाचा.** त्याहि बाबतींत चालकांनीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे; ती ही कीं, हें ग्रामसंघटनेचें कार्य कोणत्याहि एका व्यक्तीची, व्यक्तिसमूहाची अगर संस्थेची श्रीमंती किंवा औदार्य यांवर सर्वस्वीं व कायमचें अवलंबून असतां कामा नये. **गुजराथ** किंवा **संयुक्त-प्रांतासारख्या** श्रीमंत प्रांतांना सुद्धां ही गोष्ट शक्य होणार नाहीं. मग **महाराष्ट्रा**सारख्या कंगाल प्रांतानें तर ही गोष्ट स्वप्नांत सुद्धां आणूं नये. एकादा **जमनालाल** बजाज, **भागवत** ( यांनीं स्वत:चे हजारों रुपये खर्च करून **चिंचवड**जवळ **ताथवडें** गांवच्या संघटनेचें काम चालविलें आहे ) अगर **बिरला** हे कितीहि श्रीमान् व स्वार्थत्यागी असोत, त्यांच्या त्यागाला व श्रीमंतीला मर्यादा ही असणारच. ते फार तर दहापांच खेडेगांवांचा प्रश्न व तोहि तात्पुरता सोडवूं शकतील. एक गोष्ट खरी कीं, त्यांच्या कार्याचा नमुना म्हणून मात्र इतर कार्यकर्त्यांना अत्यंत उपयोग होईल; परंतु **महन्महाराष्ट्रां-तील** सर्व खेडेगांवांचा साकल्येंकरून, कायमचा प्रश्न सोडविणें हें त्यांच्या आवांक्याच्या बाहेरचें आहे. **कुबेरानें** जरी ही गोष्ट हातीं घेतली तरीहि त्याची संपत्ति या गोष्टीला अपुरी पडून सरतेशेवटीं त्याला कंगालखान्याचा रस्ता धरावा लागेल. तस्मात् देशांतील जबाबदार पुढाऱ्यांनीं अनेक ठिकाणचे अनुभव पाहून अशी कांहीं एक योजना निश्चित केली पाहिजे कीं, तिची अंमलबजावणी केली असतां कोणाहि एका व्यक्तीवर या गोष्टीचा भार पडणार नाहीं व श्रमविभागाच्या सहकारी व स्वावलंबी तत्त्वावर ग्रामसंघटनेचें कार्य निकालांत काढतां येईल.

'**एकच उदाहरण पहा.** पृथ्वीवर धनधान्यादिकांची समृद्धि होणें ही गोष्ट पर्जन्यावर अवलंबून असते. या पावसाचा पुरवठा पृथ्वीच्या पृथ्वीवरच होतो कीं नाहीं? पृथ्वीवरील तळीं, ओढे, नद्या, नाले अगर समुद्र यांच्या पाण्याची उन्हाळ्यांत वाफ होऊन ती वर अस्मानांत जाते व योग्यकाळीं पावसाच्या स्वरूपांत पावसाळ्यांत परत भूमातेला भेट देते. पर्जन्यवृष्टीसाठीं लागणारी वाफ मंगळ, शुक्र अगर शनि इत्यादि आकाशस्थ ग्रहांकडून आपण उसनवार

आणीत नाहीं; त्याचप्रमाणें सर्वांगीण ग्रामसंघटनेसाठीं लागणारा पैसा बाहेरून आणून चालावयाचा नाहीं; तो जेथल्या तेथेंच कांहीं तरी युक्ति करून मनुष्यानें उत्पन्न केला पाहिजे व पुन्हा त्या द्रव्याचा विनियोग गांवांतल्या गांवांतच झाला पाहिजे; तरच हा प्रश्न व्यवहाराच्या दृष्टीनें सुटेल. ग्रामसंघटना हा पोरखेळ खास नव्हे. त्याची थट्टा होतां कामा नये. तें कार्य यशस्वी करावयाचें असेल तर स्वावलंबनाच्या पायावरच त्याची उभारणी झाली पाहिजे ! '

**एवढें बोलून स्वामी किंचित् कालपर्यंत स्तब्ध राहिले.** मीही विचारांत निमग्न झालों; पूर्वी कल्पनाहि नव्हती अशा स्वरूपांत हा **प्रश्न महाराजांनीं** माझ्यापुढें ठेविला ! त्यामुळें माझ्या मेंदूंत भरमसाट विचारांचा सांवळागोंधळ उडून गेला. डोकें पुढें काम करण्यासच तयार नव्हतें. **महाराजांच्या** ही गोष्ट लक्षांत आल्याशिवाय कशी राहील ? त्यांनीं अंतर्ज्ञानानें सर्व कांहीं जाणलें व ते म्हणाले, ' बाळा ! ग्रामसंघटनेच्या कार्याचा विचार करीत असतांना जीं गृहीतकृत्यें घेऊन चालावीं लागतात त्यांचें विवेचन आपण आतांपर्यंत केलें; आपल्या वाटाघाटीचा प्रास्ताविक भाग संपला; आतां हें कार्य घडवून आणण्याकरितां एखादी योजना तयार करणें शक्य आहे किंवा नाहीं या गोष्टीच्या विचाराला आपण लागलें पाहिजे; कारण महत्त्वाचा प्रश्न तर तोच आहे. या कार्याला प्रारंभ करण्यापूर्वी पुन्हां एकदां आपण परमात्म्याची प्रार्थना करूं या. त्याला आळविल्याशिवाय व त्याची करुणा भाकल्याशिवाय जरूर त्या स्फूर्तीची प्रेरणा होणें कठीण ! '

असें म्हणून त्यांनीं पुन्हां पूर्ववत् समाधि लावून आत्मा ब्रह्मांडीं नेला व मीहि नेत्रकपाटें मिटून मनोभावानें परमेश्वराची करुणा भाकूं लागलों.

# ८. वस्त्रस्वावलंबनाचें रहाटगाडगें

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥

——भगवान् श्रीकृष्ण.

सुमारें पंधरा मिनिटांत माझी प्रार्थना संपली. मीं डोळे उघडले. समोर पहातों तों स्वामींचें ध्यान अजून चाललेंच आहे. पांच मिनिटांनीं त्यांनीं ध्यानाचें विसर्जन केलें, डोळे उघडले व मला म्हणाले, 'बाळा! काळजी करूं नकोस. रघुपतीची तुझ्यावर कृपादृष्टि आहे. इच्छित कार्य खास तुझ्या हातून पार पडणार.'

'महाराज! आपण ग्रामसंघटनेच्या योजनेबद्दल मघाशीं बोलला होतां; आपणांस कांहीं प्रेरणा झाली आहे काय?' मीं कुतुहलानें प्रश्न टाकला.

'अलबत्! यांत काय संशय? शुद्ध बुद्धीचा माहिमाच तसा आहे. 'भगवंत भावाचा भुकेला। भावार्थ पाहोनी भुलला। संकटीं पावे भाविकाला। रक्षीतसे॥' हें वचन कधींहि मिथ्या ठरणार नाहीं. तें त्रिकालाबाधित सत्य आहे. ऐक! रघुरायाची अशी आज्ञा आहे कीं, भारतानें—दरिद्रनारायणानें—पुनश्च सुदर्शनचक्राला शरण गेलें पाहिजे. त्याशिवाय भारतसंतानांचा उद्धार होणें शक्य नाहीं.' स्वामी अत्यंत धीर गंभीर अशा स्वरांत म्हणाले.

'गुरुवर्य, ही आज्ञा जरा जास्त स्पष्ट करून सांगाल काय?' मीं प्रश्न केला.

'अवश्य! वत्सा, ऐक. ग्रामसंघटना सशास्त्र, व्यापक प्रमाणावर व कायमची व्हावयास पाहिजे असेल तर वस्त्रस्वावलंबनरूपी कामधेनूची कांस धरल्यावांचून तुम्हांला गत्यंतर नाहीं. तुला माहीतच आहे कीं, अन्न आणि वस्त्र या दोन गोष्टी मानवी प्रपंचाचीं दोन चाकें आहेत. एक काळ असा होता कीं, हीं दोन्ही चक्रें शाबूत होतीं. त्यामुळें हिंदवी शेतकऱ्याच्या संसाराचा गाडा निर्वेधपणानें सुरळीत चाललेला होता. अन्नपूर्णादेवीची आर्यावर्तावर पूर्ण कृपा होती. इतकेंच नव्हे, तर वस्त्राच्या

बाबतींतहि भरतखंड पूर्णपणें आपल्या पायावर उभें होतें. फार काय सांगावें? या बाबतींत तें स्वतःची गरज भागवून पूर्व गोलार्धातील जपान देशापासून तों पश्चिम गोलार्धातील मिसरी लोकांच्या मुलुखापर्यंत पसरलेल्या सर्व देशांस उंची उंची कापडांचा पुरवठा करीत असे.

दुर्दैवानें आज तो काल गेलेला आहे. कुंतीपुत्र कर्णाच्या रथाचें एक चक्र ज्याप्रमाणें ऐन वेळीं पृथ्वीनें गिळून टाकलें, तद्वतच जपान, इटली व मँचेस्टर यांनीं हिंदी राष्ट्राच्या गाड्याचें एक चाक नष्ट करून टाकलें आहे व दुसरेंहि नामशेष होण्याच्या मार्गाला लागत आहे. दोहोंपैकीं एक फुप्फुस कुजून गेलेल्या माणसाची जी स्थिति होते तीच स्थिति आज हिंदी शेतकऱ्याची झालेली आहे. त्याला कोणताहि व्यवहार व्यवस्थित रीतीनें करतां येत नाहीं. त्यामुळें जगाच्या बाजारांत त्याची व त्याच्या देशाची कवडीइतकी सुद्धां किंमत उरली नाहीं. ह्या अत्यंत खेदजनक अवस्थेमधून परमप्रतापी बळीराजाचा वंशज व जगाचा पोशिंदा जो हिंदवी शेतकरी तो व त्याचा प्रपंच पुन्हां पूर्ववत्, सुव्यवस्थित व सुसंघटित व्हावयास पाहिजे असेल तर पायाशुद्ध ग्रामसंघटनेच्या कार्यास तुम्ही युवकांनीं व तुमच्या पुढाऱ्यांनीं शक्य तितक्या लवकर हात घातला पाहिजे व यासाठींच, वस्त्रस्वावलंबनाच्या नंदिनीची तुम्हीं आराधना केली पाहिजे.'

'महाराज! अजूनहि आपल्या हृदयांतील आशय मज पामराला स्पष्टपणें कळला नाहीं. वस्त्रस्वावलंबनाच्या योगानें फारतर मोठ्या मुष्किलीनें प्रत्येकास स्वतःस लागणाऱ्या कापडाचा प्रश्न सोडवितां येईल. पण त्यामुळें सर्वांगीण ग्रामसंघटनेचा प्रश्न कसा सुटणार? त्यासाठीं लागणारा पैसा कसा उत्पन्न होणार? हें सर्व कळण्यासाठीं कृपा करून या कामधेनूच्या आराधनेचें शास्त्र, विधि, नियम व फलश्रुति यांचें आपण स्पष्टीकरण करावें.' मी म्हणालों.

'ठीक, ठीक,' महाराजांनीं लगेच उत्तर दिलें. 'एक. खेडेगांवांत नांदणाऱ्या आबालवृद्धांचा जीवनक्रम बौद्धिक, शारीरिक, नैतिक व आर्थिक दृष्ट्या सुसंघटित होणें असल्यास प्रत्येक खेडेगांवांत अनेक संस्था व त्यांची व्यवस्था पाहणारीं पगारीं माणसें असलीं पाहिजेत. यासाठीं एक मध्यवर्ति हिंदमातामंदिर प्रत्येक खेड्यांत असणें जरूर आहे. या मंदिरांतच वर उल्लेखिलेल्या संस्था, त्यांच्या कचेऱ्या व व्यवस्थापकांच्या राहण्याच्या जागा

असल्या पाहिजेत. ही गोष्ट होण्यासाठीं प्रत्येक खेडेगांवांत कांहीं एक ठराविक रक्कम आपणांस दरसाल उभी करितां आली पाहिजे. कित्येक देवस्थानांस ज्याप्रमाणें देवाची पूजाअर्चा, नंदादीप, पुजाऱ्यांचा खर्च, देवळाची डागडुजी, यात्रा व उत्सव, वगैरेसाठीं नियमित उत्पन्न वेगळें तोडून दिलेलें असतें व त्या उत्पन्नांतून सर्व खर्च नियमित रीतीनें केला जातो, त्याचप्रमाणें या **हिंदमातामंदिराची** व्यवस्था असली पाहिजे. हजार बाराशें लोकवस्तीचा गांव असेल तर तेथें अडीच तीन हजार रुपयांचें उत्पन्न तरी दरसाल कायमचें निश्चित असें असलें पाहिजे. असें झालें तरच पद्धतशीर ग्रामसंघटनेचें कार्य बिनबोभाट होऊं शकेल. तुझा प्रश्न यापुढें काय येणार हें मी जाणतों. मनांतल्या मनांत तुला हंसूंहि कोसळत असेल.'

'**शिव! शिव! महाराज! दयानिधे! असें कसें होईल?** मी आतांपर्यंत आपणांस नाहीं नाहीं ते प्रश्न विचारण्याचें धाडस केलें, त्याचें कारण केवळ या पामराचें अज्ञान हेंच होय. आपणांसारख्या तपस्वी सत्पुरुषाबद्दल भलतीच कल्पना माझ्या मनांत कशी येईल? माझी शंका इतकीच कीं, हे अडीच तीन हजार रुपये कसे उत्पन्न होतील? आजच शेतसारा, लोकलफंड, सावकारांचें देणें वगैरे ओझ्याखालीं शेतकऱ्याचें पाठाड व कंबरडें मोडून गेलेलीं आहेत. या तीन हजार रुपयांच्या रकमेची उभारणी करण्यासाठीं आणखी एखाद्या वर्गणीचा अगर पट्टीचा भार आपण त्याच्यावर घालूं लागलों तर तो त्याला सहन तरी होईल काय? माझ्या अल्प बुद्धीनें ही गोष्ट अशक्य, त्रिवार अशक्य आहे.' मीं उत्तर दिलें.

'**नाहीं, नाहीं.**' स्वामी चटकन् म्हणाले, 'वत्सा! अशी व्यवहाराला सोडून असलेली योजना मी कशी सुचवीन? कर्जबाजारी शेतकऱ्याची आजची भयंकर स्थिति मी पूर्णपणें जाणतों. जी योजना मी सुचविणार आहें, तिच्यामुळें शेतकऱ्यावर हल्लींपेक्षां एक पैचाहि जास्त भार पडणार नाहीं; उलट कालांतरानें या भारांतून आपली मुक्तता करून घेण्याला त्याला साहाय्यच होईल.'

'**अहाहा! महाराज! खरोखरच असें होईल का?** ही गोष्ट शक्य आहे काय? शक्य असली तर सोन्याहून पिवळें झालें म्हणावयाचें. **गुरुजी!** सांगाच आपली काय योजना आहे ती!' मीं केविलवाण्या आवाजानें प्रश्न केला.

'वत्सा, ऐक!' महाराज म्हणाले, 'प्रत्येक गांवास लागणारें कापड विणणें, त्या कापडास लागणारें सूत कांतणें, त्या सुतास लागणारा कापूस पिंजणें, वठणें व उत्पन्न करणें या सर्व गोष्टी गांवांतल्या गांवांतच—गांवच्या शिवाराच्या आंत—झाल्या पाहिजेत. हा वस्त्रस्वावलंबनाच्या योजनेचा मूलमंत्र आहे. या विधीच्या योगानें शेतकऱ्यांस कापड विणून घेण्याकरितां जेवढा खर्च करावा लागेल, त्याखेरीज दुसरा कोणताहि प्रत्यक्ष खर्च करावा लागणार नाहीं. पहिली गोष्ट ही कीं, स्वतःच्या कपड्यास लागणारा कापूस त्याचा त्यानेंच उत्पन्न केला पाहिजे.'

'पण स्वामी! पुष्कळ ठिकाणीं कापूस पिकत नाहीं त्याची वाट काय?' मी म्हणालों.

'अरे! हो! हो! गड्या! जरा दम धर' स्वामी हंसत हंसत म्हणाले, 'ज्याच्या शेतांत कापूस पिकतो त्या शेतकऱ्याचा प्रश्नच नाहीं. त्यानें एकच गोष्ट करावयास पाहिजे. आपल्या कापडाच्या सुतास जरूर तेवढा कापूस राखून ठेवून बाकीचा विकून टाकणें ही ती गोष्ट होय. ज्याच्या शेतांमध्यें कापूस पिकवला जात नाहीं त्यानें आपल्या शेतांत बांधाच्या कडेला अगर परसांत देवकपाशीचीं दहावीस झाडें लावावींत. हीं झाडें एकदां लावलीं कीं अनेक वर्षे टिकतात व उत्तम कापूस देतात. ही एक गोष्ट करावी अगर स्वतः-पुरता आपल्या शेतांत साधा कापूस लावावा. तीन माणसांच्या एका कुटुंबास पाव एकरांत, म्हणजेच १०० फूट लांब व १०० फूट रुंद एवढ्या जागेंत, साध्या कपाशीची लागवड केली तर कमींत कमी ३० शेर कापूस निघतो. सरकी काढून रु दहा शेर होईल. साठ वार कापडास सरकी काढलेला १० शेरच कापूस लागतो. या पद्धतीनें कार्य झाल्यास एक कोष्ट्याच्या मजुरी-खेरीज शेतकऱ्याला दुसरा कोणताहि प्रत्यक्ष खर्च स्वतःस लागणाऱ्या कापडा-साठीं करावा लागणार नाहीं. कापूस त्याचाच; तो वठणें व पिंजणें याचा खर्च सरकीच्या किंमतींतून निघूं शकेल. सूत त्यानें अगर त्याच्या कुटुंबांतील माणसानें फुरसतीच्या वेळीं काढलें कीं त्याचाहि खर्च नाहीं.

'स्वतःच्या सालीना अठरा ते वीस वार लागणाऱ्या कापडासाठीं रोज अर्धा ते एक तास सूत काढलें तरी पुरें होतें, असा अनुभव आहे. बार्डोली नमुन्याच्या एखाद्या साध्या चरख्यावर थोड्याशा संवयीनें बारा ते पंधरा नंबरचें

सामान्यत: चारशें वार सूत एक मनुष्य एका तासांत काढूं शकतो. या चारशें वारांचें वजन दोन तोळे होतें. ऐशीं तोळ्यांच्या एका शेरांत सहा वार कापड निघूं शकतें. या हिशेबानें वार पन्ह्याच्या अठरा अगर वीस वार कापडास तीन शेर, म्हणजे २४० तोळे वजनाचें, म्हणजेच अठ्ठेचाळीस हजार वार लांबीचें सूत लागतें. तात्पर्य, वीस वार कापडाला पुरेल इतकें सूत काढावयाला रोजीं एक तासप्रमाणें सरासरीनें एकशेंवीस दिवस म्हणजे चार महिने लागतील.

‘ **बाराशें वस्तीचा एक गांव घेऊं या.** या गांवाला माणशीं वीस वारांप्रमाणें एकंदर चोवीस हजार वार कापड लागेल. या कापडास लागणारें सूत काढण्यास वरील हिशेबाप्रमाणें सर्वच माणसें सर्वच दिवस काम करणार नाहींत, असें धरून चाललों तरीहि बाराशेंपैकीं चारशें लोकांनीं म्हणजे तीन माणसांपैकीं एकानें रोजीं एक तास काम केलें तरी जरूर त्या सुताची उत्पत्ति होऊं शकेल. ’

‘ **सर्व खरें; पण हें सूत त्यांनीं केव्हां काढावयाचें?** कित्येक वेळां शेतकरी पहाटें उठून कामावर जातो, तो दिवस मावळल्यावर घरीं परत येतो. त्याला या कामाला वेळ तरी केव्हां मिळणार? ’ मीं शंका विचारली.

‘ **बाबारे! मनुष्य अडचणीच काढूं लागला म्हणजे त्या केव्हांच संपणार नाहींत.** कार्यकर्त्यानें त्या अडचणींतूनच मार्ग काढला पाहिजे. यशाच्या वाटेंत गुलाबाचे ताटवे केव्हांहि पसरलेले नसतात व ते पसरले असले तरी त्यांनाहि कांटे असतात. हे कांटेकुटे टाळूनच कार्यकर्त्याला जावें लागतें. आतां हीच गोष्ट पहा. एक तर तुझी शंका सर्वस्वीं बरोबर नाहीं. सर्वच शेतकरी तांबडें फुटतांच शेतांत जातातच असें नाहीं. कांहीं जात असतील व तेहि वर्षातून नेहमींच जात असतात असें नाहीं. राखणीच्या वेळीं त्यांना जावें लागतें ही गोष्ट खरी आहे. पण पुष्कळ वेळां आळीपाळीनें या गोष्टी ते करितात. सारांश मनांत आणलें, खटपट केली, तर ही गोष्ट मुळींच अशक्य नाहीं. या बाबतींत मला दुसरीहि एक सूचना करावीशी वाटते. ’

---

# ९. एकादशी संघटना

‘ अणूपासूनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे ’

—भीमरूपी स्तोत्र.

महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें विवरावे ।
जाणते करोनि विखरावे । नाना देशीं ॥

—श्रीरामदास.

**स्वामी जरा थांबून पुढें म्हणाले,** ‘ धर्मांचे कांहीं सिद्धांत त्रिकालाबाधित असतात. कृत, त्रेता, द्वापर अगर कलि—कोणचेंहि युग असो त्यांत ते बदलूं शकत नाहींत. आचारांची मात्र तशी स्थिति नाहीं. कालमानपरिस्थितीप्रमाणें त्यांत बदल करावा लागतोच. उदाहरणार्थ, **ज्ञानोबारायांचीच** गोष्ट घ्या. बदललेल्या परिस्थित्यनुरूप त्यांना संस्कृतामधून **गीता** प्राकृतांत आणावी लागली. पुराणमताभिमानी पंडितांनीं एकच हलकल्लोळ केला. त्यांतूनच लोककल्याणाकडे दृष्टि देऊन, प्रसंगीं वाटेल त्या हालअपेष्टा सहन करूनहि, त्यांना मार्ग काढावा लागला. जगताचा उद्धार झाला. अशा रीतीनें जगाच्या कल्याणाकरितां साधुसंतांनीं आचारक्रांति घडवून आणल्याचीं इतर किती तरी उदाहरणें देतां येतील.

‘ आजच्या मनूतहि देशहिताच्या दृष्टीनें नवीन पायंडा पाडणें आवश्यक होऊन बसलें आहे. भजनाचीच गोष्ट घे. एक तर गोमातेची अगर इतर जनावरांची चरबी लावलेल्या विलायती अगर देशी गिरण्यांतील सुताचे कपडे अंगांत घालून नाना पंथांची व संप्रदायांची भक्तमंडळी भजन करून परमेश्वराला आळवण्याचा प्रयत्न करितात! ज्या **पांडुरंगानें** कृष्णावतारांत लक्षावधि गोमातांच्या खिल्लारांचें पालनपोषण केलें, त्याच **पंढरीरायाच्या** मूर्तीपुढें त्याच गोमातांच्या चरबीनें अपवित्र झालेल्या वस्त्रानें नटूनथटून नामस्मरण करणें हें त्याचा उपमर्द करण्यासारखें नाहीं काय? अशा भक्तीनें तो गोपालक **गोपाळकृष्ण** कसा प्रसन्न होणार? शेंकडों वर्षें त्याच्या नांवानें टाहो फोडून सुद्धां **हिंदुस्थान** अद्यापि पारतंत्र्यांतच खितपत पडलेलें

आहे हें कशाचें चिन्ह? **विठोबारायाच्या** दरबारांत आमची भक्ति रुजूं नाहीं हें यावरून उघड उघड सिद्ध होत नाहीं काय?

' **दुसरी गोष्ट भजन करण्याची पद्धत.** पूर्वीची गोष्ट सोडून द्या. हल्लीं-च्या मनूंत भजन सांगणारा बोवा एकीकडे घसा फुटेल इतक्या आवाजांत अभंग किंवा पद म्हणतच असतो; तर दुसरीकडे टाळकरी मंडळीहि तितक्याच जोरानें तें म्हणत असतात. तिऱ्हाईत माणसाला त्यावरून कांहींच बोध होत नाहीं! अर्थ कळणें बाजूलाच राहो; पण कोणता अभंग व कोणते शब्द उच्चारले जात आहेत हेंहि बिचाऱ्यांना कित्येकदां कळत नाहीं! या बाबतींत एक फरक झाला तर फारच उत्तम होणार आहे. **' मुखीं नाम, हातीं टाळी । '** याचे ऐवजीं **' मुखीं नाम, हातीं टकळी । '** असा संप्रदाय जर सुरूं झाला तर किती बहार होणार आहे! तोंडानें अत्यंत भक्तिभावानें परमेश्वराचें नामस्मरण अगर साधुसंतांच्या अभंगांचें गायन एकीकडे चालू आहे व दुसरीकडे हातानें टकळीच्या साहाय्यानें सूत कांतलें जात आहे असा देखावा ज्या दिवशीं **महाराष्ट्रांत** घरांत, दारांत अगर देवळांत व राउळांत दिसूं लागेल त्या वेळेला देशाचें दुर्दैव संपलें असें म्हणावयाला हरकत नाहीं.

' वस्त्रस्वावलंबनाच्या बाबतींत यश येण्यासाठीं खेडेगांवांतील लोकांना किंचित् शिस्त लावण्याचा आपण यत्न केला पाहिजे. या बाबतींत प्रभात-फेऱ्यांच्या चालकांनीं जर थोडेंसें लक्ष घातलें तर किती मौज होईल! सूर्यो-दयाच्या पूर्वी उठून तास दीड तासपर्यंत राष्ट्रीय पद्यें म्हणत रस्त्यांमधून हिंडणें या योगानें जागृतीचें काम फारच उत्कृष्ट झालें. आतां यापुढें एक पाऊल टाकण्याची वेळ आलेली आहे. या तास दीड तासाचा उपयोग यापुढें रोज रस्तोरस्तीं व गल्लोगल्लीं फिरण्यांत न करितां ठराविक एका ठिकाणीं नियमानें जमून भजन करीत अगर राष्ट्रीय पदें म्हणत म्हणत जर टकळीवर अगर चरख्यावर सूत कांतण्यांत केला तर प्रपंच व परमार्थ या दोन गोष्टी एकदम साधल्याचें श्रेय मिळणार आहे. एकीकडे पाठांतरहि होईल व दुसरीकडे लागेल तितक्या सुताची निपज होऊन वस्त्र-स्वावलंबनाच्या कार्यांत यश मिळेल. या बाबतींत **एकादशी संघटनेच्या तत्त्वा-वर कार्य झालें पाहिजे!'**

'एकादशी संघटना हें काय प्रकरण आहे?' मीं जिज्ञासापूर्वक विचारलें.

'थांब सांगतों. ऐक. प्रथम आकरा हौशी व उत्साही माणसांनीं नियमित ठिकाणीं सकाळीं जमून तास पाऊण तास सूत कांतावें व त्याच वेळीं तोंडानें अभंग अगर राष्ट्रीय पदें म्हणावींत. पाऊण तास याप्रमाणें केल्यानंतर थोडीशी कवाईत करून राष्ट्रीय झेंडावंदन करावें व मग घरोघर जाऊन आपआपल्या उद्योगाला लागावें. एक महिना याप्रमाणें नियमानें कार्य केल्यानंतर या आकरा कार्यकर्त्यांनीं प्रत्येकीं दहा दहा नवीन उमेदवार माणसें मिळवावींत व आकरा वेगवेगळ्या ठिकाणीं या एकशेंएकवीस असामींनीं सूत कांतणें, भजन, राष्ट्रीय पद्यगायन, कवाईत व झेंडावंदन इतक्या गोष्टी नियमानें कराव्यात. याप्रमाणें एक महिना कार्य झाल्यावर या एकशें एकवीस असामींपैकीं प्रत्येकानें नवीन दहा उमेदवार मंडळी मिळवावींत व त्यांना एकशेंएकवीस ठिकाणीं तिसऱ्या महिन्यांत हें शिक्षण द्यावें. हाच क्रम सर्वंध गांव व शहर संघटित होईपर्यंत पुढें चालवावा व आठवड्यांतून एकदां या सर्वांची मिळून एक अगर अनेक प्रभात-फेऱ्या काढाव्यात व ग्राम अगर नगर-प्रदक्षिणा करावी. एकादशी संघटना म्हणजे काय हें आतां तुला समजलें?'

'भगवन्! ही योजना खरोखरच फार मजेची आहे. या पद्धतीनें कार्यकर्त्यांनीं संघटना केल्यास हां हां म्हणतां राष्ट्र संघटित होऊन स्वराज्य-स्थापनेचें काम त्या मानानें सुलभ होईल.' मी खूष होऊन म्हणालों.

'गोष्ट खरी आहे. 'भाग्यासि काय उणें रे, केल्यावांचून राहिलें!' हेंच खरें. खेड्यांत जे लोक सकाळीं शेतावर जातात, त्यांनीं रात्रीं भोजनोत्तर एक तास व बाकीच्यांनीं सकाळीं एक तास कार्य केल्यास वस्त्रस्वावलंबन सहज साध्य होऊन राष्ट्राला एक प्रकारची शिस्त लागेल. वत्सा! आतां तरी वेळेची अडचण नाहीं ना?' महाराज उद्गारले.

'नाहीं. माझ्या शंकेचें समाधान झालें. पण या पद्धतीनें काम केल्यास, गुरुवर्य! जरूर ती रक्कम कशी उभी राहणार, हें मात्र माझ्या ध्यानांत आलें नाहीं.' मीं प्रश्न टाकला.

'वत्सा! तेंच तुला आतां मी सांगणार आहें—सावधान चित्तानें ऐक.' महाराज म्हणाले. मी अत्यंत जिज्ञासापूर्वक त्यांचे शब्द हृदयसंपुटांत सांठवून ठेवूं लागलों.



---

# ११. हिंदमातामंदिर

‘ नमो देवि ! हिंदमाते ! मंत्र वंदे मातरम् ’

महाराजांच्या तोंडून शब्द बाहेर पडले— ‘ वत्सा ! **हिंदमातामंदिर** हें प्रत्येक गांवांतील सार्वजनिक जीवनक्रमाचें अत्यंत बलवान् असें केंद्र झालें पाहिजे. या मंदिरानें गांवांत कांतलें गेलेलें सूत पिढीजाद तज्ज्ञ कोष्ट्यां-कडून विणून घेतलें पाहिजे. पेळू देणें, सूत कांतून घेणें, तें जमा करणें व कोष्ट्यांकडून विणून घेणें या सर्व गोष्टींवर **मातामंदिराच्या** प्रचारकानें देखरेख केली पाहिजे. त्यानें या सुताचें कापड विणून देण्याबद्दल वारीं चार आणे मजुरी द्यावी. सूत एकसारखें, मजबूत व पीळदार असल्यास वार पन्ह्याच्या एका वारास दीड दोन आण्यांपेक्षां जास्त विणाई पडत नाहीं असा अनुभव आहे. सारांश, वरील चार आण्यांपैकीं वारामागें दोन आणे कोष्ट्याला विणाईबद्दल द्यावेत व बाकीचे दोन आणे ग्रामसंघटनेच्या कार्या-कडे जमा करावेत. होतां होईल तों हे चार आणे धान्याच्या रूपानें घ्यावेत.

‘माणशीं वीस वारांप्रमाणें १२०० वस्तीच्या गांवाला सालिना २४००० वार कापड लागेल, हें मागें सांगितलेंच आहे. वरील हिशेबानें वारीं दोन आणे प्रमाणें २४००० वारांचे ४८००० आणे, म्हणजे ३००० रुपये, दरसाल **मातामंदिरा**कडे जमा होतील. अवर्षण, दुष्काळ, रोगराई वगैरे अस्मानी अगर सुलतानी आपत्ति प्रसंगविशेषीं येणारच; त्यामुळें वरील उत्पन्न कधीं कधीं नियमानें **मातामंदिरा**कडे जमा होणें अशक्य होईल. अशा वेळीं या रकमेची भरपाई करण्यासाठीं **हिंदमातामंदिराच्या** आवारांत कलमी आंब्यांचीं अगर इतर कलमी फळांचीं शेंपन्नास झाडें लावलेलीं असावींत. हे वृक्ष, तशींच शेवगा, चिंच, पोपई, लिंबोण्या, वायपात हीं झाडें, त्याचप्रमाणें **मातामंदिरानें** तयार केलेला साबण, शाई, दंतमंजन, चरखे, फाळके, टोप्या वगैरे जिन्नस, सहकारी दुकान व पेढी, माणशीं आणा, अर्धा आणा याप्रमाणें घेतलेली औषधांची फी, **कॉंग्रेसची** सालाची वर्गणी, **टिळक-स्वराज्य-फंड**, लग्नकार्यादि समारंभाचे वेळीं मिळालेल्या देणग्या वगैरे उत्पन्नांतून या रकमेची भरपाई होण्यास चांगली मदत होईल.’

‘ महाराज ! योजना तर नामी आहे. कल्पनेंतून प्रत्यक्षांत मात्र आली पाहिजे.’ मी म्हणालों. ‘ बरें! समजा, गांवांत इतकी रक्कम उभारली तर तिचा विनियोग कसा करणार?’

‘ तें आतां ओघाओघानेंच सांगतों, श्रवण कर.’ स्वामी म्हणाले. ‘ गांवची सर्वांगीण संघटना करावयाची असेल तर प्रत्येक गांवांत मातामंदिरातर्फे कमींत कमी पांच कार्यकर्ते काम करीत असले पाहिजेत.

( १ ) पहिल्याला आपण मध्यस्थ हें नांव देऊं. याचें शिक्षण बरेंच वरच्या दर्जाचें असलें पाहिजे व त्याला सालिना ४८० रुपये तरी या नाहीं त्या रूपानें पोहोंचते केले पाहिजेत. यानें रोगाची चिकित्सा करून औषधयोजना करावी. सहकारी पेढी, रात्रीची शाळा, पंचाईत, एकादशी संघटना यांवर मातामंदिराचा प्रमुख म्हणून यानें देखरेख केली पाहिजे. लोकजागृति करणें, कायदा, कृषिकर्म, गोरक्षण, पशुसंवर्धन, बींबियाणें, बाजारभाव वगैरे बाबतींत या मध्यस्थानें शेतकऱ्यांस त्यांचें एकरीं उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीनें सल्लामसलत देण्याचें काम केलें पाहिजे. राष्ट्रीय पुढारी, सरकारी लहानमोठे अधिकारी व गांवकरी यांचे कानांवर गांवचीं गाऱ्हाणीं घालणें व इतर मध्यस्थी करणें वगैरे कामाबद्दल हाच जबाबदार राहील. याचें शिक्षण कमींत कमी विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेइतकें तरी झालेलें असावें.

यानंतरचे तीन कार्यकर्ते म्हणजे मुनीम, वस्ताद व देशसेविका. या तिघांस प्रत्येकीं अनुक्रमें सालिना ४२०, ३०० व २४० रुपये तरी पगार असावा.

( २ ) वस्ताद यानें ग्रंथसंग्रह व वाचनालय यांची व्यवस्था ठेवणें, तालीमखान्याची व्यवस्था पहाणें, प्रथमोपचार करणें, ग्रामस्थांस कवाईत शिकविणें वगैरे मन व शरीर यांची योग्य प्रमाणांत वाढ व विकास होण्यास जरूर त्या गोष्टी कराव्यात. (३) तिसरा कार्यकर्ता मुनीम. यानें सहकारी दुकान व खादीकार्य यांची व्यवस्था पहावी. या दुकानांत लोखंडी नांगर, पावार, कुळव, विळे, कोयते, सुतारींचीं हत्यारें, बींबियाणें, रोजच्या व्यवहारांत लागणारीं भांडींकुंडीं, नाडा, सोंदूर, मोटा, चाकपट्टी वगैरे शेतीविषयक उपकरणें, खतें, कापडचोपड, पुस्तकें, पेटंट औषधें, साबण, शाई, दंतमंजन,

स्लेट पाट्या, पंप, हरिकेन कंदील, बादल्या, चऱ्हाटें, काथ्या, वगैरे सामान ठेवावें व सहकारी तत्त्वावर हें दुकान चालवावें. (४) **देशसेविकेचें** काम म्हणजे बाळंतपण, आजार, बालसंगोपन वगैरेंत गांवांतील स्त्रियांस मदत करणें; शिवणकाम, लेखनवाचन, सूत कांतणें, आरोग्यसंरक्षण वगैरेंचें शिक्षण देणें; पुराण सांगणें, भजन करणें व ग्रंथ वाचून दाखविणें हें असेल. या तीनहि कार्यकर्त्यांचें शिक्षण सामान्यतः मराठी सात इयत्तांपर्यंत झालेलें असावें. (५) **पांचवा कार्यकर्ता रक्षक**, यास सालिना १८०रु. पगार असावा. याकडे निरोप, चिठ्याचपाठ्या नेणें आणणें, पहारा करणें, चरखादुरुस्ती व बनावट आणि **मुनीमास** खादीकार्यांत मदत करणें, हें काम सोंपविलेलें असावें. (स्थानिक परिस्थितीप्रमाणें पगारांचें प्रमाण कमीजास्त करावें.)

याशिवाय वरील तीन हजारांच्या रकमेंतून **मातामंदिरा**च्या पेढींत दरसाल ४८० रु. भरणा करावेत. ही संस्थाहि सहकारी तत्त्वावर चालवावी. अत्यंत अडचणीचे वेळीं धान्याचे तारणावर ५० ते १०० पर्यंतच्या रकमा शेतकऱ्यांस थोड्या व्याजानें उसनवार देणें हा या संस्थेचा हेतु असावा. यानंतर सामान्य रोगास लागणारीं औषधें, रात्रींची शाळा, आखाडा व सेवादल, **हिंदमातामंदिर** बांधावयास लागलेल्या रकमेचें व्याज, पंचाईत, ग्रंथसंग्रह व वाचनालय, सहकारी दुकान व खादीकार्य यांसाठीं प्रत्येकीं १०० रुपयांचा खर्च या रकमेंतून दरसाल करावा. प्रत्येक गांवांत **माता-मंदिराचे** जे पांच सेवक असावेत असें वर लिहिलेलें आहे त्यांच्यांत त्यांचें कार्य योग्य रीतीनें बजावण्यास जरूर ती लायकी उत्पन्न होण्यासाठीं एक मध्यवर्ति **देशसंघटनामहाविद्यालय** स्थापन करावें लागेल. या संस्थेच्या खर्चासाठीं प्रत्येक गांवानें तिला वरील रकमेंतून दरसाल १०० रुपयांची मदत करावी.'

'**कार्यकर्त्यांच्या कामाची चांगली कल्पना आली.**' मी म्हणालों. 'पण महाराज! आतां ज्या लहान लहान संस्थांचा आपण उल्लेख केला त्यांचें स्वरूप व कार्य यांचेबद्दल थोडी माहिती सांगाल काय?'

'जरूर! जरूर!' **स्वामींनीं** उत्तर दिलें. 'प्रथम आपण पंचाईत घेऊं. सबंध गांवानें मोठ्या बहुमतानें निवडलेले पांच पोक्त, अनुभविक व सन्मान्य गृहस्थ या पंचाइतीचे सभासद असावेत. गांवांतील सर्व भांडणतंटे

व कज्जेकफावती या पंचांनीं निकालांत काढाव्यात. पूर्वी जातीच्या दराऱ्यानें ज्याप्रमाणें निरनिराळ्या जातींमधील लोक जातगंगेची आज्ञा मोडण्यास धजत नसत व त्यामुळें जातीच्या पंचांच्या विरुद्ध सहसा कोणी जात नसे, त्याचप्रमाणें कालांतरानें या पंचाइतीलाहि एक प्रकारची इभ्रत येऊन तिच्या आज्ञा गांवांतील लोक मानूं लागतील. या पंचांस **मध्यस्थानें** हरएक प्रकारची सल्लामसलत देऊन मोठ्या युक्तीनें त्यांचेकडून कार्य करून घ्यावें. या कार्यांत यश आल्यास गांवगुंडांच्या कारवाईनें गांवांतील भोळसट लोकांचें, आपआपसांत तंटे लागून, जें कल्पनातीत नुकसान होतें तें होण्याचें थांबेल, गांवांतील शेंकडों रुपयांची बचत होईल व लोक हल्लीपेक्षां जास्त गुण्यागोविंदानें व प्रेमानें नांदूं लागतील.

सहकारी दुकानांत कोणते जिन्नस असावेत हें मधांशींच तुला सांगितलें. यानंतरची महत्त्वाची संस्था म्हणजे **आखाडा** व **सेवादल.** कांहीं वेळांपूर्वी लष्करी शिक्षणाच्या आवश्यकतेबद्दल माझें म्हणणें तुला मी सांगितलेंच. त्या शिक्षणासाठीं या संस्थेचा फार उपयोग होईल. **एकादशी संघटनेच्या** तत्त्वावर कार्य झाल्यास गांव हां हां म्हणतां सुसंघटित होईल. प्रत्येक गांवांतील मुलें, मुली, स्त्री व पुरुष या सर्वांची कवाईतशिक्षणाच्या पायावर संघटना झाली पाहिजे. **सेवादलाचा** बॅंड, झेंडा, बिल्ले, लाठ्या वगैरे सर्व सरंजाम व **तालीमखान्यांतील** जोर काढावयाचे हत्ते, जोड्या, डंबेल्स, लेजीम, फुटबॉल वगैरे व्यायामविषयक उपकरणेंही सदैव जय्यत तयार असलीं पाहिजेत.

**रात्रीची शाळा** व तिच्याच जोडीला **ग्रंथसंग्रह** व **वाचनालय** या दोन संस्था अत्यावश्यक आहेत. नुसती **रात्रीची शाळा** काढून व लेखनवाचन व जमाखर्च यांचेंच शिक्षण तिच्यामार्फत देऊन भागणार नाहीं. व्यायामानें शरीर पुष्ट होण्यास ज्याप्रमाणें त्याला आरोग्यदायक सात्त्विक आहाराची जरूरी असते त्याचप्रमाणें साक्षरतेच्या योगें ज्ञानार्जनाची भूक वाढल्यावर योग्य वाङ्मयाचा खुराक पुरविणें ही गोष्टही अत्यावश्यक ठरते. भलतेच ग्रंथ, मासिकें अगर वृत्तपत्रें खेड्यांतील लोकांच्या हातीं पडल्यास इष्ट परिणाम होण्याऐवजीं भलतेच अनर्थ ओढवण्याचा संभव असतो. यासाठीं राष्ट्रीय सद्गुणसंवर्धक असें योग्य **वाङ्मय** खेडेगांवांतील लोकांस पुरविण्याची तजवीज **मध्यस्थानें** केली पाहिजे.

**वरील सर्व संस्था व कार्यकर्त्यांचीं वसतिस्थानें हिंदमातामंदिरांत असावींत.** यासाठीं ज्या ठिकाणीं भरपूर पाण्याची विहीर आहे अशी कमींत कमी एक एकराची जागा **हिंदमातामंदिराकरितां** मिळवावी. एक एकर म्हणजे सरासरीनें २०० फूट लांब व २०० फूट रुंदीची जागा होते. या जागेंत १०० फूट लांब व १०० फूट रुंद अशी एक चौसोपी इमारत, अत्यंत थोडक्या खर्चांत बांधून मधोमध ५० फूट लांबीरुंदीचें सभांगण तयार करावें. या सभांगणाच्या मधोमध तीन फूट चौरसचौरस व तीन फूट उंच असा एक दगडी अगर चुनेगची चौथरा बांधून त्याच्या मधोमध राष्ट्रीय झेंडयाचा खांब पुरावा. इमारतीच्या एका बाजूला मुख्य दरवाज्यासमोर मधोमध ३२ फूट लांब व १६ फूट रुंद एवढें दालन असावें. या दालनांत मधोमध **हिंदमातेची** मूर्ति अगर तसबीर ठेवावी. भोंवतालीं प्राचीन व अर्वाचीन प्रसिद्ध विभूतींच्या तसबिरा भिंतीला टांगाव्यात. या विभूतींची निवड करतांना कोणच्याहि एका विशिष्ट धर्माबद्दल, पंथाबद्दल अगर संप्रदायाबद्दल पक्षपाताची बुद्धि ठेवूं नये. या दालनांत सर्वांस प्रवेश असावा. **स्पृश्यास्पृश्य, हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, ज्यू, स्त्री अगर पुरुष, श्रीमंत अगर गरीब** असा भेदाभेद ठेवूं नये. शारीरिक स्वच्छता एवढीच कसोटी ठेवावी. याच ठिकाणीं **हिंदमातेला** साक्षी ठेवून पंचांनीं गांवांतले तंटे तोडावेत. येथेंच विभूतींचे तसबिरीचे खालीं ग्रंथसंग्रहाचीं कपाटें ठेवावींत. या दालनाच्या पुढची पडवी अर्धलंबवर्तुलाकार असावी; व तिचा, सभा, राष्ट्रीय उत्सव वगैरे प्रसंगीं वक्त्यांना भाषण करण्यासाठीं व अध्यक्ष आणि निमंत्रित पाहुणेमंडळी बसण्यासाठीं ओटा ( प्लॅटफॉर्म ) म्हणून उपयोग करावा. या दालनाच्या दोन्ही बाजूंला कार्यकर्त्यांना राहण्यासाठीं खोल्यांची व्यवस्था करावी; व बाकीच्या इमारतींत **पिंजण व चरखागृह, सहकारी दुकान, सहकारी पेढी, रात्रींची शाळा, तालीमखाना, कोठार** व **दवाखाना** यांच्यासाठीं स्वतंत्र खोल्या असाव्यात.

भोंवतालच्या पटांगणांत चारी बाजूंला सारख्या अंतरावर कलमी आंब्याचीं अगर इतर उत्पन्न देणारीं झाडें लावावींत व घायपाताचें कुंपण असावें. एक एकरापेक्षां जास्त जागा मिळाल्यास तेथेंहि कायमच्या उत्पन्नाचीं झाडें लावून त्यांसाठीं प्रारंभीं जरूर ती मेहनत घ्यावी. उद्देश हा कीं, वस्त्रस्वावलंबनाच्या रहाटगाडग्याला यानें मदत व्हावी.

वत्सा! आतांपर्यंत जें आपलें भाषण झालें अगर पुढें होईल त्याचा संक्षिप्त अहवाल येथून बाहेर पडल्यावर इतर कार्यकर्त्यांच्या फायद्यासाठीं तूं प्रसिद्ध करावास, अशी माझी तुला आज्ञा आहे.

त्या अहवालाबरोबरच ग्रामसंघटनेच्या जमाखर्चाची वाचकांस चटकन् कल्पना यावी यासाठीं त्या जमाखर्चाचें ठोकळ मानानें एक अंदाजपत्रकहि त्वां प्रसिद्ध करावें.'

'जरूर, जरूर. आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे.' मीं लगेंच उत्तर दिलें.

## — वरील आज्ञेप्रमाणें तयार केलेलें अंदाजपत्रक —

| रु. आ. पै | जमा | रु. आ. पै | खर्च |
|---|---|---|---|
| | | ४८० | मातामंदिर-पेढी |
| ३००० | १२०० वसतीच्या गांवास लागणाऱ्या माणशीं २० वार या हिशेबानें २४००० वारां-पासून वारामागें दोन आणे घेऊन जमा झालेली रक्कम. इतर उत्पन्नाचाहि यांतच समावेश केलेला आहे. | ४८० | मध्यस्थ |
| | | ४२० | मुनीम |
| | | ३०० | वस्ताद |
| | | २४० | देशसेविका |
| | | १८० | रक्षक |
| | | १०० | सहकारी दुकान |
| | | १०० | ग्रंथसंग्रह व वाचनालय |
| | | १०० | तालिमखाना व सेवादल |
| | | १०० | रात्रींची शाळा |
| | | १०० | खादीकार्य |
| | | १०० | हिंदमातामंदिर बांधण्यासाठीं उसनवार रकमेचें व्याज |
| | | १०० | पंचाईत. |
| | | १०० | देशसंघटना–महाविद्यालय |
| | | १०० | औषधें |
| ३००० | एकूण जमा | ३००० | एकूण जमा |

'**महाराज**! अजून एक दोन शंका आहेत; विचारूं कां?' मीं प्रश्न केला. **स्वामी म्हणाले,** 'बाबा! कांहींहि मनांत ठेवूं नकोस. आज शंकासमाधानाची पर्वणी आहे. सर्व शंका फेडून घे.'

'**एक शंका अशी कीं,** आपल्या म्हणण्याप्रमाणें २४००० वार कापडाची मजुरी शक्य तों धान्याच्या रूपानें घ्यावयाची. असें केलें तर हे सर्व पगार कसे देतां येतील व निरनिराळ्या खात्यांचा खर्चहि कसा करतां येईल? त्यासाठीं तर रोख रकमा खर्च कराव्या लागतील.' मी म्हणालों.

**स्वामी थोडे विचारांत पडले;** पण ही त्यांच्या मनाची अवस्था फार वेळ टिकली नाहीं. एखादें अर्धे मिनिट जातें न जातें तोंच ते म्हणाले, 'एवढीच शंकाना? अरे! ही अडचण दूर करण्याकारितां शहरगांवीं अगर तालुक्याच्या ठिकाणीं **हिंदमातामंदिराचें** एक धान्याचें दुकान काढलें म्हणजे झालें. या दुकानावर लोकांच्या उड्या पडल्याशिवाय रहाणार नाहींत. प्रश्न मिटला. असो.

आतांपर्यंत ग्रामसंघटनेचें कार्य म्हणजे काय, ती कोणीं करावी, कार्यकर्त्यांच्या आंगीं कोणते कोणते गुण असावयास पाहिजेत, त्यांच्यामध्यें कामाची वांटणी कशी करावी, या कार्यास लागणारा पैसा कोठून आणावा वगैरे प्रश्नांचा आपण ऊहापोह केला. या सर्व विवेचनाचें तात्पर्य हें कीं, प्रत्येक गांवांत एक नवीन **सार्वजनिक देवस्थान** आपणांस उत्पन्न केलें पाहिजे. या देवस्थानाची अधिष्ठात्री देवता **हिंदमाता** ही असेल व **मध्यस्थ, वस्ताद, मुनीम, रक्षक,** व **देशसेविका** ह्या पांच कार्यकर्त्यांनीं या नवीन देवस्थानाचें सेवक म्हणून काम केलें पाहिजे. प्राचीन कालीं अनेक पुण्यपुरुषांनीं आपल्या पुण्याईच्या जोरावर नवीन देवस्थानें उत्पन्न केलीं व त्या वेळच्या श्रद्धावान् लोकांनीं त्यांस स्वतंत्र उत्पन्नें तोडून दिलीं. **हिंदु राजांनीं** मशिदींस व **मुसलमान बादशहांनीं** मंदिरांस गांवेंचीं गांवें इनामें म्हणून दिल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत. त्या इनामांवर अगर उत्पन्नांवर आजतागायत या सर्व देवस्थानांचे खर्च अव्याहतपणें चालू आहेत. अशी स्थिति कालांतरानें प्रत्येक खेडेगांवांतील या नूतन देवस्थानांची झाली पाहिजे. देवस्थानांच्या कार्यकर्त्यांनीं अशा तऱ्हेनें आपली वृत्ति व धोरण ठेविलें पाहिजे कीं, त्यांच्या व देवस्थानच्या कार्याच्या उपयुक्ततेबद्दल ग्रामस्थांची

खात्री होऊन देवस्थानावर त्यांची श्रद्धा बसेल व त्या योगानें आपोआपच गांवाच्या लहानमोठ्या दानधर्माचा ओघ हिंदमातामंदिराकडे वळून वस्त्रस्वावलंबनाच्या योगानें होणाऱ्या उत्पन्नाला चांगली मदत होईल. मात्र देवस्थानच्या सेवकांनीं त्यावर अवलंबून राहतां कामा नये. सध्यांचा काल लोकशाहीचा व स्वावलंबनाचा आहे. इतरांच्या देणग्यांवर अवलंबून राहून आपलें आचार व विचारस्वातंत्र्य गमावून बसण्याची पाळी त्यांच्या-वर केव्हांहि येतां कामा नये. असो. आतां यापुढें येथें जास्त बसण्याला मालकाची मला आज्ञा नाहीं. मला आतां माझ्या नित्यकर्माला लागलें पाहिजे. आतां आम्ही आपल्या गांवाला जातों......' असें म्हणून स्वामींनीं अत्यंत प्रेमळ अशा दृष्टीनें माझ्याकडे बघितलें.

---

## १२. प्रतिज्ञा

साक्षी ठेवुनियां । तव पाय । सतत करूं जनकार्य ॥
स्वराज्यकार्यातें । यश द्यावें । पैलथडीं त्वां न्यावें ॥

—शून्यानंद.

तेरेहि काम आवूं । तेराहि मंत्र गावूं ॥
मन और देह तुझपर । बलिदान मै चढावूं ॥

—स्वामी सत्यदेव.

'आतां आम्हीं आमच्या गांवाला जातों ...' हे शब्द महाराजांच्या तोंडांतून इतक्या अकल्पितपणें बाहेर पडले कीं, शरीरावर एकाएकीं एखाद्या प्रचंड अशा शिलाखंडाचा आघात झाल्याचा मला भास झाला. भयभीत होऊन मी लगेच म्हणालों, ' छे:! छेः! महाराज! दया करा. असें करूं नका. ' माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा सुरू झाल्या. पूर्वपुण्याईनें अशा थोर विभूतीच्या दर्शनाचा लाभ झाला व त्याला आतां आपण मुकणार ही कल्पना मनांत येतांच माझ्या काळजानें ठाव सोडला. मनाला अत्यंत

वाईट वाटलें व मी धाडकन् त्या शिळेवर साष्टांग दंडवत घालून खालील अर्थाची प्रार्थना करूं लागलों:—' **दीनदयाळा! भक्तवत्सला!** एकदम या बालकावर असा कां राग केला? या पामराच्या हातून कांहीं अपराध तर नाहींना घडला? घडला असल्यास क्षमा करावी.'

माझ्या नेत्रांतून चालू झालेल्या अश्रुधारांनीं सर्व शिळा भिजून चिंब झाली! मी पुढें कांहीं बोलणार तों कोणीतरी माझ्या मस्तकावर हात ठेवल्याचा मला भास झाला. त्या हाताचा स्पर्श होतांच विजेचा धक्का बसावा त्याप्रमाणें माझी स्थिति झाली. माझ्या शरीराचे यच्चयावत् सारे परमाणू एकदम बदलून गेल्यासारखें मला वाटलें. शरीरांत नवचैतन्याचा प्रवाह सुरू होऊन आपादमस्तकापर्यंत एखाद्या जादूगारानें माझा स्थूल व सूक्ष्म देह कांहीं तरी मोहिनी टाकून भारून टाकल्याप्रमाणें त्याची अवस्था झाली. माझें अंतःकरण सद्गदित झालें, मी खडबडून उठलों व पुढें होऊन **महाराजांचे** पाय धरणार तों काय आश्चर्य! समोर **बजरंगाच्या** मूर्तीशिवाय दुसरें कांहींच नाहीं! मेल्यापेक्षांहि मी मेला झालों. जागच्या जागींच निपचीत पडलों. तों अत्यंत धीर गंभीर अशा वाणीनें खालील शब्द माझ्या कानांत कोणीतरी गुणगुणल्याचा मला भास झाला.

' **बाळा! वाईट वाटूं देऊं नकोस.** अरे! आम्ही **रघुनाथाचे** सेवक. समर्थाचाहि समर्थ जो **रघुपति**-'**त्याचे आम्हीं सेवकजन। सेवेकरितां झालें ज्ञान। तेथें अभाव धरितां पतन। पाविजेल कीं॥** ' आम्हांला त्याची आज्ञा मोडतां येत नाहीं. यापुढें तुला माझें प्रत्यक्ष दर्शन होणें कठीण. या कार्यासंबंधानें अजून पुष्कळ माहिती तुला मिळविण्याची इच्छा होईल. आजच्या रात्रीं तूं येथेंच मुक्काम कर. **बजरंगबलीची** प्रार्थना कर. **रघुपतीचा** तुझ्यावर वरदहस्त आहे. काळजी करूं नकोस. प्रहर रात्र होतांच **बजरंगा**पुढें एक पोथी येऊन पडेल. तींत तुझ्या सर्व शंकांचें समाधान केलेलें तुला आढळून येईल. तेथेंच तुला एक नारळ व एक कंद सांपडेल. नारळ प्रसाद म्हणून घे. कंदाचें सेवन कर. तुझ्या क्षुधेचें शमन होईल. रात्रभर शिळेवरच पडून रहा. पहांटे उठून पुन्हां एकदां **बजरंगाचें** ध्यान कर. मूर्तीसमोरच्या भिंतीत डाव्या कोंपऱ्यांत एक चौकोनी दगड बसविलेला तुला सांपडेल. त्याला एक कडी आहे. गंजून गेलेली आहे. ती धरून तुझ्या बाजूला ओढ.

त्या ठिकाणी तुला एक अरुंद वाट आढळून येईल. सुमारें दोनशें कदम तुला वांकून चालावें लागेल. नंतर वाट जास्त रुंद होत जाईल. पुढचा मार्ग तुला आपोआप सांपडेल. परमेश्वर तुझें कल्याण करो.'

वरील हकीकत झाल्यानंतर सुमारें एक तासपर्यंत मी तसाच त्या शिळेवर निश्चित पडून राहिलों असलों पाहिजे. नंतर मी उठून उभा राहिलों. विजेची बत्ती ( Torch) लावली. घड्याळांत पाहिलें तों सायंकाळचे सात वाजून अठरा मिनिटें झालेलीं होतीं. मीं लगेच अंगावरचे कपडे काढले. लंगोट कसलेला होताच. लोट्यानें टांक्यांतून पाणी काढून स्नान केलें व पंचानें अंग पुसून बजरंगाला साष्टांग नमस्कार घातला. मानसपूजा केली व नंतर प्रहर रात्रीपर्यंत शिळेवर पद्मासन घालून हनुमंताचें ध्यान केलें. प्रहर रात्र होतांच डोळे उघडले. पाहतो तों खरोखरच बजरंगाच्या पुढें एक पोथी, एक नारळ व एक लिंबाएवढा कुठल्या तरी वनस्पतीचा कंद, हे तीन जिन्नस मला दिसले. माझें मन कांहीं आश्चर्य, किंचित् भीति व नंतर अतिशय आनंद या तीन भावनांनीं भरून गेलें. मीं पुन्हां एकदां मारुतीरायाला साष्टांग नमस्कार घातला. त्या तीनहि वस्तूंचें अवग्राहण करून किंचित् कालपर्यंत त्या मीं मस्तकावर धारण केल्या व नंतर पुन्हां शिळेवर येऊन बसलों, पोथी उघडली व आंतील मजकुराचें पठण केलें. आश्चर्याची गोष्ट ! त्या पोथींत स्वावलंबी ग्रामसंघटनेची योजना, अंमलबजावणी, फलश्रुति, द्यावी लागणारी किंमत व कार्याची सांगता यांबद्दल इतकें तपशीलवार विवेचन केलेलें होतें कीं, तें वाचून मी थक्कच झालों. विशेष नवलाची गोष्ट ही कीं, तींत हिंदमातामंदिराचा नकाशाहि स्केलपट्टीप्रमाणें दिलेला होता. मला तो सर्व मजकूर वाचायला पाऊण तास लागला. नंतर मी उठलों, व त्या कंदाचें सेवन केलें. कारण या वेळीं माझ्या पोटांत भुकेनें चांगलेंच काहूर केलेलें होतें. कंद लहानशा लिंबाएवढाच होता. पण आश्चर्यांत आश्चर्य हें कीं, त्याचें सेवन करतांच पंचपक्वान्नाचें भोजन करून जितकें समाधान होईल त्यापेक्षांहि शतपटीनें जास्त समाधान माझ्या चित्ताला झालें. नारळ प्रसाद म्हणून मीं पिशवीमध्यें घातला, कपडे चढविले व थोडेंसें भजन करून त्या शिळेवरच लवंडलों, तों पहांटे साडेचारला जागा झालों. इतकी गाढ झोंप कितीतरी वर्षांत लागल्याचें माझ्या आठवणींत नव्हतें. मी उठलों,


मुखप्रक्षालन केलें, व बजरंगाला साष्टांग नमस्कार घालून महाराजांच्या आज्ञेप्रमाणें पुढील उद्योगाला लागलों. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें एका कोंपऱ्यांत कडी असलेला चौकोनी दगड सांपडला. कडी अगदींच गंजून गेलेली होती. दगडाच्या भोंवतालच्या चिरा धुळीनें भरून गेलेल्या होत्या. त्या चिरा कोंपऱ्यांतील एका तलवारीच्या टोंकानें मीं साफ केल्या, व हातानें कडी धरून आपल्याकडे जोरानें दगड ओढला. पांच चार मिनिटें तरी त्या दगडाशीं मला झोंबी खेळावी लागली. सरतेशेवटीं तो दगड काढून मी खालीं ठेवतों तों काय चमत्कार! जिकडे तिकडे चंदन व चाफा या दोहोंच्या मिश्र अशा सुवासानें वातावरण दरवळून गेलें, व एकाएकीं एक प्रचंड फूत्कार माझ्या कानीं आला. माझी भीतीनें गाळण उडून गेली! ताडकन एका बाजूला उडी मारून मी भिंतीला बिलगून उभा राहिलों. कारण दगड काढल्याबरोबर त्या विवरामधून एक प्रचंड पिवळाधमक नाग सपाट्यासरशीं गुहेंत शिरला. पोटरीइतका तरी तो जाड असून त्याची लांबी सुमारें दहा ते पंधरा फूट असावी. त्यानें फणा काढलेली होती व त्या फणेवर अत्यंत तेजःपुंज असा एक माणि चकाकत होता. नागराजांची स्वारी दृष्टि ठरते न ठरते इतक्या वेगानें त्या शिळेवर जाऊन बजरंगापुढें वेटोळें घालून बसली; फणा पसरलेली होती व शिळेपासून सरासरी एक हात वर शरीराचा भाग काढून स्वारी सुमारें दोन अडीच मिनिटें सारखी डुलत होती. आश्चर्याची गोष्ट ही कीं, वस्तुस्थिति असो किंवा नुसता भास असो, त्या नागाच्या फणेवरील मण्याच्या प्रकाशांत एखाद्या सिनेमाच्या चित्रपटावर अक्षरें दिसतात त्याप्रमाणें '**आमुची प्रतिज्ञा ऐशी। कांहीं न मागावें शिष्यांसी। आमुच्या मागें जगदीशासी। भजत जावें॥**' हीं अक्षरें मला दिसलीं. नंतर त्या नागानें बजरंगाला तीन प्रदक्षिणा घातल्या व तो टांक्याच्या बाजूला जाऊन कोठें नाहींसा झाला, तें मला समजलें नाहीं. आजचा सर्वच दिवस चमत्कारांचा होता. त्यांतलाच हा एक प्रकार, अशी मनाची समजूत करून घेऊन मी त्या विवरांतून बाहेर पडलों.

**स्वामींनीं** सांगितल्याप्रमाणें दीडदोनशें कदम मला वांकूनच जावें लागलें. पुढें मार्ग जरा मोठा होत होत गेला. अनेक वळणें घेत घेत पंधरा एक मिनिटांनीं मी डोंगरांतल्या एका खबदाडांत येऊन पोहोंचलों. या कपारीन्तें

तोंड काट्याकुट्यांनीं आच्छादून गेलेलें होतें. तें मोकळें करून बाहेर पडायला मला फारच त्रास पडला. कांट्यांनीं अनेक ठिकाणीं माझें अंग ओरबडलें व शेवटीं मी बाहेर पडलों. जवळच स्फटिकासारख्या स्वच्छ अशा पाण्याचा एक लहानसा ओढा झुळुझुळूं वहात होता. शौचमुखमार्जनादि विधि उरकून मीं स्नान केलें व संध्यावंदन आटोपल्यावर **सूर्यनारायणाला** नमस्कार करून स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या कार्याला आजन्म वाहून घेण्याची प्रतिज्ञा केली व परत **महाबळेश्वरीं** येऊन **पुण्याचा** मार्ग धरला.

यापुढें त्या पोथींतील नकाशा व मजकूर जशाचा तसा दिलेला आहे.

## हिंदमातामंदिराचा नकाशा



## नकाशाचा खुलासा

| | |
|---|---|
| १ हिंदमातामंदिर | १९ तालिमखाना |
| २ पंचाईतकचेरी | २० कोठार |
| ३–७ वस्तादगृह | २१ दवाखाना |
| ८–१२ मुनीमगृह | २२–२५ सेविकागृह |
| १३ पिंजणगृह | २६–३१ मध्यस्थगृह |
| १४ चरखागृह | ३२ सभांगण |
| १५–१६ सहकारी दुकान | ३३ राष्ट्रीय झेंडा |
| १७ ग्रामपेढी | ३४ विहीर |
| १८ रात्रीची शाळा | आम्रवृक्ष ५५ |

---

( पोथींतील मजकूर )

# १३. स्वावलंबी ग्रामसंघटनेची फलश्रुति

भगवा, हिरवा एकचि व्हावे भोगुनि कलिदंडा । सारख्या ।
ऐक्यबळें या होइल विजयी हिंदराष्ट्र-झेंडा ॥
मिळवूनि भाइभाई । जुळवूनि लोकशाही ॥ करूं वंद्य सर्व खंडां ॥
नवहिंदराष्ट्रझेंडा ॥ —सेनापति बापट.

स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या योजनेचा खटाटोप करून शेतकऱ्याला व देशाला काय मिळणार? फायदा कोणता होणार? या प्रश्नाचें उत्तर देतांना भारताच्या प्राचीन इतिहासाचें अल्पसें सिंहावलोकन करणें जरूर आहे.

आर्यावर्तांत इंग्रजी राज्य सुरूं झाल्यानंतरची परिस्थिति व पूर्वींची परिस्थिति यांची निर्विकार मनानें तुलना केली असतां एक गोष्ट स्पष्टपणें आढळून येते. ती ही कीं, पूर्वीं प्रत्येक खेडेगांवांत तेथील स्थानिक अधिकारी जे पाटील, पटवारी, देशमूख, देशपांडे अगर देसाई यांस

एक विशेष प्रकारचें महत्त्व होतें. त्यांचा दर्जाहि फार उच्च प्रकारचा होता. एका अर्थानें हे लोक आपापल्या गांवापुरते राजेच होते. यांच्या हुकमतीखालीं अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य, न्यायदान, शांततासंरक्षण अगर परचक्रनिवारण या व समाजसुस्थितीला आवश्यक अशा यांखेरीज इतर अनेक गोष्टींसंबंधींचीं कामें गांवांतल्या गांवांत बिनबोभाट रीतीनें होत असत. प्रत्येक गांव हें स्वतंत्र व स्वावलंबी असे. तें एक प्रकारचें सतस्वावलंबी प्रजासत्ताक राज्यच होतें. राजा कोणीहि असो——मग तो **रायगडचा छत्रपति** असो, **विजापूरचा अल्ली आदिलशहा** असो, किंवा **दिल्लीचा जहांगीर** असो——त्याचेकडून गांवच्या अंतर्गत कारभारांत विशेषशी ढवळाढवळ होत नसे.

शिक्षणाचें कार्य गांवांतील ब्राह्मण, उपाध्याय अगर तात्या पंतोजी करीत असत. हरिदास, पुराणिक, मठपति, साधुसंत वगैरे मंडळी सार्वत्रिक जागृति करण्याचें काम करीत. चातुर्वर्ण्याच्या पद्धतीमुळें प्रत्येक जातींतील अगर धंद्यांतील मुलांस त्या त्या धंद्याच्या प्रयोगशाळेंतच लहानपणापासून त्या त्या धंद्याचें व्यावहारिक शिक्षण मिळे. व्यापाऱ्याचें दुकान व सुतार, लोहार, चांभार, सोनार वगैरेंचे कारखाने हेंच ते ते धंदे शिकूं इच्छिणाऱ्या उमेदवारांचे बाबतींत त्या त्या धंद्यांच्या शिक्षणाच्या पाठशाळांचें कार्य करीत.

आरोग्यरक्षणाची व शरीरसंवर्धनाची व्यवस्थाहि गांवांतल्या गांवांतच होत असे. तालीम, नियमित आहार व विहार वगैरे बाबतींत कडक शिस्त पाळण्याची संवय लहानपणापासूनच आईबाप अगर गुरुजी यांचेकडून मुलांना अगर मुलींना लावली जात असे. गोधन मुबलक असल्याकारणानें दुधातुपाची रेलचेल होती. धनधान्यादिकांच्या समृद्धीमुळें उदरनिर्वाहाची काळजी नसे. पराक्रम करून आपापल्या धंद्यांत अगर पेशांत नांव कसें कमावतां येईल येवढीच चिंता उमेदवारांना असे. त्यामुळें रोगांचें मानच हल्लींपेक्षां पुष्कळ कमी होतें. क्वचित् प्रसंगीं शरीरप्रकृतींत बिघाड झाला तर त्या संकटाचें निवारणहि अत्यंत अल्पखर्चामध्यें होण्याची व्यवस्था त्या वेळीं होती. गांवांतील बहुतेक पोक्त स्त्रीपुरुषांस सहजसाध्य अशा उपायांची व सहजप्राप्य अशा वनस्पतींची माहिती असे. त्यामुळें आरोग्यरक्षणाचें काम हल्लींपेक्षां पुष्कळ पटींनीं सुलभ व कमी खर्चाचें असे. शरीराची उंची, छातीची

रुंदी, डोळ्यांचें तेज, मनगटांचा जोर व जाडी वगैरे बाबतींत त्या वेळच्या व हल्लींच्या स्त्रीपुरुषांची तुलना केली तर त्यांत जमीनअस्मानाचें अंतर दिसून येईल. त्या वेळची लोकांची आयुर्मर्यादाहि हल्लींच्या मानानें पुष्कळ जास्त होती.

**न्यायदानाचें काम हल्लींपेक्षां पुष्कळच कमी खर्चाचें व त्रासाचें होतें.** या बाबतींत मोठ्या दुःखानें असें म्हणावें लागतें कीं, हल्लींच्या लोकांपेक्षां त्या वेळच्या लोकांची दानत फारच श्रेष्ठ दर्जाची होती. स्टँपाच्या कागदावर करारमदार लिहून देणें, ही गोष्ट त्या वेळीं लोकांना माहीत नव्हती. बजरंगबलीचे पाय हाच त्या वेळचा स्टँप होता. त्यामुळें करारमदार पाळण्याच्या बाबतींत लोक अत्यंत पापभीरु असत; बहुतेक खटले गांवांतल्या गांवांतच पंचांच्या मार्फतीनें तोडले जात. **स्मॉलकॉज, डिस्ट्रिक्ट व सेशन कोर्टें, हायकोर्ट आणि प्रिव्ही कौन्सिल,** ही कचेऱ्यांची परंपरा त्या वेळच्या लोकांना माहीत नव्हती. त्यामुळें लोक या बाबतींत पुष्कळच सुखी होते.

**शांततासंरक्षण** व **परचक्रनिवारण** ही बाबतहि अशीच हल्लींपेक्षां जास्त स्वाभिमानाची व कमी खर्चाची होती. शिलेदारी, बारगिरी वगैरे संप्रदाय प्रचलित असल्याकारणानें जनतेंत लष्करी बाणा कायम होता व स्वतःच्या पराक्रमाच्या जोरावर अटकेपर्यंत झेंडे फडकावण्याची महत्त्वाकांक्षा बाळगण्याला तरुण पिढीला त्या वेळीं वाव होता.

**इंग्रजी राज्याच्या बदललेल्या मनूंत ही सर्वच परिस्थिति आमूलाग्र पालटून गेलेली आहे.** पाटील, कुलकर्णी, तलाठी, वेसकर आदिकरून सर्व गांवकारभारी आज सरकारचीं नामधारी, कळसूत्रीं बाहुलीं बनून गेलेलीं आहेत. इंग्रजी अमदानीपूर्वी गांवांतल्या गांवांतच कमी श्रमानें व अल्प खर्चानें होणारीं सर्व कामें सरकारनें आज आपल्या हातीं घेतलेलीं असून गांवाला त्याबद्दल उत्पन्नाच्या मानानें जबरदस्त भूर्दंड शेतसाऱ्याच्या रूपानें सरकारला द्यावा लागत आहे. पाटलाची गढी पूर्वीच्या अमदानींत गांवापुरतें राजसत्तेचें जिवंत केंद्र असे. कारभाराचीं सर्व सूत्रें तेथून हलविलीं जात असत. या गढ्या आज छिन्नविच्छिन्न झाल्या असून त्यांचेवर निवडुंगाचीं रानें वाढलेलीं आहेत. त्यांचे पडके बुरूज व ढांसळलेल्या वेशी केंविलवाण्या मुद्रेनें येणाराजाणारांकडे पाहून आपलें हृदयद्रावक वृत्त त्यांना कळवीत

आहेत. उंदीर, घुशी, कोल्हीं व डुकरें यांनीं तेथें आपला तळ दिलेला असून या गव्यांच्या मालकांकडे वरिष्ठांना खूष करण्याकरितां अगर पोटाची खळगी भरण्याकरितां गोरगरिबांना छळणें व प्रसंगविशेषीं अधिकारी बहाद्दुरांच्यासाठीं, ते दौऱ्यावर आले असतां, कोंबड्या, बकरीं, सर्पणकांटी, दूधतूप, चहापाणी, गाडीघोडा वगैरेंची तरतूद करणें एवढींच कामें राहिलीं आहेत. न्यायदानाचें काम अत्यंत दीर्घसूत्रीपणाचें व महागडें झालें असून तें योग्य प्रकारानें बजावलेंहि जात नाहीं. भावांभावांतील कज्जे क्षुल्लक कारणावरून प्रिव्ही कौन्सिलपर्यंत गेल्यामुळें कित्येक घरांदारांना कुलुपें लागलीं आहेत, अगर अनेक इस्टेटींचे लिलांव होऊन वास्तु-देवतेवर नांगर फिरले आहेत. '**भित्यापाठीं ब्रह्मराक्षस**' ही म्हण हल्लींच्या खेडेगांवांत जितकी सार्थ झालेली दिसते, तितकी इतरत्र क्वचितच तशी झालेली आढळून येईल. धरावें तर चावतें, सोडावें तर श्रापतें अशी स्थिति आज न्यायार्थ्यांची झालेली आहे. अथपासून इतिपर्यंत लांचलुचपतीचें येवढें प्रचंड साम्राज्य स्थापन झालेलें आहे कीं, त्याच्या जुलमापुढें मोठमोठ्या साम्राज्यांचा जुलमहि फिक्काच ठरेल.

**शिक्षणाच्या बाबतींतहि हीच रड.** दीडशें वर्षें इंग्रजी राज्याला झालीं तरीहि अजून शेंकडा नव्वदांवर लोक निरक्षर! बरें, ज्यांच्यावर सरस्वती-देवीचा प्रसाद झालेला आहे त्यांना खेडीं सोडून शहरांत जाण्याची इच्छा होते; काम करण्याची लाज वाटते; नांगर धरणें, कुळव चालविणें, कोळपणें, व पेरणी, कांपणी करणें वगैरे कामांला ते नालायक असलेले आढळून येतात; ऊन, थंडी अगर वारा त्यांना सहन होत नाहीं. निढळाच्या घामानें शेतांत खपून भाकरी मिळविण्यापेक्षां त्यांना पट्टेवाल्याची नोकरी जास्त प्रिय वाटते. पुष्कळदां असें वाटतें कीं, दिवसाच्या सर्व शाळा बंद करून शेतकऱ्यांच्यासाठीं रात्रींच्या शाळा उघडल्या व त्यांत त्यांना व्यवहारास उपयोगी एवढेंच शिक्षण दिलें तर त्यांचेवर फार उपकार होतील.

**हीच स्थिति आरोग्याची.** बहुतेक ठिकाणीं पाणी दुर्मिळ! असेल तें गलिच्छ झालेलें असावयाचें. धुणें, स्नान करणें व पाणी भरणें, सर्वच व्यवहार एका ठिकाणीं! अशा स्थितींत नारायणदेवाचा ( नारूचा ) अंमल अनेक ठिकाणीं आढळल्यास नवल तें काय? महामारी, एन्फ्ल्युएन्झा,

हिंवतापें हेहि आजार जिकडेतिकडे लोकांना सतावून सोडतांना आढळतात.
**‘ प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा । नृपा ! तूं करी फार सांभाळ याचा ॥ ’**
या उपदेशाची आठवण राज्यकर्त्यांना केव्हांच होत नाहीं.

**शांततासंरक्षण व परचक्रनिवारण या बाबतींतहि मोठा अभिमान वाटण्याजोगा प्रकार आढळून येत नाहीं.** कित्येकदां चोरीमारी झाली व पोलिसकचेरींत वर्दी दिली, तर जें कारवाईचें सत्र सुरू होतें त्यामुळें ‘ भीक नको पण कुत्रा आवर ’ अशी स्थिति अनेक ठिकाणीं झाल्याचे दाखले आढळून आलेले आहेत. परचक्रनिवारणाच्या नांवाखालीं जो एकदां कोट्यवधि रुपयांचा बोजा शेतकऱ्याच्या पाठीवर देऊन ठेवलेला आहे तो अजून कमी होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. **मराठे, मोंगल, रजपूत** वगैरेंच्या वंशजांना परक्यांच्याकडून आपल्या बायकापोरांच्या अब्रूचें व जमीनजुमल्याचें रक्षण करून घेण्याची पाळी यावी, यापेक्षां आणखी दुसरें दैवदुर्विलसित कोणतें असूं शकेल ?

**स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या** योजनेनें हा उलटा प्रकार आमूलाग्र बदलून टाकतां येऊन प्रत्येक सुसंघटित गांव प्रांतिक अगर मध्यवर्ति सरकारच्या हुकमतीखालीं अंतर्गत राज्यकारभारापुरतें स्वतंत्र असें लोकच्छंदानुवर्ति सत्तस्वावलंबी स्वराज्य होऊं शकेल. पूर्वीप्रमाणें गांवांतील लोकांनीं निवडलेल्या पंचांकडून खटले तोडून घेतां येतील व एकहि खटला शिवाराच्या बाहेर जाणार नाहीं, अशी व्यवस्था होऊं शकेल. **एकादशी संघटनेच्या** तत्त्वावर साक्षरतेचा प्रसार करितां येईल. प्रत्येक गांवांत शेंदोनशें जवान लष्करी शिक्षण देऊन तयार केल्यास परचक्रनिवारणाच्या कार्यासहि त्यायोगानें मदत होईल. ग्रामसंस्थेच्या **वस्तादानें** या कामाची जबाबदारी घेतली पाहिजे लष्करांतील पेन्शनींत निघालेल्या अनुभविक शिपायांकडून हें **वस्तादाचें** काम कदाचित् होऊं शकेल. एवढी गोष्ट झाली तर आज साठ कोटींवर होणारा भयंकर डोईजड लष्करी खर्च बऱ्याच प्रमाणांत कमी करितां येईल. **सेवादलाच्या** मार्फत रात्रीं पाळीपाळीनें गस्त घालणें, यात्रा, उत्सव इत्यादि समारंभांचे वेळीं व्यवस्था ठेवणें वगैरे कामें करून घेतां येतील. **मध्यस्थाच्या** खटपटीनें आरोग्यरक्षण, शिक्षण, न्यायदान वगैरे बाबतींत चांगलें कार्य होऊं शकेल.

तात्पर्य—वरील योजनेनें खेडेगांवें बौद्धिक, आर्थिक, शारीरिक व नैतिक दृष्ट्या पुनरुज्जीवित होतील. इतकेंच नव्हे, तर या कार्यासाठीं सरकारकडून घेतल्या जाणाऱ्या **शेतसाऱ्यापैकीं निम्म्या रकमेच्या माफीची मागणी कालांतरानें हक्कानें करितां येईल** व या सूट मिळालेल्या रकमेंतून दरसाल पाळीपाळीनें चिठ्या टाकून सावकारांची योग्य नुकसानभरपाई **करून कुळांस त्यांच्या जमिनी सावकारांकडून परत देणें शक्य होईल** व अशा रीतीनें **गांव दहावीस वर्षांत ऋणमुक्त होऊं शकेल.** कालांतरानें हें ऋणविमोचन झालें कीं, याच पैशाचा उपयोग उत्तम सडका, धर्मशाळा, गुरांचे व माणसांचे दवाखाने, इस्पितळें, ओढे व नाले यांना धरणें घालणें, वाफेच्या नांगरांच्या साहाय्यानें सामुदायिक नांगरणी करणें वगैरेसारख्या लोकोपयोगी कार्यांकडे करतां येईल. स्वतःचा कापूस व रोजीं अर्धापाऊण तास बैठी मेहनत, याच्या मोबदल्यांत शेतकऱ्यांस प्राथमिक शिक्षण, कायद्याचा सल्ला, आरोग्यरक्षण, गाऱ्हाण्यांचें निवारण, सरकार व पुढारी यांच्याशीं मध्यस्थी, सरकारी खात्यांचा फायदा, बहुश्रुतपणा व जागृति, पंचाइतीचे मार्फत खाजगी रीतीनें तंटे तोडल्यामुळें होणारी हजारों रुपयांची बचत, अडीअडचणीला पेढींतून थोडक्या व्याजानें मदत, पूर्ण स्वदेशीव्रतपालन, ऋणविमोचन, इतके फायदे मिळाल्यास आणखी काय पाहिजे?

**याशिवाय या योजनेच्या योगानें इतरहि अनेक फायदे घडून येणार आहेत.** ही योजना अमलांत आणल्यास पांढरपेशांच्या पुढें आज जो बेकारीचा भयंकर प्रश्न दत्त म्हणून येऊन उभा राहिलेला आहे तो सोडविण्यास फार मदत होईल. आज पहावें तों दरसाल हजारों विद्यार्थी बी. ए., मॅट्रिक्युलेशन अगर व्हर्नाक्युलर फायनल वगैरे परीक्षा पास अगर नापास होतात. या दोघांचीहि भवितव्यता अत्यंत निराशेची असते; आशेचा अंधुक किरणहि त्यांस दिसूं शकत नाहीं; आईबाप, काका, मामा, सासू, सासरा वगैरे भाऊबंद अगर इष्टमित्र यांचे जिवावर बिचारे अत्यंत अपमानास्पद स्थितींत कसेतरी कालाची क्रमणा करीत असतात; त्यांनीं कांहीं कालपर्यंत ग्रामसंघटनेस जरूर तें शिक्षण घेऊन खेडेगांवांत कायमची वसति केल्यास त्यांच्या भावी आयुष्यक्रमाचा प्रश्न उत्कृष्ट तऱ्हेनें सुटणार आहे. या योजनेनें त्यांना स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीहि साधणार आहेत. हा प्रश्न कॉंग्रेसच्या नुसत्या मध्य-

महाराष्ट्रांतील दहा जिल्ह्यांचाच नसून **नर्मदा** व **तुंगभद्रा** व **पूर्वपश्चिम समुद्र** या चार मर्यादांमधील अफाट अशा **महन्महाराष्ट्राचा** आहे. या टापूंत पन्नास हजारांवर खेडीं असून त्यांपैकीं प्रत्येकांत **मध्यस्थ, वस्ताद, मुनीम** व **रक्षक** यांचीं कामें करावयासाठीं हजारों--नव्हे लाखों युवकांची जरूर आहे. आज देशांतील उत्तम मेंदू, अंतःकरण व शरीरशक्ति यांचा फायदा दुर्दैवानें परकीय नोकरशाहीचें राज्ययंत्र चालवून मातृभूमीच्या मानेवर पारतंत्र्याचें जूं चिरकाल ठेवण्यामध्यें होत आहे. ' **नाथाच्या घरची उलटी ही खूण । पाण्याला कैशी लागली तहान ॥** ' यापैकीं हा प्रकार आहे. ज्यांनीं हिंदुस्थानांतील लक्षावधि खेड्यांत राहून संघटनेच्या पराक्रमाचीं कामें करावयाचीं तेच लोक आज ' **कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ** ' या न्यायानें वागून व परकीयांच्या कारवाईला भुलून त्यांच्या पचनीं पडले आहेत! **स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या** योगानें हा सर्व प्रकार बदलून टाकतां येणार आहे.

**आणखी एक गोष्ट.** आज देशामध्यें हजारों अनाथ विधवा घरोघरीं आढळून येतात. प्लेग अगर एन्फ्लुएंझामुळें ज्यांच्यावर अकालीं आकाशाची कुऱ्हाड कोसळून पडली अशा हजारों बालिका आज प्रौढ वयांत आलेल्या आहेत, आणि बिचाऱ्या बऱ्यावाईट रीतीनें कुठें तरी काळ कंठीत आहेत. यांनीं देशसेविकांचें कार्य करण्याचें मनावर घेतलें तर त्यांचा अन्नानें पोट भरण्याचा प्रश्न सहज सुटून देशाचेंहि कार्य होणार नाहीं काय?

**आज चाळीस वर्षें स्वदेशीची हाकाटी चाललेली आहे.** वीस सालापासून **खादीचा संप्रदाय** सुरू झाला. गेल्या दहा वर्षांत **महात्मा गांधी**सारखी त्रिभुवनवंद्य विभूति खादीच्या पाठीशीं असूनहि तिची उत्पत्ति अजूनपर्यंत पांचपन्नास लाखांवर गेली नाहीं. **स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या** योगानें रेंगाळत पडलेला हा स्वदेशीचा **प्रश्न** तडाक्यासरशीं सुटण्यास मदत होणार आहे. **महाराष्ट्रांत** तरी मजुरी देऊन लोकांच्याकडून सूत काढून घेणें व अशा रीतीनें खादीच्या उत्पत्तीचा प्रश्न सोडविणें, अनेक कारणांमुळें जवळ जवळ अशक्य आहे. गतकालाचा हा अनुभव आहे. तो केव्हांहि विसरून चालणार नाहीं. **हा प्रश्न केवळ वस्त्रस्वावलंबनाच्या योगानेंच सुटणार आहे.**

या योगानें स्वदेशीचा प्रश्न बेकारीच्या प्रश्नाबरोबरच आपोआप सुटेल; इतकेंच नव्हे, तर आज गिरण्यांच्या पद्धतीमुळें जो राष्ट्राचा भयंकर नैतिक

अधःपात होत आहे तो थांबविण्यासहि मदत झाल्याशिवाय रहाणार नाहीं. दैवी संपत्ति हा राष्ट्राच्या उत्कर्षाचा पाया होय. हिंदी राष्ट्र म्हणजे हिंदुस्थानांतील सात लक्ष खेडीं. या खेड्यांतील लक्षावधि लोकांना व त्यांच्या मुलाबाळांना पोट भरण्यासाठीं आज मुंबईअमदाबादसारख्या मोठमोठ्या शहरीं जावें लागतें. तेथें दारू, नाटकेंतमाशे, जुगारी, बाहेरख्याली वगैरे नानाप्रकारच्या व्यसनांच्या भोंवऱ्यांत सांपडून ते माणुसकीला मुकतात. राष्ट्राची भयंकर हानि होते. त्यांचें नैतिक अधःपतन होतें; इतकेंच नव्हे, तर कोंदट हवेच्या गलिच्छ वस्तींत राहून काम करावें लागल्याकारणानें त्यांच्या आरोग्यावर व शरीरप्रकृतीवरहि भयंकर दुष्परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं; शंभर शंभर रुपये महिना मिळविणाऱ्या लोकांनाहि अन्न अंगीं लागत नाहीं अगर रात्रीं सुखानें झोंप येत नाहीं; त्यांचे चेहरे फिकट झालेले असतात व अपचनाची व्यथा त्यांना जडलेली असते. तात्पर्य, दैवी संपत्तीची ही भयंकर ओहोटी राष्ट्राला परिणामीं अत्यंत जाचक झाल्याशिवाय रहाणार नाहीं, ही गोष्ट निश्चित होय. हेंच तत्त्व लक्षांत घेऊन महात्मा गांधी यांनीं एका लेखांत म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानास लागणारें कापड एक वेळ विलायतेंतील मँचेस्टरच्या गिरण्यांमधून तयार करून आणावें लागलें तरी मला चालेल, पण गिरण्यांच्या गलिच्छ पद्धतीमुळें होणारी राष्ट्राच्या दैवी संपत्तीची ही भयंकर घट मला परवडणार नाहीं.

जिच्या जोरावर पराक्रम करावयाचे ती राष्ट्रीय सद्गुणांची संपत्तीच नाहींशी झाली तर राष्ट्रानें भावी अभ्युदयाची आशा कशाच्या जिवावर बाळगावी? ही संपत्ति कायम असेल तर तिच्या जोरावर सातासमुद्रांच्या पलीकडे गेलेली लक्ष्मी नानाप्रकारांचे यत्न करून परत आणतां येईल; पण दैवी संपत्तीचें भांडवलच एकदां नाहींसें झालें तर सर्व प्रकारचा सत्यानाश नशिबीं आल्यावांचून रहाणार नाहीं. पुण्यश्लोक राजा हरिश्चंद्रानें सर्व राज्य दान केलें, पण आपलें सत्त्व कायम ठेवलें; त्या पुण्याईच्या जोरावर त्याचें राज्य त्याला परत मिळालें, इतकेंच नाहीं, तर त्याचेबरोबर विश्वामित्राच्या तपश्चर्येचें पुण्यहि त्याच्या पदरांत पडलें.

**दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, चांगल्या शहाण्या म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांना अजून ही गोष्ट कळत नाहीं.** परदुःख शीतळ असतें, हेंहि याचें

एक कारण असूं शकेल. शेतकऱ्यांना व त्यांच्या बायकामुलांना गिरण्यांच्या कंगालखान्यांमध्यें अत्यंत भयंकर परिस्थितींत दररोज उभें राहून दहा दहा तास काम करावें लागतें. हाच प्रसंग या विद्वानांच्या दुर्दैवानें जर त्यांच्या आयाबहिणींवर व बायकापोरांवर आला तर कदाचित् त्यांचे डोळे उघडतील व परदेशी कापड वापरणें हें जितकें राष्ट्रविघातक आहे तितकेंच, किंबहुना त्याहीपेक्षां कांकणभर जास्त गोरगरिबांच्या कौटुंबिक सुखावर निखारा ठेवून त्याची राखरांगोळी करण्यास कारणीभूत होणारें व अगोदरच भरमसाट श्रीमंतीचा उपभोग घेणाऱ्या गलेलठ्ठ भांडवलवाल्यांस आणखी श्रीमंत करण्यास मदत करणारें हिंदी गिरण्यांतील नामधारी, अर्धवाटगें स्वदेशी कापड वापरणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें नुकसानकारक आहे, या सत्याची त्यांस जाणीव होईल व या विद्वान् सज्जनांस कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन, शुद्ध व पवित्र अशा खादीशिवाय दुसरें कोणतेंहि कापड वापरणें हें ते पातक समजतील. ईश्वर करो व गिरण्यांच्या पापी वातावरणांत काम करण्याचा दुर्धर प्रसंग कोणाच्याहि बायकामुलांच्यावर न येवो!

**आज खेडेगांवांमधून मध्यम स्थितींतील भांडवलवाले व दलाल यांचें बऱ्याच अंशानें बऱ्याच प्रमाणांत राज्य असतें.** वाणसवद्याचा व भुसारमालाचा व्यापार, सावकारी व क्वचित् प्रमाणांत शेती हे यांचे व्यवसाय असतात. हे सज्जन अनेक वेळां अडाणी व भोळसट अशा श्रद्धाळू खेडवळांस लुबाडून त्यांच्या टाळूवर सफा हात फिरवितांना आढळतात. यांचे व्यापार व देण्याघेण्याचे प्रकार यांची जर बारकाईनें छाननी केली तर त्यांचे मानानें परकीय नोकरशाहीहि पुष्कळ बरी असें वाटूं लागतें. **स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या** पद्धतीनें या वर्गास आपली कारवाई करण्याची फारच थोडी संधि मिळून कालांतरानें त्यांच्याही वर्तनांत व वृत्तींत फरक पडल्यावांचून राहणार नाहीं. निःपक्षपातबुद्धीनें बोलावयाचें म्हणजे या वर्गांत ज्याप्रमाणें परकीय नोकरशाहीशीं संगनमत करून जनतेस नाडणारे ग्रामकंटक आढळतात, त्याचप्रमाणें नवीन चळवळ आज ना उद्यां आपल्या मुळावरती येण्याचा संभव आहे, याची जाणीव होऊनहि या चळवळीस सहानुभूति दाखवून तिला यथाशक्ति मदत करणारे देशभक्तहि नजरेस पडतात. अशाच लोकांचा **मुनीमाचें** अगर **मध्यस्थाचें** कार्य बजावण्याचे कामीं उपयोग

करून घेतां येईल व त्यायोगानें देशांतील विषमता बऱ्याच प्रमाणांत कमी होऊन न्याय, समता व बंधुभाव या तत्त्वांचे अनुरोधानें संपत्तीची समान वांटणी करणें सुलभ होईल.

आज खेड्यांतील परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण केलें तर असें आढळून येईल कीं, शेतकऱ्यांची शेती अत्यंत खालावलेली आहे. ती एकटी त्यांचें पोट भरूं शकत नाहीं. या आपत्तीचीं कारणें शोधून काढून शेती शेतकऱ्यांस जास्त फलदायी कशी होईल, याचाहि विचार करणें अवश्य आहे. आज लक्षावधि रुपये खर्च करून सरकारनें शेतकीखातें चालविलें आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, निरपेक्ष मध्यस्थांचे अभावीं या खात्याचा शेतकऱ्यास फारसा उपयोग होत नाहीं. भरमसाट पैसा खर्च करून नवीन नवीन शोध लावले जात आहेत. प्रयोगशाळांमधून प्रतिभाशाली विद्वान् लोक काम करीत आहेत. या सर्वांचा फायदा स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या योगानें शेतकऱ्यास मिळणार आहे. सरकारशीं क्वचित् प्रसंगीं चाललेला कायदेभंगासारखा लढा हा नियम नाहीं; तो अपवाद आहे. तो नेहमींच चालणार नाहीं. हिंदुस्थान व इंग्लंड हे दोन्ही देश समानतेच्या भूमिकेवर एकाच साम्राज्याचे समान घटक म्हणून गुण्यागोविंदानें नांदले तर ही गोष्ट उभयतांच्याहि फायद्याची आहे, हें तत्त्व दोनाहि देशांतील प्रमुख मुत्सद्यांच्या ध्यानांत येत चाललेलें आहे. लोकांच्या संमतीशिवाय केवळ मशीनगनच्या साहाय्यानें राज्य चालविणें शक्य नाहीं, ही गोष्ट मोठमोठ्या इंग्रजी मुत्सद्यांनीं ओळखलेली आहे. याचा परिणाम आज ना उद्यां कमींत कमी प्रांतिक स्वायत्ततेची पूर्णांशानें स्थापना होण्यांतच होणार आहे; अर्थात् प्रत्येक सरकारी खात्याचा शेतकऱ्याला कसा फायदा मिळेल व शेतकऱ्याकडून दरसाल सरकारला मिळणाऱ्या शेतसाऱ्यांतील पैन् पैचा खर्च त्यांच्या कल्याणाकरितां कसा होईल, या गोष्टीची काळजी देशानें घेतली पाहिजे. स्वावलंबी ग्रामसंघटना होऊं शकली तरच ही गोष्ट साध्य होईल.

येणेंप्रमाणें स्वावलंबी ग्रामसंघटनेची फलश्रुति आहे. हें फळ पदरांत पाडून घेण्यासाठीं तरी हिंदवी शेतकरी थोडीबहुत झीज सोसण्यास नाकबूल होईल असें वाटत नाहीं; तशी त्याची परंपरा नाहीं व तो तसा

नाखूष असल्यास त्याबद्दल त्याची कींव करण्याचेंहि कांहीं कारण राहणार नाहीं. हा प्रश्न परोपकाराचा नाहीं, त्याच्या स्वार्थाचा आहे. आत्मकल्याणासाठीं इतकाहि उद्योग करण्याची तयारी नसलेला असामी या जगांत जगावयास लायक आहे, असें कसें म्हणतां येईल? अशा माणसांनीं बनलेलें राष्ट्र या जगांतून जितकें लवकर नामशेष होईल तितकें चांगलें. त्यांनीं जास्त चांगल्या लोकांना जागा करून द्यावी हेंच उत्तम व परमेश्वरी सूत्रच असें आहे कीं, त्यांची खुषी असो अगर नसो, बळजबरीनें त्यांस ती जागा लौकर रिकामी करावी लागून स्वतःस राम म्हणावा लागेल. '**रगेल असेल तोच जगेल**' ( Survival of the fittest ) हाच जगाचा नियम आहे विश्वंभराचा हा कायदा आहे; या कायद्याच्या तडाख्यांतून कोणचेंहि राष्ट्र आजपर्यंत सुटलेलें नाहीं; मी मी म्हणविणारीं राष्ट्रें नामशेष झालेलीं आहेत. या चक्रांतून हिंदवी शेतकऱ्याचें राष्ट्र सुटेल ही गोष्ट खोटी.

**पण अशी निराशेची भाषाच कां बोला?** तें चुकीचें होईल. हिंदवी शेतकरी हा इतका अजागळ व नादान प्राणी खास नाहीं. तो मोठ्यांचा वंशज आहे. पराक्रमी पूर्वजांचें रक्त अजून त्याच्या धमन्यांमधून खेळत आहे. त्यांनीं मोठमोठालीं साम्राज्यें स्थापन करून तीं चालवूनहि दाखविलेलीं आहेत. जंगल असेल तेथें मंगल कसें करावें ही कला तो जाणतो, अशी इतिहासाची साक्ष आहे. त्याच्यावर आज अंमल करणाऱ्या लोकांचे पूर्वज ज्या वेळीं रानावनांमधून व दऱ्याखोऱ्यांमधून अंगाला रंग लावून व तोंडाला पिवडी फांसून हिंडत होते, त्या वेळीं त्याचे पूर्वज **अवंति, उज्जयिनी, पाटलीपुत्र** अगर **हस्तिनापूर** या ठिकाणीं राहून मोठमोठालीं साम्राज्यें चालवीत होते. पांढऱ्यावर काळें कसें करावें याचा गंधहि जेव्हां पाश्चिमात्यांस नव्हता, त्या वेळीं हिंदवी शेतकऱ्याचे वाडवडील **नालंदा** अगर **तक्षशिला** वगैरेसारख्या शिक्षणाच्या केंद्रांत दहा दहा हजार विद्यार्थ्यांचे तांडे पढवीत होते. अन्न कसें शिजवावें, वस्त्र कसें विणावें व घरें कशीं बांधावीं यांसारख्या सामान्य कलांचें ज्ञानहि पाश्चिमात्य राष्ट्रांच्या बापजाद्यांना नव्हतें, त्या वेळीं हिंदवी शेतकऱ्याचे पूर्वज चवदा विद्या चौसष्ट कला यांत पारंगत होते. तो शेतकरी आज जमीनदोस्त झालेला आहे. त्याच्या अंतस्थ चिच्छक्तीवर दारिद्य, अज्ञान व पारतंत्र्य या त्रयीची राख पसरलेली

आहे. शहरांतील त्याच्या सुशिक्षित पांढरपेशा बांधवांनीं त्याच्या संबंधींचें आपलें कर्तव्य योग्य वेळीं ओळखून परमात्म्याला साक्षी ठेवून तें बजावलें तर बाहेरील सांचलेली घाण दशदिशांना उडून जाऊन आंतील पौरुषाचा अग्नि प्रदीप्त होईल व हा अग्निनारायण पुन्हां अखिल जगताला आपल्या सात्त्विक पराक्रमाच्या योगानें दिपवून टाकून पिंड व ब्रह्मांड या उभयतांचेंहि कल्याण केल्याशिवाय रहाणार नाहीं, असा ईश्वरी संकेत आहे.

---

## १४. द्यावी लागणारी किंमत

जूट करोनि मालक रहावे हाचि एक मार्ग ।
आपण मेल्याविण दिसेना कधीं कुणाला स्वर्ग ॥

—शून्यानंद

स्वराज्य मिळण्या दस लाखांचें तत्त्व सांगतों आजीं ।
सर्वस्वांची करिं बा ! होळी स्वराज्यकुंडामाजीं ॥

—देवदत्त

स्वतंत्र देशा करावयास्तव कष्ट करा रे कांहिं तरी ।
स्वतंत्रता ही चीज मिळेना । फुकटामध्यें जाण रे ॥
पातक केलें आजवरि बहु परकी वस्त्रा वापरुनी ।
प्रायश्चित्ता घेऊं आपण । काढुनि सूत्रा छान रे ॥

—देवदत्त

मागील भागांत वर्णिलेल्या सर्व गोष्टी होण्यास अट एकच; व ती ही कीं, गांवकऱ्यांस लागणाऱ्या कापडास जरूर तें सूत गांवांतल्या गांवांत कांतलें व विणलें गेलें पाहिजे व या सुतास लागणारा कापूसहि गांवच्या शिवाराच्या आंत उत्पन्न झाला पाहिजे. ही गोष्ट अव्यवहार्य अगर अशक्य कोटींतील आहे असें म्हणणें योग्य होणार नाहीं. एवढीहि गोष्ट कॉंग्रेस अगर इतर संस्थांचे प्रचारक कष्टाळू शेतकऱ्यांकडून करून घेऊं शकले

नाहींत तर, त्या योगानें या कार्याची अव्यवहार्यता सिद्ध न होतां कार्यकर्त्यांच्या नालायकीचें मात्र तें एक उत्कृष्ट उदाहरण होऊन जास्त लायक व कर्तबगार कार्यकर्त्यांची देशाला मार्गप्रतीक्षा करीत बसावें लागेल.

हल्लींच्या हलाखीच्या स्थितींतहि अडाणी व अर्धपोटी **शेतकरी अजूनपर्यंत कामाला कंटाळलेला नाहीं.** तो पहांटे चार चार वाजतां उठतो; ऊन, तहान, पाऊस, थंडीवारा वगैरे पंचमहाभूतांस जुमानीत नाहीं. शेतांत उत्पन्न होणारें धान्य शेवटीं बहुतेक सावकाराच्या घरांत जाणार आहे; आंबेमोहोर स्वतः पिकवून सुद्धां रंगूनच्या तांदुळावरच आपणांला समाधान मानून घ्यावें लागणार आहे; जेमतेम शरीर आणि आत्मा एकत्र ठेवण्याइतकाच आपल्या कष्टार्जित कमाईचा अंश आपल्याला मिळणार आहे, ही गोष्ट त्याच्या डोळ्यांना सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट व ढळढळीत दिसत असतांना तो अजूनहि शेतांत मरे मरे तों राबत असतो. वस्त्रस्वावलंबनाचें रहस्य व त्यापासून मिळणाऱ्या फायद्याचें महत्त्व जर कार्यकर्त्यांनीं त्यास पटवून दिलें व आपला सद्धेतु व निरपेक्षबुद्धि यांबद्दल त्याच्या मनांत विश्वास उत्पन्न केला, तर वस्त्रस्वावलंबनाच्या कार्याकरितां व त्यापासून मिळणाऱ्या फायद्याकरितां रोजीं तास दीड तास खर्च करण्यास तो कां कूं करील असें नाहीं. आज ना उद्यां सहकारी तत्त्वावर शेती करण्याची कला त्यास शिकविली तर त्यामुळें त्याचा पुष्कळ वेळ वांचेल व त्या वेळांत वस्त्रस्वावलंबनविषयक कार्य त्याचेकडून सहजच करून घेतां येईल. सर्व कांहीं **मध्यस्थाची** कुशलता, स्वतःच्या कार्याविषयींचा विश्वास व जनतेची सहानुभूति यांवर अवलंबून आहे.

वरील सर्व गोष्टींच्या बरोबर हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, **वस्त्रस्वावलंबनाचें रहाटगाडगें सुरळीत रीतीनें चालूं होण्यास बराच अवधि लागेल.** तें काम चार दोन महिन्यांचें खास नाहीं. मार्गांत अडचणींचे डोंगर येतील; निराशा, उपहास, तात्पुरतें अपयश, अवसानघात व पैशांची ओढाताण वगैरे भुतें कार्यकर्त्यांच्या पुढें येऊन नंगा नाच घालतील व त्यांची देशभक्ति, सहिष्णुता, निष्कामकर्मबुद्धि, धैर्य व चिकाटी यांची पुरती परीक्षा पहातील. तींतून त्यांनीं धड रीतीनें पार पडलें पाहिजे. '**शेंडी तुटो अगर पारंबी तुटो,**' **माघार घेतां कामा नये.** '**तुका म्हणे येथें**

पाहिजे जातीचें । येर गबाळांचें काम नाहीं ॥ ' हा देहूकरांचा मंत्र कार्यारंभीं त्यांनीं पाठ केला पाहिजे, तरच त्यांनीं या कार्यांत पडावें. ही सुळावरील पोळी आहे; जिवंतपणींच्या फांसावरील हा घांस आहे हें केव्हांहि विसरूं नये. खानदानीच्या घराण्यांतील, उपभोगाची भूक शमलेले, अनेक निस्वार्थी, बुद्धिमान् व कर्तबगार कार्यकर्ते या मनसुब्यांत मन घालतील तेव्हांच दहावीस वर्षांत हा प्रश्न सुटेल. हळद पितांच गोरें होण्याची कोणींहि हांव धरूं नये.

**स्वावलंबी ग्रामसंघटनेचें कार्य** सुरळीत रीतीनें चालू होण्यास प्रथमारंभीं बराच बुडीत खर्चहि करणें जरुरीचें होईल. शेतकऱ्यांस प्रयोगावस्थेंत चरखे, फाळके, सरकी काढण्याचीं लोढणीं वगैरे सामानहि पुरवावें लागेल. मध्यवर्ती शिक्षणसंस्थेंतील उमेदवार देशसेवक व तज्ज्ञ शिक्षक यांचा खर्चहि कार्यकर्त्या चालकांस करावा लागेल. हें सर्व भांडवल कोणीं पुरवावयाचें व कोठून आणावयाचें हा प्रश्न रात्रंदिवस चालकांस सतावून सोडील. तरी चालकांनीं धीर सोडतां कामा नये. त्यांनीं लक्ष्मीपति जो भगवान् विष्णु—त्यालाच आधुनिक भाषेंत जनताजनार्दन म्हणतात—त्याचे पाय धरले पाहिजेत. स्पष्ट भाषेंत बोलावयाचें म्हटलें म्हणजे हा सर्व पैसा शहरांतील लोकांनीं, विशेषतः ऐपतदार धनिकांनीं, पुरविला पाहिजे. तें त्यांचें पवित्र असें कर्तव्य आहे. कारण शहरांतील वकील, डॉक्टर, व्यापारी, कंत्राटदार, सावकार, सरदार, इनामदार, जहागीरदार, संस्थानिक, प्रोफेसर, शिक्षक व विद्यार्थी त्याचप्रमाणें लहानमोठे सर्व सरकारी अधिकारी या सर्वांचा योगक्षेम, त्यांच्या मुलाबाळांचें शिक्षण, त्यांचा थाट, त्यांची ऐट, त्यांचे सर्व व्यवहार व वैभव यांस खेड्यांत रहाणाऱ्या शेतकऱ्याचे कष्टच कारणीभूत झालेले आहेत. वरील लोक मजेंत असले तरी तो शेतकरी आज संकटांत सांपडलेला आहे. एकीकडे यांचे बंगले व टोलेजंग हवेल्या उठलेल्या असल्या तर दुसरीकडे त्याचीं रें मोडकळीस आलीं असून त्यांचेभोंवतीं निवडुंग माजलेला आहे ! यांना मोटारींतून इकडून तिकडे वायुवेगानें धांवपळ करण्यास सांपडत असली तर तिकडे त्याला त्याचे नांगर चालवावयास बैलहि उरलेले नाहींत ! इंपीरियल बँकेंत यांच्या नांवानें मोठमोठ्या रकमा जमा असल्या तर त्याचीं भांडीकुंडीं घराबाहेर काढलीं जाऊन शेतें सावकाराच्या घरांत गेलेलीं

आहेत! यांना दिवसांतून चार वेळां टिफीन व पांच वेळां सुग्रास अन्न मिळत असलें तर त्याला अर्धपोटीं राहून एकाच वेळच्या, वाळलेल्या झुणका-भाकरींवर समाधान मानून घ्यावें लागत आहे! यांचे बिलोरी आरसा लावलेलें कपड्यांचें कपाट शेंकडों रुपयांच्या रेशमी अगर फलाणीच्या विलायती कपड्यांनीं भरून गेलेलें असलें तर त्याच्या अंगावर फाटक्यातुटक्या अस्वच्छ कपड्यांशिवाय क्वचितच कांहीं दिसतें व रात्रीं पांचशें ठिगळांची गोधडी तो अर्धी अंथरतो व बाकीची पांघरतो. यांच्या पत्नीच्या अंगावर हजारों रुपयांचे हिऱ्यामोत्यांचे दागिने झळकतात तर त्याच्या बायकोच्या गळ्यांतील मंगळ-सूत्रहि पठाणानें हिसडा मारून व्याजावारीं काढून नेलेलें असतें! इकडे यांच्या अर्धांगीला 'पन्नास पन्नास रुपयांचे इरकली रेशमी सणंग नेसूं, कां आंग दिसणाऱ्या झिरझिरीत पातळानें शरीराला शोभा आणूं' असा विचार पडतो तर तिकडे त्याच्या बायकोला हिरव्या रंगाचें अर्धें व तांबड्या रंगाचें दुसरें अर्धें असे दोन फाटक्या लुगड्यांचे दोन तुकडे एकत्र सांधून त्या गंगाजमनी वस्त्रावरच आपल्या अब्रूचें रक्षण करून घ्यावें लागतें! एकीकडे यांच्या मुली व मुलगे विश्वविद्यालयाच्या मोठमोठ्या परीक्षा देऊन बेकन, शेक्स्पियर, कालिदास, भवभूति यांच्या ग्रंथांचीं पारायणें करूं शकतात तर तिकडे त्याला स्वतःची सहीहि करितां येत नाहीं! इकडे यांच्या कुटुंबांतील माणसें बालगंधर्वांचीं नाटकें, हिराबाईचीं गाणीं, पिंगपॉंगचे सामने, आइस्क्रीमच्या पार्ट्या, चार्ली चॅपलीनचे चित्रपट इत्यादि षोकांनीं आपल्या जिवाची मुंबई करून घेतात तर तिकडे कधींकधीं एखाद्या अर्ध्या लावणीवरच त्याला आपली हौस भागवून घ्यावी लागते! अशा अनेक मौजा आहेत; त्या किती सांगाव्या? मोठा ग्रंथच होईल.

**हा विषमतेचा बाजार फार दिवस चालणार नाहीं.** कारण दोघेहि एकाच होडींत बसलेले आहेत. एकानें दुसऱ्याला त्याच्या संकटांत हात दिला पाहिजे. तें त्याचें आद्य कर्तव्य आहे. योग्य वेळीं योग्य इलाज झाला नाहीं तर आज ना उद्यां शेतकरी कालाच्या उदरांत कायमचा गळफटून जाणार आहे हें खास. काळाच्या महासागरांत जलसमाधि घेऊन तो स्वतः अंतर्धान पावेल इतकेंच नव्हे तर स्वतःबरोबर शहरांतील पांढरपेशांसहि दारिद्र्य, उपासमार, उशिरां झालेला पश्चात्ताप, अपमान, बेअब्रू, बेबंदशाही,

अराजकता ( Bolshevism and anarchy ) वगैर अनर्थरूपी समुद्राच्या तळाशीं ओढून नेल्यावांचून रहाणार नाहीं. कारण लक्ष्मी ही चंचल आहे. ती आज असते व उद्यां नाहींशी होते. जगाचा हा नियम आहे; संतांची ही शिकवण आहे व भविष्यवाद्यांची ही इशारत आहे. **वेळींच सावध होणें हें उत्तम.** दोघांचेंहि कल्याण होईल.

उद्यां एखाद्या **महात्म्याच्या** पुण्याईनें **आर्यावर्तास** स्वराज्याचे हक्क मिळाले, तरी खेडेगांवांचें पुनरुज्जीवन झाल्याशिवाय व त्यांची सर्वांगीण उन्नति झाल्याखेरीज ते अधिकार देशाला पचणार नाहींत. क्षयी मनुष्याच्या पुढें श्रीखंडाचा वाडगा ठेविल्याप्रमाणें तें होईल. म्हणून परोपकार नव्हे तर केवळ स्वार्थबुद्धीनें प्रेरित होऊन पुढाऱ्यांनीं या कामाला शक्य तितक्या लवकर हात घातला पाहिजे. हें काम कमींत कमी दोन पिढ्यांचें तरी आहे. त्यासाठीं राष्ट्रांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस आपल्या रोजच्या जीवनक्रमाचें विवक्षित काटकसरीच्या पद्धतीनें नियमन करावें लागेल. आपल्या दिन-क्रमाला निराळें वळण देणें भाग पडेल. गरजा कमी कराव्या लागतील. लग्न-कार्य, मौंजीबंधनादि समारंभ, करमणुकीचीं साधनें, कपडेलत्ते वगैरे गोष्टींतील खर्च अत्यंत काटकसरीच्या व स्वावलंबनाच्या तत्त्वावर करण्याची संवय स्वतःस लावून घ्यावी लागेल; तरच हें कार्य होईल. महायुद्धांत इंग्लंडसारख्या धनाढ्य, बलाढ्य व स्वतंत्र राष्ट्रासहि ही गोष्ट करावी लागली. खावें किती, प्यावें काय, बसावें कुठें, पहावें काय व कोणती गोष्ट पाहूं नये, बोलावें काय व चालावें कुठें वगैरे बरबर क्षुल्लक दिसणाऱ्या बाबतींतहि इंग्लंडच्या पेशव्यांना साध्या खाणीवाल्यापासून तों **पांचव्या जॉर्ज बाद-शहांपर्यंत** सर्वांवर निर्बंध घालावा लागला. पुरुष रणांगणांवर गेले; त्यांचीं कामें बायकांनीं केलीं. मुलांनीं समुद्रकिनारा संभाळला. वृद्ध, तरुण, गरीब व श्रीमंत या सर्वांनीं रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र करून दारूगोळ्याचे पर्वतप्राय ढीग उत्पन्न केले. जयश्री कुणाला माळ घालावी व कुणाला घालूं नये ही गोष्ट चांगली ओळखते. या बाबतींत आपण इंग्लिश लोकांना गुरु केलें पाहिजे व त्यांनाच अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. त्यांचा देशाभिमान, उद्योगप्रियता, कर्तव्यनिष्ठा व साहस वगैरे गुणांना मोल नाहीं. त्यांचा पोशाख, फॅशन अगर महागडे खेळ यांऐवजीं त्यांचे हे गुण आपण आत्म-

सात केले पाहिजेत. नाहींतर आज ना उद्यां 'सब घोडे बारा टक्के' या न्यायानें **सर्वांचा राजकीय, आर्थिक, सामाजिक व आध्यात्मिक मरणकाल नक्की ठरलेला आहे.**

**भरतभूमि ही कर्मभूमि** आहे. कार्य स्पष्ट आहे. करणें व करणारे एवढ्याच गोष्टींची काय ती उणीव आहे. व्यवहारज्ञ **महाराष्ट्रांतील** हजारों युवकांनीं हें कार्य करण्यासाठीं या वेळीं पुढें आलें पाहिजे. **महन्महाराष्ट्रांतील** हजारों खेडीं चातकपक्ष्याप्रमाणें आज त्यांची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. परदेशांतील युद्धांच्या रम्य वार्ता ऐकून त्यांनीं हुरळून जातां कामा नये. नुसत्या 'झिंदाबाद'च्या गर्जनांनीं अगर ब्रिटिश साम्राज्याच्या अगर **महात्मा गांधी** यांच्या नांवानें बोटें मोडल्यानें **पूर्ण स्वराज्य मिळणार नाहीं व ब्रिटिश साम्राज्य तर मुळींच उलथून पडणार नाहीं.** तें इतकें लेचेंपेचें खास नाहीं. तें साम्राज्य चालविणारे गोरे लोक इतके नादानहि नाहींत. या कार्यांत युवकांच्या एक दोन पिढ्या खलास झाल्याखेरीज राष्ट्रमाता संतुष्ट होणार नाहीं.

**हा मामला धकाधकीचा आहे.** हा अशक्ताला होणें नाहीं. याला शरीर जितकें बळकट पाहिजे तितकेंच-किंबहुना त्याहीपेक्षां जास्त मनहि खंबीर पाहिजे. लक्ष्मीप्रमाणेंच मन हेंहि चंचल आहे. त्याचा अंत मोठमोठ्या योगीराजांनाहि लागला नाहीं. तें ताब्यांत ठेवण्याचा अभ्यास केला पाहिजे. फुलपांखराप्रमाणें दिसेल त्या बऱ्यावाईट फुलांवर त्याला झडप घालूं देतां कामा नये. '**एको देवः केशवो वा शिवो वा**' या मंत्राचें पठण त्याचेकडून रात्रंदिवस करून घेतलें पाहिजे. खात्री आहे कीं, बाराव्या वर्षींच स्वराज्यस्थापनेची कंबर बांधणाऱ्या **शिवरायाचे** वंशज या कार्यांत कमी पडणार नाहींत. **जगन्माता** त्यांस बुद्धि, युक्ति व विद्या खास देईल.

---

# १५. प्रारंभ कसा करावा ?

एष पन्था । एतत्कर्म । अथाहं कर्म व्याख्यास्यामि ।।

कोणत्याहि कार्याची सिद्धि पुष्कळ अंशानें त्या कार्याच्या **प्रारंभावर अवलंबून असते.** ‘ Well begun is half done ’ ही म्हण सुप्रसिद्ध आहे. ‘ **प्रथमग्रासे मक्षिकापातः** ’ होतां कामा नये. म्हणून **स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या** बाबतींत योग्य रीतीनें प्रारंभ कसा करावा याबद्दलची थोडक्यांत कल्पना खालीं दिलेली आहेः—

**या कार्याचे एकूण तीन टप्पे आहेत.** पहिला टप्पा सहापासून बारा महिन्यांचा. दुसरा एक ते तीन वर्षांचा व तिसरा अनंत कालाचा.

**टप्पा पहिला**—कार्य पटलेलें आहे व तें आपल्यास झेपेल कीं नाहीं याबद्दल चालकांनीं शंभर वेळां नाहीं हजार वेळां विचार करावा. कार्य सुरू होण्यास थोडा उशीर लागला तरी चालेल; पण एकदां सुरू झाल्यावर तें बंद पडतां कामा नये. तें हातीं घेत असतांना त्यानें दूरवर विचार केलेला असावा. कोणतीहि आशा ठेवूं नये. कोणावरहि अवलंबून राहूं नये. खालीं आपण व वर परमेश्वर हे दोनच त्याचे आधार असावेत. ‘ **आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हांच गोसावी व्हावें त्यानें ।। नाहींतरी सुखें असावें संसारीं । फजीती दुसरी करूं नये ।।**’ हें **तुकोबारायांचें** वचन त्यानें सदैव लक्षांत ठेवावें. हें कार्य अत्यंत कठिण आहे. अशक्य नसलें तरी कष्टसाध्य आहे. त्याला दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस करावा लागेल; व इतकेंहि करून यशाचें प्रमाण नेहमींच अनिश्चित राहील. म्हणून कार्यकर्त्यानें फलाविषयीं यत्किंचितहि आशा ठेवूं नये. फलप्राप्ति शून्य होणार आहे ही भावना मनांत बाळगूनच कामाला लागावें. म्हणजे निराशेचा राक्षस केव्हांहि त्याच्या पाठीस लागणार नाहीं.

वरीलप्रमाणें मनाची तयारी केल्यावर आपल्या **कार्याविषयींची निश्चित योजना लिहून काढावी** व उमेदवार देशसेवक मिळविण्याच्या खटपटीस लागावें. या बाबतीमध्यें अत्यंत काळजी घ्यावी; अत्यंत दक्षता बाळगावी. **स्वावलंबी ग्रामसंघटनेचें** कार्य ही गोष्ट सामान्य नसून अत्यंत

जिकीरीची आहे. कार्यकर्त्यांचा ती पुरा अंत पाहिल्याशिवाय रहाणार नाहीं; ही जाणीव उमेदवारांची निवड करतांना त्यांस द्यावी. दुसरीकडे व्यवस्था होईपर्यंत आंग टेंकण्यास व विसांवा घेण्यास उपयुक्त अशी एक धर्मशाळा या नात्यानें कोणाहि स्वयंसेवकास आपल्या संस्थेचा त्यानें दुरुपयोग करूं देतां कामा नये. भावी हिंदी राष्ट्र व राज्य हें कोणाहि एका व्यक्तीचें, समाजाचें, जातीचें, पंथाचें अगर संप्रदायाचें असणार नाहीं. हिंदुमुसलमान, ब्राह्मणब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य, गरीबश्रीमंत, स्त्री व पुरुष किंबहुना **हिंदुस्थानला** मातृभूमि समजणाऱ्या व तिच्यासाठीं जगण्यास व मरण्यास तयार असणाऱ्या अशा सर्वांचें होणार आहे. अस्सल गोऱ्यांचाहि त्यांत अंतर्भाव होऊं शकेल. एकराष्ट्रीयत्व, शुद्ध खादी, राष्ट्रधर्म, राष्ट्रीय झेंडा, राष्ट्रीय भाषा, सत्य व अहिंसा हीं तत्त्वें व स्वावलंबी ग्रामसंघटनेचें महत्त्व या गोष्टींस व तत्त्वांस कार्यकर्त्यानें मूलभूत गृहीतकृत्यें समजलें पाहिजे व त्याप्रमाणें वागण्याची त्याची तयारी असली पाहिजे. हा सिद्धान्त ज्यांस मान्य असेल त्यांचाच संस्थेत अंतर्भाव करून घ्यावा. फुकाची खोगीरभरती करून घेण्याच्या नादीं लागूं नये. लायक माणसें मिळण्यास चार दिवस उशीर लागला तरी चालेल. प्रारंभींच्या, विशेषतः प्रयोगावस्थेच्या, कालांत उपरिनिर्दिष्ट अनेक बाबींत जितकी काळजी घेतली जाईल तेवढी थोडीच होईल.

पहिल्या सहा महिन्यांच्या कार्यासाठीं शहरांतून दहावीस मैलांच्या आंत असलेलें हजारपंधराशें वस्तीचें एक गांव निवडावें. त्या गांवांत पाण्याची व्यवस्था चांगली असावी. कारण पांचपन्नास शिकाऊ उमेदवार स्वयंसेवक बरोबर घेऊन चालकांस या ठिकाणीं रहावें लागेल. या मंडळीचा पाणी आणणें, स्नान, स्वयंपाक, भांडीं घांसणें वगैरे नित्यकर्मांमध्यें वाजवीपेक्षां जास्त वेळ खर्च होतां कामा नये. रहावयाची जागा शक्य तर गांवाला लागूनच परंतु अलग अशी असावी. ती कोंदट व रोगट नसावी. गांवांतल्या लोकांची मनोवृत्ति देशकार्याचे बाबतींत विशेष अनुकूल नसली तरी ती प्रतिकूल नसावी. या गांवांत सवडीप्रमाणें बरोबरीच्या पंधरा ते चाळीस उमेदवारांसह चालकांनीं सहा महिन्यांपासून एक वर्षपर्यंत मुक्काम करावा. शक्य तर कापूस जेथें उत्पन्न होतो अशाच गांवाची निवड करावी. कापसाचें गांव नसल्यास मृगाच्या सुमारास अगर मघा नक्षत्राचे सुमारास तेथें कापसाचें

बीं वांटावें, म्हणजे सहा महिन्यांनंतर वस्त्रस्वावलंबनाचें काम जोरानें सुरू करण्याइतका कापसाचा पुरवठा त्या ठिकाणीं बिनखर्चानें होऊं शकेल. पहिल्या हप्त्याच्या काळांत या एका गांवांतील कार्यावर शक्तिसर्वस्व खर्च करावें; यत्किंचितहि कसूर करूं नये. साक्षरता, सूत कांतणें, ग्रामसफाई, खतसंवर्धन, कवाईत-शिक्षण, औषधयोजना, वाचनालय व ग्रंथसंग्रह, सहकारी दुकान, आपसांत तंटे तोडणें वगैरे कार्यक्रम अमलांत आणण्याची शिकस्त करावी. शक्य तर या गांवांस पदरचा खर्च करून कापूस पुरवावा व गांवकऱ्यांकडून पीळदार, एकसारखें व मजबूत सूत काढून घेण्याची शिकस्त करावी. चालकांनीं आपल्या बरोबर एक आयुर्विद्याविशारद व एक पिढीजाद कोष्टी या दोघांचा तरी संग्रह करावा.

**कार्य करीत असतां शिक्षण देणें व घेणें** (Learning and teaching by doing) ह्या एका अत्यंत महत्त्वाच्या शिक्षणशास्त्रांतील तत्त्वानुसार या खेडेगांवांत असतांना निम्मा वेळ तरी रोज चालकांनीं बरोबरच्या उमेदवारांसह ग्रामस्थांच्या संगतींत घालवावा. प्राथमिक उपचार करणें, साक्षरताप्रसार, आपसांत तंटे तोडणें, व्याख्यान अगर प्रवचनद्वारां जागृति करणें, ग्रामसफाई, शेणखत व सोनखताची व्यवस्था, ग्रामस्थांशीं, त्यांच्या पुढाऱ्यांशीं अगर सरकारी अधिकाऱ्यांशीं बोलतांना अगर इतर व्यवहार करतांना ठेवावयाची वृत्ति व बाळगावयाचें धोरण यांचे बाबतींत चालकांनीं उमेदवारांस सप्रयोग शिक्षण दिलें पाहिजे. सारांश, या गांवाकडे चालक व उमेदवार यांनीं व्यावहारिक विद्यालयांतील मानासिक रसायनशास्त्राची प्रयोगशाळा या दृष्टीनें पाहिलें पाहिजे.

पहिल्या टप्प्यामध्यें निवडलेलें गांव शहरापासून थोडक्या अंतरावरतीं असावें असें लिहिण्यांत एक उद्देश आहे. तो हा कीं, चालकांस थोड्या खर्चानें चटकन् शहरांत येतां यावें. कारण चालकाला सबंध महिना त्या गांवांत राहून चालावयाचें नाहीं. त्याला पंधरा दिवस शहरांत व पंधरा दिवस या खेडेगांवांत काढावे लागतील. याचीं कारणें अनेक आहेत. **एक तर प्रथम मोठा प्रश्न पैशाचा उभा राहील.** चाळीस पन्नास माणसें बरोबर घेऊन रहाण्यासाठीं व त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठीं निदान दरमहा चारपांचशें रुपयांचा खर्च करावा लागेल. खेडेगांवांत कायमचें राहून चाल-

कांस ही रक्कम उभी करतां येणार नाहीं. यासाठीं दरमहा पंधरा दिवस स्वयंसेवकांना घेऊन त्यांना शहरांत मुक्काम करावा लागेल व शहरांतहि त्यांच्या साहाय्यानें **एकादशी संघटना,** खादीविक्री, कवाईत-शिक्षण व सार्वत्रिक जागृति हीं कामें करावीं लागतील. प्रत्यक्ष कांहीं तरी काम चालू आहे ही गोष्ट जनतेच्या निदर्शनाला आल्याखेरीज ह्या कार्याला पैसा मिळणें शक्य होणार नाहीं. चालकांनीं तशी अपेक्षाहि करूं नये. कांहीं तरी चमत्कार दाखविल्याशिवाय नमस्कार होत नसतो. **दुसरा प्रश्न शिक्षणाचा.** चालकांना फार तर बौद्धिक शिक्षण स्वयंसेवकांना देतां येईल. परंतु इतर कांहीं विषयांचें ज्ञान त्यांना खेडेगांवांत देणें शक्य होणार नाहीं. उदाहरणार्थ, कायदा, वैद्यकी, साबणादि जिन्नस तयार करणें वगैरेसारख्या विषयांचें शिक्षण त्यांना सशास्त्र पद्धतीनेंच उमेदवारांस दिलें पाहिजे व तें देण्याकरितां शहरांतील तज्ज्ञांचाच उपयोग करून घेतला पाहिजे.

उमेदवारांची निवड करितांना चार प्रकारचे उमेदवार चालकांना निवडावें लागतील: (१) पांच ते दहा उमेदवार असे निवडले पाहिजेत कीं, ज्यांची **टिळकमहाविद्यालयाची** अगर **सरकारी विश्वविद्यालयाची** प्रवेशपरीक्षा पास झालेली असेल. त्यांना **टिळकमहाविद्यालयातर्फे** मिळणाऱ्या उच्च शिक्षणाकरितां तीन ते पांच वर्षेपर्यंत शहरांतच ठेवावें लागेल व त्यांचें आयुर्वेद व राष्ट्रसंघटन या दोन शाखांचें अध्ययन पुरें करून घ्यावें लागेल. याच अध्ययनाबरोबर सुट्टीच्या कालामध्यें त्यांचा व्यायाम व संगीत यांचाहि अभ्यास पुरा करून घ्यावा. या मंडळींचा उपयोग तीन चार वर्षांनीं **देशसंघटनामहाविद्यालय** काढल्यावर होणार आहे. कारण त्यावेळेला एकाच ठिकाणीं उमेदवारांची फार मोठी संख्या ठेवावी लागेल व त्यासाठीं अशा लोकांची आवश्यकता भासेल. तहान लागल्यावर विहीर खणणें केव्हांहि योग्य होणार नाहीं म्हणून ही व्यवस्था. (२) **मध्यस्थाचें** काम ज्यांना चांगल्या तऱ्हेनें करतां येईल, असेहि कांहीं उमेदवार निवडले पाहिजेत. बुद्धिमत्ता, प्रारंभींचें शिक्षण, चारित्र्य, शरीरप्रकृति या बाबतींत यांचा दर्जा पुष्कळच वरचा असला पाहिजे; कारण यांचेवर फारच मोठी जबाबदारी येऊन पडणार आहे. किंबहुना **हिंदमातामंदिर** व त्यामधील संस्था यशस्वी रीतीनें चालविणें हें काम यांना करावें लागेल. यांचें बी. ए.

च्या इतकें शिक्षण झालें असलें तर फारच उत्तम. कोणच्याहि विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा तरी त्यांची झालेली असावी. (३) **वस्ताद** व **मुनीम** हीं कामें करण्याकरितां जे उमेदवार निवडावयाचे त्यांचें शिक्षण मराठी सात इयत्तांइतकें झालेलें असावें. आरंभीं आरंभीं कदाचित् **मुनीम व वस्ताद** हीं दोन्हीं कामें एकाच मनुष्याला करावीं लागतील असा संभव आहे. (४) चवथा वर्ग **देशसेविकांचा.** यांच्या शिक्षणाची व्यवस्था प्रारंभींच्या सहा अगर बारा महिन्यांत शहरांतच करावी लागेल; कारण शुश्रूषा, बाळंतपण, भजन करणें, पुराण सांगणें, शिवणकाम वगैरे विषयांचें शिक्षण शहरांतच देणें शक्य आहे. या शिक्षणाची व्यवस्था शक्य तर **सेवासदन, महिला-विद्यालय, सूतकमिटी, भगिनीमंडळ** यांसारख्या संस्थांच्या मार्फत करावी. न जमल्यास स्वतंत्र रीतीनें करावी. **टप्पा दुसरा**—

कोणच्याहि खेडेगांवांत राहून स्वतंत्र रीतीन ग्रामसंघटनेचें काम करण्यास जरूर ती कामचलाऊ लायकी पहिल्या सहा अगर बारा महिन्यांच्या टप्प्यांत उमेदवारांच्या अंगीं येईल. यानंतर या चाळीस अगर पन्नास लोकांची प्रत्येकीं तीन अगर चार या हिशेबानें दहाबारा खेड्यांमध्यें वांटणी करावी व त्यांस तेथें स्वतःच्या देखरेखीखालीं कार्य करण्यास सांगावें. **हीं गांवें ज्या ठिकाणीं कापूस होतो अशींच निवडावींत.** तीं शहरांपासून कितीहि लांब असलीं तरी हरकत नाहीं. कारण यापुढें चालकांस सर्व देशसेवकांसह दर महिन्याला शहराची यात्रा करावी लागणार नाहीं; चालकांनीं स्वतः एक घोडें ठेवून या दहाबारा गांवांतील कार्यावर एकसारखी देखरेख करावी व गांवकरी व त्यांचे पुढारी यांची मर्जी सांभाळून त्यांच्या सहानुभूतीनें त्या त्या गांवांतील **मध्यस्थ, वस्ताद, मुनीम** व **देशसेविका** कामें करतील अशी काळजी घ्यावी. जोंपर्यंत वस्त्रस्वावलंबनाचें रहाटगाडगें प्रत्येक गांवांत सुरळीत चालून सालाच्या कायमच्या उत्पन्नाची व्यवस्था झाली नाहीं तोंपर्यंत **रक्षकाच्या** खर्चाची जबाबदारी अंगावर घेऊं नये. तें कार्य कार्यकर्त्यांनीं कांहीं कालपर्यंत स्वतःच करावें. उमेदवार देशसेवकांची दुसऱ्या टप्प्यांत विभागणी झाल्यादिवसापासून तेथील कार्य व वस्त्रस्वावलंबनाचें रहाटगाडगें सुरळीतपणें चालू होण्यास एक ते तीन वर्षे लागतील. या दुसऱ्या टप्प्यांतील कार्य चालू असतांना त्या कालांत **महाराष्ट्रांतील** ज्या ठिकाणीं

कापूस होत नाहीं तेथें त्याची आपापल्या कपड्यापुरती लोक लागवड करतील अशी चळवळ चालकांनीं करावी.

दुसऱ्या टप्प्यांतील कार्य यशस्वी रीतीनें होऊन वस्त्रस्वावलंबनाचें रहाट-गाडगें तेथें सुरू होईपर्यंत व ग्रामसंघटनेचा इतर कार्यक्रम चांगल्या तऱ्हेनें सुरू होईपर्यंत चालकांनीं इतर कोणचीहि जबाबदारी आपल्या अंगावर घेऊं नये. या अवधींत चालक, त्यांचे साहाय्यक आपल्या ध्येयाशीं एकनिष्ठ राहून शिस्तीनें काम करतील तर यश आल्याशिवाय केव्हांहि रहाणार नाहीं. अंगीकृत कार्याशिवाय चालकांनीं इतर कोणत्याहि उद्योगांत लक्ष घालूं नये, ही गोष्ट जितकी महत्त्वाची आहे तितकीच त्यांनीं इतर कांहीं पथ्यें पाळलीं पाहिजेत हीहि गोष्ट महत्त्वाची आहे.

गांवकरी व त्यांचे पुढारी, त्याचप्रमाणें लहानमोठे सरकारी अधिकारी यांच्याशीं वागतांना चालकांनीं अत्यंत दूरदर्शीपणाचें धोरण ठेविलें पाहिजे. व्याख्यान देत असतांना भिन्नमताचे, विरुद्ध पक्षाचे पुढारी अगर पोलीस वगैरे सरकारी अधिकारी यांवर जातांजातां सहज तोंडसुख घेण्याचा मोह पुष्कळांना आवरत नाहीं. असें करूं नये. पोटासाठीं नोकरी करणाऱ्या लोकांचें अगर इतर लोकांचें निष्कारण वैर संपादन करण्यांत कोणत्याहि प्रकारचा फायदा नाहीं; राष्ट्रहिताला त्यायोगें जबरदस्त धक्का बसल्याशिवाय मात्र रहाणार नाहीं; म्हणून **सर्वांशीं वागतांना कायावाचामनानें अनत्याचाराच्या व्रताचें त्यांनीं तंतोतंत पालन केलें पाहिजे.** स्वत:च्या कोणत्याहि कृतीनें अगर शब्दानें कोणासहि—मग तो सरकारी अधिकारी असो अगर गांवचा पुढारी असो, आपल्या कार्यांत ढवळाढवळ करण्याची संधि त्यानें देतां कामा नये. **महात्मा गांधी**प्रणित अनत्याचाराचें शास्त्र व शस्त्र इतकें प्रखर आहे कीं, त्याचा योग्य रीतीनें उपयोग केल्यास **तुकारामबोवांनीं** म्हटल्याप्रमाणें शत्रूचाहि मित्र होऊं शकतो. हें तत्त्व लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वर्तन ठेवल्यास शेतकऱ्याची मनोवृत्ति बदलेल, तो जरूर त्या मेहनतीस तयार होईल, तिऱ्हाइतांची सहानभूति व मदत मिळेल, शत्रूचे मित्र होतील व यश घरीं चालून येईल. (प्रथम चाळीसपन्नास उमेदवार देशसेवक घेणें शक्य नसल्यास कमी घ्यावेत. उदाहरणार्थ, पंधरा घेतल्यास त्यांचें प्राथमिक शिक्षण वर्षसहा महिन्यांत झाल्यावर पांचच गांवांत त्यांची विभागणी करून त्यांचेकडून कार्य करून घ्यावें. )

# १६. कार्याची सांगता

' याचसाठीं केला होता अट्टाहास । शेवटचा दीस गोड व्हावा ॥

—श्रीतुकाराम.

**कार्याची सांगता**—प्रारंभापासून तीनचार वर्षांत **स्वावलंबी ग्रामसंघटनेचें** रहाटगाडगें दहापंधरा गांवांत यशस्वी रीतीनें चालू झालें म्हणजे **महन्महाराष्ट्रांतील** ग्रामसंघटनेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग पार पाडल्याप्रमाणें होईल. **गणपतीचा** सर्वांगसुंदर असा ठसा निर्माण करण्यासच प्रथम फार त्रास पडतो. तो एकदां निर्माण झाला कीं, पुढील कार्य फारसें अवघड नसतें. शाडू घेणें, त्याची उत्तम कमावणी करणें, तो ठशामध्यें भरणें व विघ्नहर्त्या व यशदात्या **गणरायाच्या** हजारों मूर्ति तयार करणें, एवढाच भाग मग राहतो व तो फारसा कठीण असतो असें नाहीं. तद्वतच **महन्महाराष्ट्रांतील हजारों खेड्यांसाठीं मध्यस्थ, वस्ताद, मुनीम, रक्षक व देशसेविका तयार करण्याकरितां कोठें तरी नदीच्या कांठीं योग्य जागा पाहून तेथें स्वावलंबी देशसंघटना-महाविद्यालय स्थापन करणें एवढेंच कार्य राहतें.** हें विद्यालयहि कोठल्यातरी एखाद्या खेडेगांवच्या लगतच असलें पाहिजे व त्याच्याच शेजारीं दुसऱ्या बाजूला एक नमुनेदार आदर्श खेडेगांव वसविण्याची चालकांनीं महत्त्वाकांक्षा बाळगिली पाहिजे. या विद्यालयातर्फे महन्महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जिल्ह्यांतील खेड्यांतून स्वावलंबी ग्रामसंघटनेचें कार्य करण्यासाठीं लायक मध्यस्थ, मुनीम, वस्ताद, रक्षक व देशसेविका तयार करणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य करावें लागेल. या विद्यालयांत हजारों विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी लागून त्यासाठीं अनेक तज्ज्ञ शिक्षकांचीहि योजना करणें भाग पडेल. कमींत कमी एक हजार तरी विद्यार्थि येथें ठेवून एक वर्षाचे अवधींत त्यांचें कामचलाऊ शिक्षण पुरें होईल व नंतर त्यांची महाराष्ट्रांतील निरनिराळ्या गांवांत प्रतिष्ठापना करावी लागेल. कदाचित् महन्महाराष्ट्रांतील निरनिराळ्या भागांत ( मध्यप्रांत, वऱ्हाड, मोंगलाई, मध्यमहाराष्ट्र व कर्नाटक ) अशीं चार अगर पांच महाविद्यालयें स्थापन करावीं लागतील.

या कार्याचा प्रारंभ, व्यवस्था, त्याला लागणारा पैसा व मनुष्यबळ या संबंधीं आजच तपशीलवार विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं. **महाविद्यालय** व **नमुनेदार खेडेगांव** अस्तित्वांत आणल्याखेरीज मात्र **स्वावलंबी ग्रामसंघटनेच्या** कार्याची सांगता होऊं शकत नाहीं, ही गोष्ट नमूद करण्यासाठींच या कार्याचा येथें उल्लेख केला आहे. कोंठ तरी **स्वावलंबी ग्रामसंघटनेचा** ठसा निर्माण केल्यानंतर याविषयीं तपशीलवार ऊहापोह करितां येईल. तो काळ अजून पुष्कळ लांब आहे. **वंदे मातरम्।**

---

वंदे मातरम् ।

# — चंद्रभागेच्या वाळवंटावर —

## व इतर कांहीं लेख

## —वाघ कां नंदीबैल ?—

सध्यां **विद्यार्थ्यांस** उपदेश करणाराची मोठी चमत्कारिक स्थिति होऊन जाते. देशाची सद्यःस्थिति लक्षांत घेऊन तदनुसार विद्यार्थ्यांस उपदेश करावा, या मताचा मी आहें. आपणांस दिलें जाणारें शिक्षण अत्यंत कुचकामाचें असतें. या शिक्षणसंस्थांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीं देशास पारतंत्र्यामधून स्वातंत्र्यांत पाऊल टाकण्यास मदत करावी असा सरकारचा हेतु नाहीं. उलट त्यांनीं परकीय नोकरशाहीचें राज्ययंत्र सुरळीत चालण्यास मदत करावी, असा या संस्थांचा हेतु असतो. यांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणास वाघिणीचें दूध म्हणण्याचा प्रघात पडला आहे. या गोष्टीइतकी खोटी गोष्ट दुसरी कोणचीहि नसेल. हें वाघिणीचें दूध असतें तर तें प्राशन करून वाघ उत्पन्न झाले असते.. परकीयांच्या जोखडाखालीं माना देणारे नंदीबैल यामुळें उत्पन्न झाले नसते. **टिळक** अगर **गांधी** यांतून उत्पन्न झाल्याचें सांगण्यांत येतें. पण हे अपवाद होत. अशीं शेंकडों—नाहीं हजारों **टिळकगांधींच्या** बाण्याचीं माणसें यांतून निपजावयास पाहिजे होतीं.

इंग्लंडमध्यें अशी स्थिति नाहीं. तेथें सर्व शिक्षण राष्ट्रीय दृष्टीनें दिलेलें असतें. बोअर युद्धांत इंग्लंडची फजीति उडाली. लॉर्ड रॉबर्टस् हे सावध झाले. सक्तीचें लष्करी शिक्षण स्वीकारण्याबद्दल त्यांनीं खटपट केली. ती साधली नाहीं, म्हणून बॉय स्काऊटची चळवळ सेनापति बॅडन पॉवेल यांनीं काढली. या स्काउटस्नीं महायुद्धांत देशाच्या किनाऱ्यावर पहारा करण्याचें महत्त्वाचें कार्य केलें. राष्ट्रांतील जिवंतपणाचें हें लक्षण आहे. हीच गोष्ट लक्षांत घेऊन आम्हीं मुळशी सत्याग्रहाच्या वेळीं आमच्या शाळेंतील मुलांचा उपयोग त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें राष्ट्रकार्यांत करून घेतला.

विद्यार्थ्यांनीं राष्ट्रकार्यांत भाग घ्यावा कीं नाहीं हा एक फार दिवसांचा वादग्रस्त प्रश्न आहे. लो. टिळकांनीं याला फारच समर्पक उत्तर दिलें आहे. ते म्हणत, ' विद्यार्थि म्हणून राष्ट्रकार्याशीं संबंध नको; नंतर संसारी नोकर म्हणून नको व वृद्धपणीं म्हातारा पेन्शनर म्हणून नको. एवंच, वरील तत्त्वाप्रमाणें मनुष्याचा राष्ट्रकार्याशीं केव्हांच संबंध येण्यास नको. ' कोणत्याहि स्वतंत्र देशांत अशी स्थिति असत नाहीं. आपल्यासारख्या परतंत्र देशांत तर ही केव्हांहि असतां कामा नये. आपल्या देशांत राजा व प्रजा यांचे हितसंबंध परस्पर विरुद्ध असल्याकारणानें राजा प्रजेला स्वावलंबी व स्वराज्योन्मुख करण्याचा मनापासूनचा प्रयत्न केव्हां करील ही गोष्टच शक्य नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेऊनच म. गांधी यांनीं देशांतील आबालवृद्धांस खादीच्या साहाय्यानें परदेशी कापडावरील बहिष्कार अमलांत आणण्याच्या कामीं मदत करण्याबद्दल विनंति केली. त्यांनीं सर्वांत कमी—जी करण्याचे बाबतींत सर्व लोकांना मदत करितां येणें शक्य आहे—अशी गोष्ट मागितली आहे. स्वातंत्र्यसंपादनासाठीं व रक्षणासाठीं आपण तयारी केली पाहिजे. केव्हांना केव्हां तरी स्वराज्याचा झेंडा आपणांस उभा करण्याची वेळ येणार आहे. तो काळ लवकर येण्यास पाहिजे असेल तर खादीची व स्वावलंबनाची चळवळ करून देशांत प्रचंड संघटित शक्ति उत्पन्न करणें जरूर आहे. या कामीं येथें जमलेल्या विद्यार्थ्यांनीं व त्यांच्या पालकांनीं यथाशक्ति मदत करावी, अशी मी त्यांस प्रार्थना करितों.

—( चोपडें—१२-९-२६. )

# — मुका विठोबा —

खादीकार्याचा अर्थशास्त्र, समाजशास्त्र, नीति, राजकारण वगैरे अनेक दृष्टींनीं विचार करितां येईल. आज या विषयाचा धर्मांशीं कसा निकट संबंध पोहोंचतो ह्याचा आपण विचार करूं. अनादि कालापासून हिंदुस्थानानें धर्म या विषयाला अग्रपूजेचा मान दिलेला आहे. रामकृष्ण, युधिष्ठिर, हरिश्चंद्रापासून तों तहत प्रतापसिंह, शिवाजीराजांपर्यंत जितक्या विभूति होऊन गेल्या त्या सर्वांच्या कार्यांत धर्माचें संरक्षण ही गोष्ट प्रामुख्यानें पुढें ठेविलेली होती, अशी इतिहासाची साक्ष आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव, रामदासादिक साधुसंतांनीं भागवतधर्माचें पुनरुज्जीवन केलें तेव्हांच त्या वृक्षाला स्वराज्याचीं व साम्राज्याचीं मधुर फळें आलीं. पुढें त्या वृक्षांतील धर्माचा ओलावा नाहींसा झाला व हीं फळें गळून पडलीं.

इंग्रजी राज्य सुरू झाल्यानंतरहि आज शेंदीडशें वर्षें आपण आपल्या दृष्टीनें धर्माचें प्रतिपालन करीत आलों आहोंत. आपण विठोबाचें भजन करितों; वाळवंटांत हरिनामाचा गजर करितों; टाळांचा कीस पाडतों; दरमहा, दरसाल आळंदीपंढरीच्या वाऱ्या करितों, गळ्यांत तुळशीच्या माळा घालतों; ज्ञानेश्वरीचीं आणि दासबोधाचीं पारायणें करितों; प्रवचन, निरूपण व कीर्तन ह्यांची झोड उठवितों; टिळे, टोपी, मुद्रा वगैरे सर्व बाह्य उपचार करितों. वास्तविक ह्यांचा परिणाम इहपरलोकींच्या कल्याणांत झाला पाहिजे. आपणांस परलोकींचा मोक्ष मिळेल किंवा नाहीं हें आज आपण सांगूं शकत नाहीं. त्या गोष्टीचा अनुभव परलोकीं गेल्यावरच आपणांस मिळेल. इहलोकींचीच आपली स्थिति काय आहे, याचा आपणांस विचार कर्तव्य आहे. आपला प्रपंच व्यक्तीचा—त्याचप्रमाणें राष्ट्राचा कसा काय चाललेला आहे याचा आपण विचार केला पाहिजे. इहलोकींचा संसार साधला, तरच पारलौकिक मोक्षाची गोष्ट बोलण्यांत अर्थ आहे. ज्याला पोटोबा साधत नाहीं त्याला विठोबा प्रसन्न होणें अशक्य. हा दृष्टिकोण पुढें ठेवा व भोंवतालीं काय चाललें आहे तें पहा.

**पाऊस पडत नाहीं**; गुरें मेलीं; मुलांबाळांस दूधदुभतें मिळत नाहीं; जिकडे पहावें तिकडे बायका, पुरुष व मुलें दुष्काळांतून ओढून काढल्याप्रमाणें दिसतात; कोणाच्याहि चेहेऱ्यावर तेज नाहीं; जवळजवळ निम्मे लोक अर्धपोटी; अंगावर चिंध्या; परके लाथा मारमारून—रावांकडून अगर रंकांकडून काम करून घेत आहेतच.

**असें कां व्हावें? ' यतो धर्मस्ततो जयः '** हा आपल्या धर्मांतील सनातन सिद्धांत आहे. हा चुकणें शक्य नाहीं. आपल्याला जय कोठेंच दिसत नाहीं; अर्थात् आपल्या हातून अधर्म होत असला पाहिजे. कारण धर्म व जय यांची जोडी असते. ज्याअर्थी जय नाहीं त्याअर्थी धर्माचें पालन ह्या ठिकाणीं होत नसलें पाहिजे. **' अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ '** ही भगवान् **श्रीकृष्णांनीं कुरुक्षेत्रावर** स्वतःचा शिक्कामोर्तब करून आपणांस यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारी अशी सनद दिलेली आहे. ह्या सनदेच्या मुळाशीं असलेलें तत्त्व त्रिकालाबाधित आहे, अशी साधुसंतांनीं ग्वाही दिलेली आहे. आज आपला योगक्षेम योग्य रीतीनें चालविला जात नाहीं. अर्थात् आपल्या उपासनेंतच कोठें तरी घोंटाळा असला पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद आहे. म्हणून पुन्हां मी असें म्हणतों कीं, आपण आत्मपरीक्षण करूं या.

**पंढरी सोडल्यावर आपण काय करूं**, कोणकोणत्या उद्योगांत मग्न होऊं, ह्याचा विचार करा. छत्रपति **शिवाजीमहाराज** स्वतःला **' गोब्राह्मणप्रतिपालक '** असें म्हणवून घेण्यांत भूषण मानीत होते. ब्राह्मणापासून तों गाईपर्यंत यच्चयावत् प्राणिमात्रांची आज काय स्थिति आहे? ब्राह्मणांनीं आपला परंपरागत यज्ञप्रधान सेवाधर्म कायम ठेवला आहे काय? वांद्र्याच्या कत्तलखान्यांत दरसाल लक्षावधि गाईंची कत्तल होत आहे. शेतकी, दूधदुभतें, शरीरसामर्थ्य ह्यांची सुव्यवस्था अशा स्थितींत कधीं तरी होणें शक्य आहे का?

जें कापड आपण वापरतों व पांघरतों त्याच्या सुताला धडधडीत गाई वगैरे प्राण्यांची चरबी लाविलेली असते. त्याच वस्त्रांनीं देह नटवून आमचे साधुसंत व आम्ही ईश्वराच्या भजनांत तल्लीन होतों. **गोपालकृष्णानें** ज्या लक्षावधि गाईंच्या खिल्लारांचा गोकुळवृंदावनांत सर्व प्रकारें सांभाळ

केला, ज्यांच्यासाठीं त्यानें प्राणांतिक संकटें सोशिलीं, त्याच गाईच्या हाडांच्या चुन्यानें व रक्तानें मिश्रित अशा शर्करायुक्त पदार्थाचा आपण **पांडुरंगास** नैवेद्य दाखवितों, प्रसाद वांटतों व मोठ्या भाक्तिभावानें तो आपण स्वत: भक्षण करितों. **विठोबा** प्रसन्न कसा व्हावा? त्यानें आपणांस दिलेलीं वचनें काय म्हणून पाळावींत?

**मी तुम्हांला फसवूं शकेन**; तुम्ही मला फसवूं शकाल; आपण दोघेहि एकमेकांना व इतरांना फसवूं शकूं. परंतु आपणांपैकीं कोणीहि **विठोबाला** फसवूं शकणार नाहीं. तो सर्वज्ञ आहे, तो सर्वव्यापी आहे, तो सर्वसाक्षी आहे, त्याचप्रमाणें तो सर्वशक्तिमान्‌हि आहे. त्याची वंचना करणें, त्याला चकविणें, आजपर्यंत कोणालाहि शक्य झालें नाहीं. आजहि ती गोष्ट शक्य नाहीं व पुढेंहि शक्य होणार नाहीं. विनाकारण आत्मवंचना मात्र करून घेऊं नका.

**भक्तिमार्गावर माझा विश्वास आहे.** भजनपूजनादि नवविधा भक्तीवर माझी श्रद्धा आहे. मी त्यांच्या विरुद्ध असणें शक्य नाहीं; पण तेवढ्यानेंच भागत नाहीं. तीं साधनें आहेत हें विसरून चालावयाचें नाहीं. ज्याप्रमाणें या साधनांचें अवलंबन केलें पाहिजे त्याप्रमाणेंच त्याबरोबर आपलें आचरणहि त्यांना धरून असलें पाहिजे. आपण इकडे गोपाळकाला करितों तर तिकडे गाईच्या चरबीनें माखलेलें परदेशी कापड वापरितों. इकडे **तुकारामबोवांचे** अभंग कंठ जोरानें फुटेपर्यंत म्हणतों तर घरीं गेल्याबरोबर आपआपसांत भांडणतंटे करून एकमेकांच्या नरडीचा घोंट घेतों, खोटे दस्तऐवज करितों, खोट्या साक्षी देतों, दारू पितों, बायकापोरांचे हाल करितों, बाहेरख्याली व जुगार वगैरे धंद्यांत निमग्न होतों. **पांडुरंगाच्या** नांवानें कितीहि अवडंबर माजविलेंत, टाळांचे कितीहि कीस पाडलेत, ज्ञानेश्वरीचीं कितीहि पारायणें केलींत, तरी कांहींहि उपयोग नाहीं. अशा वर्तनानें **विठोबा** प्रसन्न होणें शक्य नाहीं.

**परमेश्वराजवळ कांटेतोल न्याय आहे.** त्याला सर्व माणसें व राष्ट्रें सारखींच. सर्वांचा तोच उत्पत्तिकर्ता आहे. त्याच्याजवळ आपपरभाव नाहीं. त्याला हिंदु सारखा, मुसलमान सारखा व साहेबहि सारखाच. ज्याचें जसें वर्तन

तसें त्याला तो फळ देतो. आपण आपलें वर्तन सुधारूं या; आपलेंहि तो कल्याण केल्यावांचून केव्हांहि रहाणार नाहीं.

**मी आपल्या चरणांचा दास आहें.** खरें वाटलें तें बोललों. रागावूं नका. परदेशी कापडाचा त्याग करा. राष्ट्रधर्म म्हणून रोज अर्धा पाऊण तास तरी सूत काढा—दुसऱ्यास तसें करण्यास सांगा. शुद्ध स्वदेशी हातमागाची हातानें विणलेली खादी वापरा—लक्षावधि गोरगरिबांचें पोट भरेल. विठोबा प्रसन्न होईल. आपआपसांतील तंटे कोर्टात नेऊन घरादारांची राखरांगोळी करून घेऊं नका. दारू, जुगार, बाहेरख्याली वगैरे व्यसनें टाकून द्या. एवढी आपणांला शेवटची पुनः पुनः हात जोडून, पायां पडून विनंति करितों व कांहीं कमी जास्त शब्द गेला असल्यास आपणांजवळ क्षमेची याचना करून मी आपली रजा घेतों.

—( पंढरपूर—ता. १७।१।२६. )

---

## — पंचम जॉर्ज व टाईपरायटर —

**आपल्याकडे लोकमान्य टिळक, म. गांधी यांच्या तोडीची मंडळी फारच कमी उत्पन्न होतात.** याचें कारण देशाची हल्लींची अवनत स्थिति. पूर्वी अशी स्थिति नव्हती. त्या वेळीं देश अत्यंत भरभराटलेल्या स्थितीमध्यें होता. त्याला सुवर्णभूमि म्हणत. त्या वेळीं लक्ष्मीची जशी या देशावर कृपा होती, त्याचप्रमाणें मोठमोठ्या कर्तबगार लोकांचीहि ददात नव्हती. **टिळक-गांधींच्या** तोडीच्या अनेक माणसांची त्या वेळीं परंपरा चाले. ही स्थिति आज इंग्लंडसारख्या देशांत अस्तित्वांत आहे. तेथें कर्तबगार माणसांची कधींच अडचण पडत नाहीं. **डिझरायलीमागून ग्लॅड्स्टन, ॲस्क्विथमागून लॉईड जॉर्ज** अशी परंपरा एकसारखी चालते; अडत नाहीं. **किचनेर** बुडून मेला तरी राष्ट्रकार्य थांबलें नाहीं. या **किचनेरनें** अवघ्या चारदोन महिन्यांतच **जर्मनीशीं** झुंजण्यासाठीं लक्षावधि लोकांचें सैन्य उभारलें; पुढें या लष्कराला दारूगोळ्याची कमतरता आली. राष्ट्र स्वस्थ बसलें नाहीं. पार्लमेंटनें ठराव केला कीं, राष्ट्रांतील सर्व लोकांनीं, मग त्यांचा दर्जा कोणचाहि

असो, या कार्याला हातभार लावला पाहिजे. स्वतः जॉर्ज बादशहांनीं उदाहरण घालून दिलें. स्वतंत्र वातावरणाचा हा प्रभाव आहे. तिकडे तसें होऊं शकलें. आपल्याकडे कां होऊं शकत नाहीं? याचें कारण योग्य प्रकारचें शिक्षण तिकडे दिलें जातें. शाळेंत प्रवेश होतांच प्रत्येक मुलाला व मुलीला राष्ट्रीय झेंडयाला वंदन करण्याची शिस्त घालून दिली जाते. स्वदेशी जिन्नस वापरण्याचें महत्त्व मुलांच्या मनावर पटविण्यांत येतें. 'परदेशी टाईपरायटर प्रदर्शनांत कां ठेवले?' असा प्रश्न स्वतः जॉर्ज बादशहांनीं एका प्रदर्शनाच्या व्यवस्थापकांस केला. ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाहीं त्यांना स्वदेशीचें इतकें महत्त्व वाटतें! आमची प्रत्येक बाबतींत अवनत स्थिति असून आम्हांला त्याची दादहि नाहीं! अत्यंत हिणकस प्रतीचें शिक्षण आम्हांला मिळतें हें त्याचें कारण आहे.

**इंग्लंड स्वतःला हिंदुस्थानचे ट्रस्टी (पंच) म्हणवतें.** या पंचानें गेल्या दीडशें वर्षांत आपलें काम योग्य रीतीनें केलें आहे काय? 'दरसाल शेंदोनशें कोटि रुपये आपणांकडून सारा म्हणून घेतात त्याचा हिशेब काय' असा प्रश्न कोणी सरकारला विचारला आहे का? येवढी मोठी रक्कम आपण देतों व परत काय मिळतें? जवळ जवळ शून्य! 'दीडशें वर्षांत सरकारला जनतेस साक्षर करतां आलें नाहीं, याचें कारण काय?' असें कोणी सरकारला विचारलें तर त्याला दडपून टाकण्यासाठीं लष्कराची जय्यत तयारी! निम्यापेक्षां अधिक रक्कम लष्कराकडे खर्चीं पडते. गोऱ्या सरकारी अधिकाऱ्यांचे पगार कारण नसतां बेसुमार वाढवून घेतलेले! उरलेल्या रकमेंत देशांतील लोकांचें शिक्षण, आरोग्य, उद्योगधंद्यांची सुधारणा वगैरे गोष्टी करावयाच्या! नवऱ्यानें दोनशें रुपये पगारापैकीं पावणें दोनशें रुपये शर्यती, दारूबाजी, जुगार, नाटकतमाशे यांत उडवून बाकीच्या पंचवीस रुपयांत बायकोला संसार करायला सांगण्यांतलाच हा प्रकार! मोठे कृपाळू होऊन दिवाण नेमण्याची पद्धत काढली. पण हातांत अधिकाराच्या नांवानें ठणठणाट! अशा प्रकारची ही व्यवस्था आहे. याला उपाय काय? **उपाय एकच.** आपण गाढ झोंपेंत आहोंत. जागें झालें पाहिजे. **जर्मनीचें संकट** इंग्लंडवर आलें त्या वेळीं **इंग्लंड** जागें झालें, संकटाचा प्रतिकार केला व सैन्य उभारलें. त्यासाठीं दारूगोळा तयार केला. आपणांलाहि तीच गोष्ट केली

पाहिजे. बहुजनसमाजाला जागृत केलें पाहिजे. कापूस व त्याचें हातांनीं काढलेलें सूत हा आपला आजचा दारूगोळा आहे.

**इंग्लंडजवळ लागतील तितक्या तोफा होत्या,** पण दारूगोळा नव्हता. तशीच आज आपली स्थिति आहे. आपल्या देशांत हातमागांची मुळींच अडचण नाहीं. कोष्टी लागतील तितके आहेत. अडचण फक्त सुताची आहे. या मागांवर बहुतेक विलायती सूत वापरलें जातें; ही गोष्ट आपण थांबविली पाहिजे. सर्वांनीं स्वतः फावलेल्या वेळांत राष्ट्रधर्म म्हणून सूत काढलें पाहिजे. त्यासाठीं इतर किफायतीचे धंदे सोडून देण्याची जरूरी नाहीं. अत्यंत सोपी अशी ही गोष्ट आहे. मनांत आलें व योग्य संघटना केली तर एकटा **खानदेश** सर्व महाराष्ट्रास खादी विणून देऊं शकेल. सुताचा पुरवठा मात्र केला पाहिजे व तयार झालेली खादी वापरली पाहिजे.

**खादी जाडी भरडी असते** अशी कांहीं लोक तक्रार करतात. मी म्हणतों ती तशी असली म्हणून काय झालें? ती आपली आहे ना? जों-पर्यंत देशाच्या कपाळीं स्वातंत्र्याचा कुंकुमतिलक नाहीं, तोंपर्यंत देशांतल्या लोकांनीं शेंकडों रुपये पोषाखांत व डामडौलांत खर्च करणें म्हणजे कपाळा-वर सौभाग्यतिलक नसलेल्या एखाद्या रूपवती विधवेनें अलंकारांनीं नटण्या-मुरडण्याइतकें लज्जास्पद नाहीं का? याचा आपण नीट विचार करा; स्वतः खादी वापरा; गोरगरिबांच्या पोटापाण्याचा प्रश्न त्यायोगानें सुटेल. त्यांचा दुवा मिळाला तर परमेश्वराचा आशीर्वाद राष्ट्राला मिळेल व परमेश्वराची कृपादृष्टि आपल्याकडे वळल्यावर जगामध्यें अशी कोणचीहि सत्ता नाहीं कीं, सत्य, न्याय व समता यांवर उभारलेल्या आपल्या चळवळीला ती हाणून पाडूं शकेल. ईश्वर आपणांला सद्‌बुद्धि देवो!

—( चहार्डी-१९२६. )



# — एंजिन व कोळसा —

एकोणिसाव्या शतकाचे आरंभीं महाराष्ट्राचें स्वराज्य नाहींसें झालें. बाळाजीपंत नातूनें पेशव्यांविरुद्ध द्रोह करून आपण देशाचें फार मोठें कल्याण करीत आहोंत असें समाधान मानलें. एल्फिन्स्टन् साहेबांच्या कानांशीं लागून गुलगुल गोष्टी केल्या व त्यांचेकडून आम्ही 'तुमचें कल्याण करूं' अशा प्रकारचें आश्वासन घेऊन परकीयांचा झेंडा पुण्याच्या शनिवारवाड्यावर लावला! लोक खूष झाले. आतां रामराज्य आलें, सत्ययुग सुरू झालें, असें त्यांस वाटूं लागलें! कालांतरानें त्यांचे डोळे उघडूं लागले. १८५७ सालच्या बंडानंतर इंग्रजांचें खरें स्वरूप उघडकीस येऊं लागलें; लोकांचीं हत्यारें गेलीं; चार शहाणे लोक एकत्र जमले; त्यांनीं डोकीं खाजविलीं.

इंग्रजी राज्य हें एक Divine Dispensation, ईश्वरी योजना आहे, असें त्यांस अजून वाटत होतें. इंग्रज हा सातासमुद्रापलीकडून येथें परोपकार बुद्धीनें आला आहे, अशी त्यांची समजूत कायम होती. फक्त त्यांस आपल्या देशाचें यथार्थ ज्ञान नाहीं, हीच कायती एक अडचण आपल्या मार्गांत आहे; यामुळें सर्व घोंटाळा होत आहे, असा त्यांनीं शोध लावला. ही आडकाठी दूर व्हावी म्हणून, एक बेमालूम उपाय शोधून काढला. सभा भरवाव्या, भाषणें करावीं, ठराव पास करावेत, त्यांचीं भेंडोळीं राज्यकर्त्यांकडे पाठवावींत, त्यालाच मदत म्हणून कांहीं शहाण्या लोकांनीं विलायतेची यात्रा करावी, हाच तो शोध होय. या सर्व गोष्टी करून पाहिल्या; पण कांहीं जमेना. दादाभाई थकले; न्यायमूर्ति गोंधळून गेले; दत्तांचे डोळे उघडले; त्यांनीं मोठमोठाले ग्रंथ लिहून इंग्रजांचें स्वरूपाविष्करण केलें. देशाला रोग झाला आहे, तो मृत्युपंथाला लागला आहे, ही गोष्ट पुढाऱ्यांच्या लक्षांत आली. प्रश्न उत्पन्न झाला उपायाबद्दलचा. स्वदेशी वैद्याकडे जावें कां परदेशी डॉक्टरचे पाय धरावेत, याबद्दल वाद उत्पन्न झाला.

कोणाचें प्रामाणिक मत असें होतें कीं, मोठमोठे कारखाने काढावेत, उद्योगधंद्यांची सुरुवात करावी, उद्योगधंद्यांची सुधारणा करावी, नाना प्रकारच्या उलाढाली कराव्यात, म्हणजे देशाचा रोग नाहींसा होईल. त्या-

प्रमाणें कार्य सुरू झालें. गिरण्या निघाल्या, इतर कारखाने निघाले; पण या लोकांना ही गोष्ट कळली नाहीं कीं, हे सर्व उद्योग इंग्रजांचे मुळावर आहेत-सबब राज्यकर्ते यांची भरभराट केव्हांहि होऊं देणार नाहींत. आतां कोठें ही गोष्ट लोकांच्या नजरेस येऊं लागली आहे. सन १९०८ च्या अनुभवानें कित्येक लोकांना शहाणें केलें.

राजकीय त्याचप्रमाणें औद्योगिक बाबतींत पूर्ण स्वावलंबन झाल्याखेरीज देशाचा प्रश्न सुटणार नाहीं, ही गोष्ट त्रिखंडाचा अनुभव घेतलेल्या म. गांधीं-सारख्या व्यवहारचतुर पुढाऱ्यानें ओळखली व सन १९२१ मध्यें अनत्या-चारी असहकारितेचें आंदोलन देशांत बिलक्षण जोरानें सुरू होऊन स्वराज्य दृष्टिक्षेपांत येऊं लागलें; पण देशाचें दुर्दैव अजून संपलें नव्हतें; अने-कांचा बुद्धिभेद झाला, चळवळ मंदावली. अजून देशाची पूर्ण तयारी झाली नाहीं; अजून सबूर केली पाहिजे, हें जाणून म. गांधींनीं खादीकार्यप्रधान विधायक कार्यक्रम देशाच्या पुढें ठेवला व आनंदाची गोष्ट अशी कीं, या कार्यक्रमाचें महत्त्व आतां हळुंहळूं लोकांच्या नजरेस येऊं लागलें आहे.

पुष्कळ लोक म्हणतात 'खादीचा व स्वराज्याचा संबंध काय?' मी त्यांना विचारतों 'कोळसा व आगगाडीचे एंजिन चालणें यांचा संबंध काय?' कोळ-शानें अगर एंजिनानें गाडी चालते असें ज्या अर्थानें आपण म्हणतों त्याच अर्थानें खादीनें स्वराज्य मिळेल असें आम्ही म्हणतों. एंजिनाला नुसता कोळसा दाखविला कीं तें चालू होतें, असें केव्हांहि होत नाहीं. कोळसा पेटवावा लागतो, त्याची वाफ करावी लागते व त्या वाफेनें उत्पन्न झालेल्या शक्तीच्या योगानें एंजिनचीं चाकें फिरूं लागून गाडीला गति मिळते. हीच गोष्ट खादीची. इकडे चरख्याचें चाक फिरूं लागलें कीं, तिकडे यंत्रांतून स्वराज्य पडेलच, असें म्हणण्याइतका कोणी अजागळ असेल असें मला वाटत नाहीं. सुतानें स्वराज्य मिळेल, याचा अर्थच असा कीं, त्यायोगानें आज ज्याची मुख्य अडचण आहे तें सूत देशांत उत्पन्न होईल; हातमाग लक्षावधि आहेत, त्यांवर त्या सुताचें कापड काढतां येईल. लक्षावधि गोर-गरिबांना पोटाला मिळेल. निरनिराळ्या जातींत प्रेमभाव उत्पन्न होईल. ७०-८० कोटि रुपयांचें परदेशी कापड आपण विकत घेतों, तें कापड येथल्या येथेंच उत्पन्न होईल व तितकीच संपत्ति देशांत विभागली जाऊन

त्या मानानें लोकांची आर्थिक स्थिति सुधारेल व त्यांचें सामर्थ्य व दमदारपणा वाढेल; स्वावलंबनाची वृत्ति जनतेंत उत्पन्न होईल व दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून संसार करावयाचा ही संवय नाहींशी होईल. हें सर्व घडवून आणण्यासाठीं पुढाऱ्यांस फार मोठ्या प्रमाणावर प्रचार करावा लागेल, मोठी संघटना करावी लागेल व त्यायोगानें पुन्हां १९२१ प्रमाणें किंबहुना त्यापेक्षांहि फार मोठ्या प्रमाणावर देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जनतेंत जागृति होऊन देशांत प्रचंड सामर्थ्य उत्पन्न होईल व जगांत अशी कोणचीहि शक्ति असणार नाहीं कीं जी या सामर्थ्यापुढें टिकाव धरील.

**खादीकार्याचा व स्वराज्याचा असा संबंध आहे.** पण ही गोष्ट आपण केली पाहिजे. महायुद्धांत इंग्लिश लोकांचा दारूगोळा संपला त्यावेळीं देशांतील यच्चयावत् सर्व लोकांनीं मेहनत केली नसती तर, इंग्रज शिपायांच्या हातांतील बंदुका व आपल्या स्वयंपाकघरांतील फुंकण्या यांत फारसें अंतर राहिलें नसतें! पण इंग्रज लवकर जागे झाले. त्यांनीं कष्ट करून दारूगोळा बनविला; युद्धांत जय मिळविण्यास मदत झाली.

आज आपणांजवळ माग आहेत पण सूत नाहीं; बहुतेक सर्व गिरण्या विलायती अगर जपानी सूत वापरतात. या गिरण्यांत तयार झालेलें कापड जर स्वदेशी म्हणावयाचें तर मोटारी अगर इतर यंत्रें यांना कां स्वदेशी म्हणूं नये? कारण हीं यंत्रें सबंध विलायतेंतून इकडे येत नाहींत. त्यांचे वेगवेगळे भाग फक्त इकडे येऊन नंतर ते आपले लोक एकत्र जोडतात व त्या मोटारी शेटसावकार उडवितात. हीच स्थिति गिरण्यांचीं. यंत्रें विलायती, गिरण्यांतील भारी पगारवाले अधिकारी विलायती; सूत विलायती, फक्त येथें तें मागावर चढवून त्याचें कापड व्हावयाचें; थोडीबहुत मजुरी मात्र आपल्या लोकांच्या पदरीं पडणार व त्याबद्दल किंमत किती भयंकर द्यावी लागते? खेड्यांचा नाश, कौटुंबिक सुखाची हानि, नीतिमत्तेचें खोबरें, दारू, बाहेरख्यालीपणा, जुगार वगैरे कारणांमुळें शरीरसंपत्तीचे धिंडवडे ही या मजुरीच्या मोबदला द्यावी लागणारी किंमत! देशाचें कल्याण यानें कसें होणार? परदेशी कापडावरच्या बहिष्काराला यानें मदत कशी होणार? कीड लागलेला नासका समाज इंग्रजांसारख्या धटिंगणाविरुद्ध कसा टिकाव धरणार? मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. याचा खोल विचार केला म्हणजे अशी खात्री

वाटतें कीं, राष्ट्राला शुद्ध खादीशिवाय तरणोपाय नाहीं. ही वापरणें हांच एक उपाय आहे. या मार्गाचें अवलंबन केलें नाहीं तर गिरण्यांचें कापड वापरलें काय अगर परदेशी कापड वापरलें काय दोन्ही सारखींच. परदेशी कापड वापरण्यानें आमच्या देशबांधवांचें सर्वांगीण अधःपतन होण्यास मदत करण्याचें पाप तरी आपल्या हातून होत नाहीं. —(जामनेर–१९२६.)

---

## — टाळ व टाळ्या —

मी आपणांला शहाणपण शिकविण्यासाठीं येथें आलों नाहीं. येथील खादीकार्याची माहिती मिळविणें व तिचा माझ्या प्रांतांत उपयोग करून घेणें हा माझा येथें येण्याचा हेतु आहे. त्याबरोबरच खादी, धर्म, राजकारण वगैरे विषयांवरील माझे विचार आपणांस कळविणें, हाहि माझा हेतु आहे. परंतु मी आपल्या पदरचें असें कांहींच तुम्हांला सांगणार नाहीं. **महात्मा गांधी** यांच्यासारख्या थोर विभूतीनें आपल्या देशाच्या कल्याणासाठीं दिलेला संदेश मी आपणांस कळविणार आहें. मी एक म. **गांधींचा** फोनोग्राफच आहे असें समजा. हा फोनोग्राफ आज आपणांपुढें खादीचें गायन गाणार आहे. तें गायन श्रवण करून त्यांतील सार आपण लक्षांत ठेवावें व त्याप्रमाणें आचरण करावें, अशी माझी आपणांस विनंति आहे.

धर्म, राजकारण, नीति व व्यवहार वगैरे गोष्टींचा एकमेकांशीं संबंध नाहीं असें आपली संस्कृति आपणांस सांगत नाहीं, ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. '**पुराणांतलीं वांगीं पुराणांत**' हें तत्त्व आपल्या धर्मास मुळींच संमत नाहीं. आपण मात्र या तत्त्वाप्रमाणें सध्यां वागत आहोंत. जपजाप्य करावें, टिळाटोपींत निमग्न असावें, भजन करितांना टाळांचा व वादनांचा आणि ऐकतांना टाळ्यांचा कीस पाडावा. लो. **टिळक** व म. **गांधी** यांचे नांवानें जोरानें जयजयकार करावा; पण प्रत्यक्ष कृति करण्याची वेळ आली कीं, एकेकानें हळुहळू पाय मागें काढावा, अशी आपली स्थिति झाली आहे.

सन १९२१–२२ मध्यें आपण हेंच केलें. 'एका वर्षांत स्वराज्य देतों' असें म. गांधी म्हणतांच आपण हुरळलों; आनंदानें नाचूं लागलों; पण स्वराज्य मिळविण्यासाठीं सर्व राष्ट्राला कष्ट केले पाहिजेत, ही गोष्ट आपण विसरलों. प्रत्यक्ष कार्य करण्याची वेळ येतांच मागें सरलों. एक वर्ष पुरें होण्याच्या आंतच आपणांपैकीं कित्येकांनीं दिलेलीं वचनें मोडलीं व समरांगणावरून हळुहळू पाऊल काढून घेतलें. अशानें जय कसा मिळणार? ईश्वर प्रसन्न कसा होणार? गोष्ट अशक्य आहे.

ईश्वराच्या घरीं न्याय आहे. तो न्याय अत्यंत काटेतोल आहे. त्याच्या येथें भेदभाव नाहीं. हा हिंदु, हा मुसलमान, हा इंग्रज, हा रशियन हा भेदभाव त्याच्याजवळ नाहीं. ज्यांची जशी तपश्चर्या, ज्यांची जशी चिकाटी त्याप्रमाणें तो त्यांस फळ देतो. तो नुसत्या दंभानें फसून जात नाहीं. दंभ करणारा मात्र खड्ड्यांत पडतो हें आपण विसरतों. 'दया धरमका मूल है' या तत्त्वाचें आम्हांला विस्मरण झालें. इंग्रजांनीं स्वार्थबुद्धीनें सुरू केलेल्या शिक्षणानें आमची दिशाभूल झाली. ईश्वरावरील श्रद्धा उडाली. मनें भ्रष्ट झालीं. यामुळें आपलें केवढें भयंकर नुकसान झालें याची कल्पना आपणांस नाहीं. एक वेळ द्रव्य गेलें तरी चालेल, आपण भिकारी बनलों तरी चालेल, वैभव नाहींसें झालें तरी चालेल, पण मनाचें ऐश्वर्य नाहींसें होणें आपणांस केव्हांहि परवडणार नाहीं. आज आपलें मानसिक अधःपतन फार झपाट्यानें झालें आहे व होत आहे. आपला आपण उद्धार करावा, हें तत्त्व आपण विसरलों आहोंत. म. गांधींसारख्या जगद्वंद्य विभूतीनें दाखविलेला स्वावलंबनाचा व स्वाभिमानाचा मार्ग आपल्यापैकीं अनेक शहाणे म्हणविणाऱ्या लोकांनीं झिडकारून देशाचें अपरंपार नुकसान केलें आहे. या गोष्टीची जाणीव आपणांस लवकरच झाली पाहिजे. आपण वेळींच सावध झालें पाहिजे. खादीकार्य ही अशी एक गोष्ट आहे कीं, जी आपणांस स्वावलंबी करील, आपणांत आत्मविश्वास उत्पन्न करील, आपली संघटना होईल, व श्रीमंत व गरीब, सज्ञान व अज्ञान यांमध्यें प्रेमाचा व जिव्हाळ्याचा संबंध उत्पन्न होईल. सर्व वर्णांचे गुरु म्हणवून घेण्यांत अभिमान बाळगणाऱ्या ब्राह्मणांनीं जर या कार्यांत लक्ष घालून देशांतील असंख्य गोरगरिबांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या कामांत मदत केली

तर माझी खात्री आहे कीं, अजूनहि ब्राह्मणब्राह्मणेतरांत उत्पन्न झालेली तेढ बंद होण्यास फार मदत होईल. '**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः**' हा जगाचा सनातन सिद्धांत आहे. ब्राह्मणांची पूर्वापार साधी रहाणी व उच्च विचारसरणी ही परंपरा आहे. ती ते सोडत चाललेले आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. त्यांचें वर्तन पाहून इतरहि तसेंच करूं लागले आहेत. हें वेळींच समजून त्याप्रमाणें जर वर्तन सुधारलें नाहीं तर सर्व राष्ट्राचें त्यांत अपरिमित नुकसान आहे.

**इंग्रज आपणांला कांहींएक आपण होऊन देणार नाहींत.** परमेश्वराची कृपा आपण संपादन केली पाहिजे. सद्गुणसंपन्न अशा लायक मनुष्यावरच परमेश्वराची कृपा होते. चोर, दरवडेखोर, भामटे वगैरे लोकांनीं राज्यें स्थापून तीं टिकविल्याचीं इतिहासांत उदाहरणें नाहींत. चळवळ दैवी संपत्तीच्या पायावर उभारली असल्याखेरीज जय नाहीं. जेथें **योगेश्वर कृष्ण व धनुर्धर पार्थ** तेथेंच जय असणार, हें निदान आपण हिंदुधर्माभिमानी लोकांनीं तरी विसरून चालणार नाहीं. अर्थात् ज्या खादीच्या योगानें राष्ट्रांतील दैवी संपत्तीचें रक्षण होतें, जिच्या योगानें खेडींपाडीं मोडून न जातां तीं कायम टिकण्यास मदत होईल, जिच्या मुळें आपल्या लक्षावधि देशबांधवांच्या कौटुंबिक सौख्याचें खोबरें होण्याचें थांबेल, त्या शुद्ध खादीची आपण कांस धरली पाहिजे. तरच आपणांवर परमेश्वराची कृपा होऊन इहपरलोकीं आपलें कल्याण होईल.

—( जळगांव—१३-९-१९२६.)

---

## — गांधी व वॉशिंग्टन —

**स्वराज्याच्या देवघेवीचा प्रश्न नुसत्या ठरावांनीं, भाषणांनीं अगर इतर कोणत्याहि परावलंबी मार्गांनीं सुटणार नाहीं.** या सिद्धांताला इतिहासाचा भरभक्कम आधार आहे. **अमेरिकेला** आपण हा प्रश्न विचारा. ती हेंच उत्तर आपणांला देईल. महायुद्धांत आपण **इंग्लंडला** पाण्यासारखा

पैसा दिला, अपरंपार रक्त सांडलें; इच्छा हीच कीं, स्वराज्य पदरांत पडावें. तीच स्थिति **अमेरिकेची** झाली. **वॉशिंग्टननें** फ्रान्सबरोबर झालेल्या युद्धांत मायदेशाला साहाय्य केलें. बक्षिस काय मिळालें ? स्टॅंप ॲक्ट ! **टिळकगांधींनीं** महायुद्धांत रिक्रूटभरतीबद्दल मदत करण्याचें कार्य केलें. रौलेट ॲक्ट व जालियनवाला बागेचें बक्षिस मिळालें ! **वॉशिंग्टनला** युद्ध पुकारावें लागलें. तें युद्ध सशस्त्र होतें. म. **गांधींनीं**हि नोकरशाहीशीं युद्ध पुकारलें; पण तें निःशस्त्र होतें. सर्व राष्ट्र कॉंग्रेसच्या निशाणाभोंवतीं जमा होईल हें स्वतः **महात्मा गांधी** पूर्णपणें जाणून आहेत आणि **वॉशिंग्टन**प्रमाणेंच त्यांची आपल्या मार्गाच्या बिनचूकपणाबद्दल व अंतिम यशाबद्दल बालंबाल खात्री आहे. **वॉशिंग्टनचें** युद्धक्षेत्र मर्यादित होतें; त्या मानानें **महात्माजींचें** फारच विशाल व अडचणींनीं परिपूर्ण असें आहे ही गोष्ट खरी आहे. असें असूनहि त्यांची कार्यावरील निष्ठा अढळ आहे व यांतच त्यांचा मोठेपणा व अलौकिकत्व आहे.

**दुसरें पवित्र कर्तव्य** राष्ट्रांत जोम व आर्थिक सामर्थ्य उत्पन्न होण्यासाठीं परदेशी कापडाचा बहिष्कार घडवून आणणें हें होय. आपलें राष्ट्र आजारी पडलेलें आहे. अनेक कुपथ्यें केल्याचा हा परिणाम आहे. असहकारितेची संजीवनीमात्रा मिळाल्याकारणानें १९२१ मध्यें हा रोगी आतां उठून चांगला खडखडीत बरा होऊन स्वतःचा प्रपंच स्वतः करूं लागेल अशी आशा वाटूं लागली होती. पण बुद्धिभेदाचें पुन्हां कुपथ्य झालें, रोग उलटला, नाडी मंद वाहूं लागली, काळीज थांबतें कीं काय अशी भीति वाटूं लागली. कानपुरास अनेक वैद्य जमले, त्यांनीं औषधयोजना केली. नाडीचे ठोके चांगले पडूं लागून काळीजहि चांगलें ठणठणीत होण्याचा संभव दिसूं लागला आहे; पण एवढ्यानें भागत नाहीं. कांहींतरी शक्तिवर्धक औषध हें घेतलेंच पाहिजे. म. **गांधी** या धन्वंतऱ्यानें अगोदरच त्याची योजना करून ठेविली आहे. खादी हें तें पौष्टिक व आयुर्बलवर्धक औषध होय. यानें राष्ट्रपुरुषाच्या शरीरांत रक्त उत्पन्न होईल, स्नायु बळकट होतील व मग नोकरशाहीशीं झुंज करून स्वराज्याचा झेंडा उभारण्याची ताकद राष्ट्रांत उत्पन्न होईल. —( संगमनेर–३-९-२६. )

# — चंद्रभागेच्या वाळवंटावर —

मकरसंक्रांतीच्या सणाचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. संक्रांत या शब्दाचे अनेक अर्थ होऊं शकतील. क्रांति म्हणजे बदल. संक्रांति म्हणजे 'अनेकांनीं एक जुटीनें घडवून आणलेला बदल' असाहि या शब्दाचा अर्थ होऊं शकेल.

सुमारें २० वर्षांपूर्वी लोकमान्य टिळक पंढरपुरला गेले होते. चंद्रभागेच्या वाळवंटावर वारकऱ्यांच्या प्रचंड समुदायापुढें त्याचें व्याख्यान झालें. त्या व्याख्यानांत आपल्या आयुष्यांत एक प्रकारची क्रांति घडवून आणण्याचा त्यांनीं श्रोतृसमुदायास उपदेश केला. ती क्रांति म्हणजे स्वदेशीची क्रांति.

आपण आज हरएक बाबतींत परतंत्र आहोंत; आपणांस स्वतंत्र व्हावयाचें आहे. आचारक्रांति घडून येण्यापूर्वी नेहमीं दुसरी एक महत्त्वाची क्रांति घडून यावी लागते. ती क्रांति म्हणजे विचारांची क्रांति होय. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, आपल्यांत जरूर त्या प्रमाणांत अजूनपर्यंत विचारांची क्रांति झालेली नाहीं. या क्रांतीला प्रथम विष्णुशास्त्र्यांनीं सुरुवात केली. लोकमान्यांनीं या क्रांतीच्या बाबतींत महत्त्वाचें कार्य बजावलें. म. गांधी त्याहि पुढें जाऊन आज प्रत्यक्ष आचारक्रांतीचा उपदेश करीत आहेत.

सन १९०७-८ च्या चळवळींत लोकमान्यांनीं जनतेपुढें, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चतुःसूत्री ठेविली. 'तुमचीं मनें पूर्णपणें स्वदेशी बनल्याशिवाय स्वराज्य मिळणें कठीण' असा त्यांचा लोकांना उपदेश होता. 'परकीय राज्य व तदंगभूत परकीय आचारविचार व संस्था यांना तुम्ही भाळून कसें जातां, या गोष्टीची तुम्हांस अजून चीड कशी येत नाहीं' असा त्यांचा जनतेस नेहमींचा सवाल असे. आज याच भावनेची आपणांस अत्यंत आवश्यकता आहे.

आपल्याभोंवतीं नजर फेंका. आपल्या मनाला प्रश्न करा कीं 'हे मना! तुला खरोखरच स्वराज्य हवें आहे काय?' आपलें मन जर प्रामाणिक असेल तर तें आपल्याला असें उत्तर देईल कीं, 'बाबारे! स्वराज्याच्या ह्या

तुमच्या गप्पा फुकट आहेत. तुला स्वराज्याबद्दल अजून तळमळ लागली नाहीं. तुझ्या आचरणावरून ही गोष्ट सिद्ध होत आहे. ध्यानीं, मनीं जागृतींत, स्वप्नांत अगर सुषुप्तावस्थेंत तुला स्वराज्य दिसल्याखेरीज त्याची प्राप्ति होणें कठीण.'

**संक्रांतीचा संदेश हाच आहे.** प्रत्येकानें **तुकाराममहाराजांच्या** उक्तीप्रमाणें मनाला अंकुशाची टोंचणी चालू ठेविली पाहिजे. त्याखेरीज जागृति नाहीं व जागृति नसेल तर क्रान्ति कशी होणार? विचार करा, आज आपल्या देशांत तेहतीस कोटि लोकांची वसति आहे. धर्मदृष्टीनें पाहतां हे आपले बांधव आहेत. ह्यांची स्थिति काय आहे? त्यांना पुरेसें अन्न मिळतें का? ते चिंध्या पांघरतात कां चांगल्या वस्त्रांनीं आपला देह झांकतात याची आपणांपैकीं किती लोकांनीं चौकशी केली आहे? मोठमोठ्या लोकांचें असें म्हणणें आहे व त्यांनीं ती गोष्ट सरकारी आंकड्यांनींच सिद्ध केली आहे कीं, आपल्या देशांत आज कोट्यवधि लोक असे आहेत कीं, ज्यांस पुरेसें अन्न मिळत नाहीं व जे नेहमीं चिंध्या पांघरून हिंडत असतात. अशा स्थितींत आपणांस अन्न गोड लागणें अगर सुखानें झोंप येणें ही गोष्ट योग्य आहे काय?

**देशांत वेळेवर पुरेसा पाऊस पडत नाहीं अशी आपण ओरड करितों.** तो कसा पडेल? ह्या बाबतींत आपला धर्म आपणांस काय सांगतो? **गीता** असें सांगते कीं, निरनिराळे वर्ण आपआपलीं कामें योग्य वेळीं करीत असले तरच त्यांच्या हातून यज्ञ घडतो, यज्ञ घडला तर देव संतुष्ट होतात व देवांच्या संतोषावर वेळच्या वेळीं पाऊस पडणें अगर न पडणें व पृथ्वी धनधान्यादिकांनीं समृद्ध होणें अगर न होणें ही गोष्ट अवलंबून असते. आपण स्वतःस हिंदु म्हणवितां. आपला या गोष्टीवर विश्वास आहे काय? आहे अशी मी आशा करितों.

पुष्कळांस असें वाटतें कीं, देशांत आचारक्रान्तीची काय जरूरी आहे? मी विद्वान् आहें, मी बलवान् आहें, मीं धनवान आहें, मी श्रीमान् आहें, मला काय कमी आहे? मीं माझ्या आचारांत बदल कां करावा? अशा सज्जनांस मला एवढेंच विचारावयाचें आहे कीं, 'महाराज! आपण या देशांत एकटे नाहींत. तेहतीस कोटि देशबांधवांपैकीं आपण एक आहांत. स्वतः आपण श्रीमंत असाल, परंतु आपल्या तेहतीस कोटि बंधुभगिनींत जर

आपल्या संपत्तीची विभागणी केली तर आपल्या वांट्यास कांय येईल? असंख्य नवकोटनारायण ज्याच्या दरबारांतील कानाकोंपऱ्यांत पडलेले असतात अशा कुबेराच्याहि संपत्तीची वांटणी केली तर त्याच्या वांट्याला पुरेसा अंश येईल किंवा नाहीं यांची वानवा. आपली काय कथा?' तात्पर्य, **लोकमान्यांस साक्षी** ठेवून आपण पुढील गोष्टी लक्षांत ठेवूं या——

( १ ) आपला देश परतंत्र आहे, तो स्वतंत्र झाला पाहिजे.

( २ ) आपल्या देशांत असंख्य देशबांधव पुरेशा अन्नवस्त्राच्या अभावीं कुजत पडलेले आहेत, त्यांना जरूर तें अन्नवस्त्र मिळालें पाहिजे.

( ३ ) स्वराज्य व देशबांधवांची सुस्थिति या गोष्टी होण्यास आपल्या विचारांत क्रांति होणें जरूर आहे. कारण विचारांत क्रांति झाल्याखेरीज आचारांत क्रांति होणें अशक्य.

वरील तिन्ही गोष्टी लक्षांत ठेवून आपण आजच्या मुहूर्तावर आपल्या विचारांत व आचारांत क्रांति घडून आणण्याचा निश्चय करूं या; व हें लक्षांत ठेवूं या कीं, जोंपर्यंत देश स्वतंत्र नाहीं व लोक सुखी नाहींत तोंपर्यंत आपणांपैकीं कोणासहि—मग तो राजा असो वा रंक असो—ऐष-आराम व चैन करण्याचा अधिकार नाहीं. लो. **टिळक** व म. **गांधी** यांसारख्या महापुरुषांच्या उपदेशाला लाथाडून जर आपण खाणें, पिणें व कपडेलत्ते यांचे बाबतींत उधळपट्टी केली तर त्याबद्दलचा जाब आपणांस परमेश्वराचे दरबारीं एक दिवस द्यावा लागेलच लागेल.

**आपल्या देशांत सत्तर कोटि रुपयांचा कपडा दरसाल येतो.** एकेकाळीं आपण हें कापड देशांतल्या देशांत उत्पन्न करीत होतों. खेडीं-पाडीं सुस्थितींत होतीं; लोक खाऊनपिऊन सुखी होते; कारण हा सर्व पैसा देशांतल्या देशांत रहात असे. आज सर्व कारभार ह्याच्या उलट चाल-लेला आहे व या गोष्टीला आपणच जबाबदार आहोंत. आपण अशी प्रतिज्ञा करूं कीं, आजपासून एक पैदेखील आम्हीं परदेशी कापडांत खर्च करणार नाहीं. नेहमीं शुद्ध, सोळा आणे स्वदेशी, म्हणजेच गोरगरिबांनीं काढलेल्या हातसुताची व हातविणीची खादीच वापरूं. म. **गांधींच्या** उपदेशानुसार **सन १९२०** सालीं 'मी खादीच वापरीन, व शक्य तितके कमी कपडे घालीन' अशी मीं प्रतिज्ञा केली व पाळली.

येरवड्याचा तुरुंग फार तर हजार दोन हजार कैद्यांना कोंडून ठेवितो. परंतु आज नोकरशाहीनें अठराशें मैल लांब, व पंधराशें मैल रुंद अशा या देशाचा एक मोठा तुरुंग बनविला आहे. आपण तेहतीस कोटि लोक हे या बड्या तुरुंगांतील कैदी आहोंत, ही गोष्ट आपण केव्हांहि विसरतां कामा नये. या गोष्टीची जाणीव माझ्या मनाला नेहमीं असावीं म्हणून मी कैद्याचा पोषाख घालीत असतों; कारण जोंपर्यंत देशाला स्वराज्य मिळालें नाहीं तोंपर्यंत मी एक कैदीच आहें, असें माझें मन मला रात्रंदिवस टोंचीत असतें. सरते शेवटीं आपल्या विचारांत व आचारांत क्रान्ति घडून आणण्याची वेळ आज आली आहे, असें आपणांस **लोकमान्यांच्या** तसबिरीसमोर, पुनः पुनः बजावून मी आपली रजा घेतों. वंदे मातरम्।

—( पुणें लष्कर–१५।१।२७. )

---

## — कैसरबादशहा! दारूगोळा पाठवा!! —

**एक पाय तुरुंगांत व एक बाहेर** अशा स्थितींतहि निष्कामबुद्धीनें व निर्विकार चेहऱ्यानें मित्रकार्य व देशकार्य करीत रहाणारे **लोकमान्यांसारखे** महापुरुष शेंदीडशें वर्षांतून एखाद्या देशांत एखादे वेळेसच जन्माला येतात. समुद्र शांत असतांना नौकाप्रवास करण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं. पण दर्या खवळला आहे, पर्वताएवढ्या लाटा उसळताहेत, विजांचा कडकडाट चालू आहे, आसपास दीपगृहाचा प्रकाश मार्ग दाखविण्यासाठीं नाहीं; अशा स्थितींत खडक टाळून दर्यापार होणारा खलाशीच मानमान्यता पावतो. **लोकमान्य** या कोटींतले होते.

**इंग्रजांना लोकमान्यांनीं पुरें ओळखिलें होतें.** साहेब येथें आला आहे तो हिंदुस्थानावर उपकार करण्यासाठीं आला नाहीं, याची विस्मृति त्यांना मरेपर्यंत झाली नाहीं. नोकरशाहीचे डावपेंच त्यांनीं उत्तम रीतीनें ओळखले होते. ज्याप्रमाणें गुरांनीं आपआपलीं कामें चांगलीं करावीं म्हणून मालक त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था बरी ठेवतो, त्याप्रमाणेंच हिंदी प्रजा

जेमतेम जिवंत राहील एवढ्याचपुरती नोकरशाही आपली काळजी घेते. कलेक्टराचा पगार ३–४ हजार व कारकुनाचा पगार ३०–४० रुपये यांतील मर्मच हें आहे. हें तत्त्व **लोकमान्यांनीं** आपणांस शिकविलें.

राष्ट्रीय सभा ही जोंपर्यंत वादविवादोत्तेजक सभेपलीकडे जाऊं शकत नाहीं तोंपर्यंत राजकारणाच्या दृष्टीनें तिला किंमत नाहीं. म्हणूनच सन १९०८ सालीं वंगभंगाच्या निमित्तानें **लोकमान्यांनीं** राष्ट्रीय चतुः-सूत्रीचा पुकारा केला. स्वराज्याचें ध्येय ठरवून स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय म्हणजे राष्ट्राचें राष्ट्रीय बाण्याचें शिक्षण या साधनांचा स्वावलंबनाच्या तत्त्वावर अधिष्ठित होऊन अंगिकार केल्याशिवाय राष्ट्राचा तरणोपाय नाहीं, हा त्यांचा महामंत्र होता. **लोकांत त्राण राहिलें नाहीं,** जो तो दुष्काळांतून ओढून काढल्याप्रमाणें दिसतो, देशांतील कोट्यवधि लोक अर्धपोटीं आहेत, एकट्या १९१८ सालांत नुसत्या इन्फ्ल्युएंझाच्या सांथीनें साठ लक्ष लोकांचे बळी घेतले, इतके लोक महायुद्धांतहि मेले नाहींत, वगैरे गोष्टी **लोकमान्यांच्या** अंतःकरणास सारख्या लागून राहिल्या होत्या.

दुर्दैव देशाचें कीं, **लोकमान्यां**सारख्या विभूतीच्या कष्टाचें चीज त्यांच्या हयातींत झालें नाहीं. आपण जन्मभर वणवण फिरून व कंठशोष करूनहि लोकांचे डोळे उघडत नाहींत, असें पाहून **समर्थ** व **तुकारामबोवा** एक-मेकांच्या गळ्यांत गळा घालून ढळढळां रडले त्यांतलाच **टिळकगांधींचा** प्रकार. आपण अजून शहाणे होत नाहीं. आपल्या मौजा व चैनी खुशाल बेफिकीरपणें चालल्या आहेत. शत्रूची मगरमिठी दिवसानुदिवस देशाच्या गळ्याभोंवतीं घट्ट बसत चालली आहे, याची दादहि आपणांस नाहीं. अशानें गति कशी होणार? आजच देशांत बेकारी बेसुमार वाढत चालली आहे. पुढच्या पिढ्यांची काय अवस्था होणार तें एक परमेश्वरालाच माहीत!

**देशांतील सुशिक्षितांवर लोकमान्यांचा भरंवसा.** त्यांनीं वेळींच जागें व्हावें म्हणून जन्मभर त्यांनीं हाडांचीं काडें केलीं. आजहि **महात्मा गांधी** तेंच करीत आहेत. 'दुसऱ्यांवर अवलंबून राहूं नका' हा त्यांचा उपदेश. आणि त्यासाठीं त्यांनीं स्वदेशीचा देशांतील आबालवृद्धांना उपदेश केला; कारण स्वदेशी माल–विशेषतः स्वदेशी कापड–वापरणें ही गोष्ट अत्यंत सुलभ

आहे. त्यासाठीं तुरुंगांत जावें लागत नाहीं अगर फांसावर चढावें लागत नाहीं. मनाचा घडा मात्र केला पाहिजे.

**लोकमान्य व्यवहार फारच उत्तम रीतीनें** जाणत, व अनुभवानें शहाणे होत. आजच्या परिस्थितींत त्यांनीं खादीच्या चळवळीला भरभक्कम पाठिंबा दिला असता. खादीचे तागे खांद्यावर घेऊन ते घरोघर हिंडले असते. तुरुं-गांतून आल्यावर अशा रीतीनें स्वदेशीचा प्रसार करण्याचा आपला इरादा आहे, असें त्यांनीं एका खाजगी सभेंत बोलूनहि दाखविलें होतें.

गिरण्यांचे साह्याय्यानें परदेशी कापडाचा व्यापार मारूं पहाणें म्हणजे महा-युद्धांत दारूचा तुटवडा पडला असतां **लॉर्ड किचनेर**साहेबांनीं '**कैसर-बादशहा**, आमचा दारूगोळा संपला आहे; तुमचा पराभव करण्यासाठीं दारू-गोळा पाठवून द्या' असा **जर्मनीच्या** बादशहाला विनंतिअर्ज करण्या-सारखेंच आहे! कारण **मँचेस्टरची** चम्मन चालावी म्हणून तर हिंदुस्थानचें राज्य इंग्रज नोकरशाही करीत आहे. **मँचेस्टरचे** भांडवलवाले हे नोकरशाहीचे मालक आहेत. मालकाला ठार करण्याला नोकरशाही कधीं तरी मदत करील काय? गिरण्यांची उन्नति अगर अवनति करणें ही गोष्ट सर्वस्वीं नोकर-शाहीच्या हातीं आहे. केवळ कागदी घोडे नाचवून कायद्यानें गिरण्यांची व गिरणीवाल्यांची गळचेपी करणें हा नोकरशाहीच्या तळहातचा मळ आहे. गेल्या चाळीस वर्षांचा इतिहास हीच गोष्ट सिद्ध करीत आहे. अशा स्थितींत खादीची–सोळा आणे स्वदेशीची–**लोकमान्यांनीं** कालत्रयींहि उपेक्षा केली नसती.

आपणांस माझी शेवटची विनंति हीच आहे कीं, **लोकमान्यांची** भक्ति क्रियेंत आणण्याची इच्छा असल्यास खादी वापरा. आपण कोणीहि असा– वकील, डॉक्टर, व्यापारी, सरकारी अगर खाजगी नोकर कोणीहि असा– खादी वापरायला आपणांपैकीं कोणालाच हरकत नाहीं. पांढरी खादी वापरण्याची सरकारी नोकरांस भीति वाटत असेल, तर त्यांनीं रंगीत खादी वापरावी. ईश्वर तुम्हांस सद्बुद्धि देवो.

—( **वडगांव**–२०।७।१९२७. )

# पावनखिंड व गायकवाडवाडा

आजचा योग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. बाजीप्रभु व लोकमान्य या दोन महापुरुषांच्या पुण्यतिथींच्या निमित्तानें आज प्राचीन व अर्वाचीन कालांचा संयोग झालेला आहे. आत्यंतिक स्वार्थत्यागाचीं हीं दोन ठळक उदाहरणें आहेत. ज्याप्रमाणें जेवणखाण वगैरे गोष्टी एकदां करूनहि पुनः पुनः कराव्या लागतात, त्याप्रमाणें अशा राष्ट्रपुरुषांचा उत्सव व जयंत्या आपली स्फूर्ति कायम ठेवण्यासाठीं पुनः पुनः साजऱ्या करणें आवश्यक असतें.

बाजीप्रभु प्रथम परकीयांच्या नोकरींत होते. परदेशीयांच्या गुलामगिरीचा त्यांना तिटकारा आला व त्यांनीं पारतंत्र्याची शृंखला ताडकन तोडून टाकून शिवाजीमहाराजांचे पाय धरले. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे त्यांनीं परकीय सरकारशीं असहकारिता पुकारली. लोकमान्यांनींहि जन्मभर हीच गोष्ट केली. परकीयांच्या पुढें तोंड वेंगाडून कांहींहि लभ्यांश व्हावयाचा नाहीं, ही गोष्ट ते प्रथमपासून जाणून होते. त्यांनीं सन १९०८ सालीं वंगभंगाच्या निमित्तानें स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रीचा पुकारा केला, या गोष्टीच्या मुळाशीं हीच भावना होती. राष्ट्रें स्वतंत्र होतात तीं एका दोघांच्या खटपटीनें होत नाहींत. सर्व जनतेकडून कमीअधिक प्रमाणांत कार्य व्हावें लागतें. हीच गोष्ट लक्षांत बाळगून लोकमान्यांनीं बहुजनसमाजाला स्वदेशी व बहिष्कार यांचा मंत्र दिला. फ्रान्स, जर्मनी, रशिया, इंग्लंड आदिकरून राष्ट्रांचे इतिहास हीच गोष्ट सिद्ध करितात. महायुद्धांत आबालवृद्ध सर्वांनीं आपआपल्या देशांतील पुढाऱ्यांस यथाशक्ति साहाय्य केलें. श्रीकृष्णांनीं गोवर्धनपर्वत उचलून धरिला त्यावेळींहि सर्व बाळगोपाळांनीं आपआपल्या काठ्यांनीं त्यास टेंकू दिला होता.

सर्वच लोक देशाकरितां फांसावर चढूं शकत नाहींत, अगर तुरुंगवासादि हालअपेष्टा सहन करूं शकत नाहींत. हें भाग्य लाभणें थोड्याशा निवडक वीरांच्याच कपाळीं लिहिलेलें असतें; परंतु पुढारी लोकांनीं अशा कांहीं गोष्टी राखून ठेवलेल्या असतात कीं, ज्यांत सरसकट सर्वसामान्य जन-

तेसहि भाग घेतां येतो. स्वदेशी, बहिष्कार वगैरे व्रतांचें पालन सर्रहा सर्वांना करतां येईल, असा लोकमान्यांचा उपदेश होता.

म. गांधीहि आज तीच गोष्ट लोकांना सांगत आहेत. म. गांधी हे आजचे लोकमान्य टिळक आहेत व म्हणूनच सर्वांनीं आजच्या पर्वणीच्या दिवशीं स्वदेशीचें शुद्ध स्वदेशीचें–सोळा आणे स्वदेशीचें–म्हणजेच खादीचें व्रत घेऊन देशांतल्या पुढाऱ्यांस स्वराज्यप्राप्तीचे कामीं मदत करावी.

लोकमान्यांची दृष्टि संकुचित केव्हांहि नव्हती. देशाचा खरा शत्रु कोण आहे हें ते उत्कृष्टपणें जाणून होते. मुसलमानांशीं त्यांनीं लखनौ येथें करार केला त्याच्या मुळाशीं हीच गोष्ट होती. 'परकीयांखेरीज कोणाहि हिंदवासियांचें येथें राज्य झालें तरी तें मला चालेल. पण परकीयांचें नको,' असें ते नेहमीं म्हणत.

आज देशांत हिंदुमुसलमान, ब्राह्मणब्राह्मणेतर वगैरेंत जातिविशिष्ट तंटे चालू आहेत. मोठमोठे मी मी म्हणविणारे पुढारीहि यामुळें गोंधळून गेले आहेत. लोकमान्य कधींहि गोंधळून जात नसत. त्यांची दृष्टि नेहमीं समाधानी असे. केवळ विशिष्ट जातीचीच सुधारणा व्हावी, अगर संघटना व्हावी अशी त्यांची भावना केव्हांहि नसे. त्यांची दृष्टि नेहमीं राष्ट्रीय असून अत्यंत व्यापक असे. शिवाय परकीय सरकाचे डावपेंच त्यांनीं पक्के ओळखले होते. या डावपेंचांच्या पचनीं ते कधींहि पडले नाहींत.

मनुष्य स्वतःच्या घराला आग लागूं लागली म्हणजे जागा होऊं लागतो; कारण परदुःख नेहमीं शीतळ असतें. आजपर्यंत मुंबईसारख्या बकाली शहरांतून गिरण्यांत काम करणाऱ्या आपल्याच लोकांच्या आयाबहिणींवर कित्येक विषयांध बनलेल्या लोकांकडून अत्याचार झाले आहेत. पण ती गोष्ट आमच्यांतील कांहींच्या गांवींहि नव्हती. पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणानें आपणांकडे गिरण्यांसारख्या कारखान्यांची वाढ झाली तर त्याचे देशांतील बहुजनसमाजाच्या नीतिमत्तेवर भयंकर परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाहींत; आपण गिरणीच्या कापडाला उत्तेजन देऊं नका, अशी इशारत या लोकांस दिली गेली तरी तिकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें; कारण आग यांच्या घरापर्यंत येऊन पोहोंचली नव्हती. पण जेव्हां कां खुद्द स्वजातींतील सन्मान्य अशा कुटुंबांतील बालिकांवर अत्याचार होऊं लागले

तेव्हां ही मंडळी जागी झाली व जिकडे तिकडे 'धर्म बुडाला हो धर्म बुडाला' असा टाहो सुरूं झाला. मुळशी धरणामुळें वाताहात होऊन रानोमाळ भटकणाऱ्या बिचाऱ्या मावळ्यांच्या असहाय बायकांवर आजपर्यंत अनेक पठाण जातीच्या अगर अन्य जातींच्या नराधमांकडून जेव्हां भयंकर अत्याचार झाले अगर आजहि होत आहेत—तेव्हां जणूं काय धर्म अगदीं शाबूत होता. त्या वेळीं जसा कांहीं धर्माला यत्किंचितहि धक्का लागलेला नव्हता. **लोकमान्यांची** ही वृत्ति नव्हती. स्त्रियांसंबंधीं अत्याचार होणें ही गोष्ट केव्हांहि शोचनीय आहे. ती स्त्री मग कोणत्याहि जातीची असो. प्रत्येकानें खादीच वापरणें ही गोष्ट असे अत्याचार टाळण्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे, असें जें आम्ही आजपर्यंत अनेकदां म्हणत आलों आहों तें याच दृष्टीनें. **लोकमान्य** आज हयात असते तर त्यांनींहि याच सोळा आणे स्वदेशीचा पुरस्कार करून खादीची चळवळ आसेतुहिमाचलापर्यंत पसरविण्यास म. **गांधींस** मदत केली असती. कारण त्यांना आसुरी संपत्तीपेक्षां दैवी संपत्तीचें महत्त्व नेहमीं जास्त वाटत असे.

आज देशापुढें प्रश्न असा आहे कीं, तुम्हांला आसुरी संपत्ति श्रेष्ठ वाटते कीं दैवी संपत्ति श्रेष्ठ वाटते? गिरण्या, कारखाने वगैरेंनीं कदाचित् ऐहिक संपत्तींत भर पडत आहे असा भ्रम वाटत असेल; परंतु इकडे दैवी संपत्तीला जोराची ओहोटी लागलेली आहे त्याची वाट काय? आज हा प्रकार देशांत प्रत्यक्ष मोठ्या प्रमाणावर चालू आहे हें जो कोणी डोळे उघडे ठेवून पाहील त्याच्या लक्षांत आल्यावांचून केव्हांहि रहाणार नाहीं. पाणंदीकरांच्या मालिनीनें गुलाबखानाशीं विवाह करितांच दैवी संपत्तीला, म्हणजेच धर्माला, जबर धक्का बसला, अशी हाकाटी करणाऱ्या धर्मवीरांना माझा असा सरळ सवाल आहे कीं, 'महाराज, गिरण्या वगैरेंनींहि असाच जबर धक्का धर्माला बसलेला नाहीं का? तो तुम्हांला कसा पाहवतो? कोणत्याहि गिरणींतील अधिकाऱ्यांकडे जा व त्याला त्याच्या आईबापांची शपथ घालून असा प्रश्न विचारा कीं, 'बाबारे, तुझ्या गिरणींत काम करणारे किती मजूर व किती स्त्रिया दारू, जुगार, बाहेरख्याली वगैरे प्राणघातक व्यसनांपासून मुक्त आहेत?' जर तो मनुष्य प्रामाणिक असेल व आई-बापांच्या अब्रूची त्याला थोडी चाड असेल तर 'फारच थोडीं माणसें'

असें त्याला रोखठोक उत्तर द्यावें लागेल. हा धर्मावर जबरदस्त आघात नाहीं का? यानें धर्म शाबूत राहील असें तुम्हांला प्रामाणिकपणानें वाटतें कां? जर या योगानें धर्माची जबरदस्त हानि होत असेल तर तुमच्यानें– ' धर्म गेला, धांवाहो धांवा, धर्म बुडाला! ' अशी सांप्रत हाकाटी करणारांच्यानें–अशा पापमय कंगालखान्यांत तयार होणाऱ्या जवळजवळ आठ आणे तरी विदेशी कापडाचा स्वीकार कसा करवतो? ”

**लोकमान्य प्रामाणिक होते.** त्यांना काळीज होतें. त्यांना देशांतील त्यांच्या आयाबाहिणींच्या अब्रूची–मग ती कोणच्याहि जातीची कां असेना–चाड होती. कोणीकडे **पंजाब** अगर **यू.पी. प्रांत** व कोणीकडे **महाराष्ट्र**! पण त्या बाजूच्या सती वीरनवालीसारख्या एका अबलेवर अत्याचार झाल्याचें ऐकतांच त्यांच्या अंगाचा भडका उडाला. रात्रभर त्या महापुरुषाला झोंप आली नाहीं; अन्न गोड लागलें नाहीं; संतापानें त्यांचें डोकें भणाणून गेलें; घागरीवर घागरी पाणी त्यांच्या डोक्यावर ओतलें, तेव्हां त्या महाभागाचें मस्तक थोडेसें शांत झालें. अशा विभूतीचे आपण स्वतः अनुयायी म्हणवतों. अर्थात् नुसता '**टिळकमहाराजकी जय**' असा ओरडा करून अगर त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं व्याख्यानें देऊन अगर ऐकून त्यांचें अनुयायित्व सिद्ध होणें यापुढें शक्य नाहीं. खेड्यापाड्यांतील आपल्या आयाबहिणींची अब्रू त्यांना जिवापलीकडे प्रिय होती. ती अब्रू ज्याचे योगानें बांचण्यास मदत होते त्या खादीच्या प्रसाराला स्वतः खादी वापरून मदत करण्यानेंच त्यांच्या अनुयायित्वाला आपण पात्र होऊं. इतर अनेक गोष्टी केल्या पाहिजेत. पण ज्यांना त्या करण्याइतकी धमक नसेल त्यांनीं निदान एवढी साधी गोष्ट तरी कमींत कमी राष्ट्रीय व धार्मिक कर्तव्य म्हणून केली पाहिजे.

दोन वर्षांपूर्वी **सार्वजनिक काकांच्या** पुण्यतिथीच्या दिवशीं झालेल्या माझ्या भाषणांत मीं असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, प्रत्येकानें–विशेषतः, प्रत्येक जाणत्या सुशिक्षित माणसानें–खादीच वापरली पाहिजे. खादी न वापरतां त्यानें गिरणीचें अर्धेमुर्धे विदेशी कापड वापरणें किंवा पुरें विलायती कापड वापरणें या दोन्हीहि गोष्टी माझ्या दृष्टीनें सारख्याच आहेत. माझें आजहि हेंच मत आहे. इतकेंच नव्हे, तर तें जास्त दृढ झालेलें आहे. कारण गिर-

ण्यांच्या योगानें नानाप्रकारच्या व्यसनांचा फैलाव होऊन कुलक्षय होतो, ही गोष्ट त्रिवार सत्य आहे आणि म्हणूनच—

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्मास्सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कुत्स्नमधर्मोऽभिवत्युत ॥
अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।
स्त्रीपु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥
संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ॥

या श्रीव्यास महर्षींनीं गीतेंत अर्जुनाच्या तोंडीं घातलेल्या त्रिकालाबाधित सत्य सांगणाऱ्या वचनावर ज्यांची दृढ श्रद्धा आहे, त्यांनीं तरी आज कोणत्याहि रीतीनें गिरण्या वगैरेंनीं पसरणाऱ्या अधर्माला मदत करतां कामा नये. हिंदुधर्माचा मोठेपणा व सामर्थ्य केवळ संख्येवर अवलंबून नाहीं. हिंदुधर्मांतील प्रत्येक मनुष्य—विशेषतः सुशिक्षित मनुष्य—मनानें व आचरणानें हिंदु असला तरच हिंदुधर्म टिकेल व त्याची छाप सर्व जगावर पडेल.

शेवटीं माझी आपणाला व धर्माची चाड बाळगणाऱ्या देशांतील पुढाऱ्यांना एवढी हात जोडून विनंति आहे कीं, आपण सर्वांनीं हिंदु समाजाची—राष्ट्रीय दृष्टीला हानि पोहोंचूं न देतां—अवश्य संघटना करावी. परधर्मांत गेलेल्यांना त्यांची खुषी असेल तर शुद्ध करून घ्यावें. अस्पृश्यतेचें निवारण करावें व त्याबरोबरच खादी वापरून गोरगरिबांच्या पोटापाण्याचा व अन्नाचा प्रश्न सोडविण्यास मदत करावी; तरच आपणां सर्वांस पौर्वात्य संस्कृतीसाठीं जिवंत मरण पत्करणाऱ्या लोकमान्यांचे व सद्धर्मपालक शिवरायांसाठीं पंचप्राणांची आहुति देणाऱ्या बाजीप्रभू देशपांड्यांचे खरेखुरे वंशज व अनुयायी म्हणवून घेण्याचा हक्क प्राप्त होईल. वंदे मातरम् ।

—( चिंचवड–१५-७-२७. )

REFBK-0004354

ग्रंथ संग्रहालय ठाणे
6354

# — टिळकगांधी ऐक्य —

( चाल—हा खेळ काय करिसी? सांग, यदुराया! )

दिनरजनिं ध्यानिं ठेवा । टिळकगांधिसेवा ॥ ध्रु० ॥

उपासनेची पाठि जयाला । चळचळ कांपे विघ्न तयाला ।
तत्त्व चिरंतन, अढळपदाला । मिळवुं नमूं देवा ॥ १ ॥

उग्रतपाविण स्वर्ग दिसेना । परावलंबन दूर जाइना ।
स्वमायभूमि मुक्त होईना । ध्यानिं तत्त्व ठेवा ॥ २ ॥

अजातशत्रू धर्म, राम, नल । जनककचादि असुनी कोमल ।
वनवासादिकं वरुनि धरातल । तोषविती देवां ॥ ३ ॥

टिळकद्विजाचा बाणा निशिदिनिं । संकटस्थानीं दंड थोपटुनि ।
पाय रोंवणें छाती ठोकुनि । गांधि दुजा पहावा ॥ ४ ॥

‘ भिक्षां देहि ’ त्यागिलि टिळकें । शत्रु थरारे त्याच्या धाकें ।
गांधि महात्मा कधिं नच वांके । भेद कसा पहावा ॥ ५ ॥

महात्मा गांधी दुजा टिळक तो । सत्त्वापासुनि कधिं नच ढळतो ।
आत्मबलानें अजिंक्य होतो । सत्य मनिं ठेवा ॥ ६ ॥

टिळकानुज श्रीमहात्मा गांधी । दूर कराया जनपदव्याधी ।
उपदेशीतो रहाणी साधी । स्वराज्यसौख्यठेवा ॥ ७ ॥

धडाडिमूर्ति टिळकप्रभूच । आम्हां ठाउकी एकलि हीच ।
गांधीजींमधिं प्रगटे तीच । न्याय जनीं पहावा ॥ ८ ॥

हीच विनंति जना एकुटी । गांधी नेता, भजा शेवटीं ।
अंतर नेदी दीन, धाकुटीं । राम, राम घ्यावा ॥ ९ ॥

---

वंदे मातरम्

# — आत्मनिवेदन —

'दरिद्रनारायणाचे चरणीं' या पुस्तकांत जाहीर केल्याप्रमाणें ता. १।७।३१ ला 'स्वावलंबी ग्रामसंघटना' हें पुस्तक अनेक अडचणींमुळें प्रसिद्ध करितां आलें नाहीं. आज ता. १५ आगस्ट १९३१ या दिवशीं '**चंद्रभागेच्या वाळवंटावर**' या व इतर कांहीं निबंधांसह '**स्वावलंबी ग्रामसंघटना**' हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. येत्या आठवड्यांतच '**एकादशी-संघटनेची राष्ट्रीय पद्यमाला**' हें पुस्तकहि प्रसिद्ध होईल. या सर्व पुस्तकांचा उद्देश मी हातीं घेतलेल्या '**स्वावलंबी ग्रामसंघटने**'च्या कार्यासाठीं प्रारंभीं लागणाऱ्या बुडीत खर्चाचा प्रश्न प्रामुख्यानें स्वावलंबनाच्या तत्त्वावर सोडविणें हा आहे. हीं पुस्तकें व यानंतर दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या इतर पुस्तकांस आश्रय देऊन ग्रामसंघटनेच्या कार्यास देशबंधुभागिनी हातभार लावतील अशी खात्री आहे.

या महिन्यापासून नियोजित कार्याला प्रारंभ होईल. वृत्तपत्रांतून उमेदवार व देशसेवकांची मागणी केली. अनेकांनीं या कार्याला आजन्म वाहून घेण्याची तयारी दाखविली आहे हें सुचिन्ह होय. बहुतेक **भीमथडी** अगर **इंदापूर** या तालुक्यांतील एक गांव नियोजित करून तेथें कार्याला प्रारंभ करण्याचा संकल्प केला आहे; कारण त्या तालुक्यांत कपाशी पिकते. अर्थात् वस्त्रस्वावलंबनाची मूलभूत कल्पना धरून करावयाचें कार्य कपाशीच्या मुलखांतच प्रारंभापासून करणें जास्त फायद्याचें वाटल्यावरून हा बेत कायम केलेला आहे.

खादीकार्याबरोबरच साक्षरताप्रसार, आरोग्यरक्षण, व्यायामशिक्षण, सार्वत्रिक जागृति वगैरे कामें हातीं घेतलीं जातील.

देशसेवाश्रम, ३४१ सदाशिव, पुणें शहर. ता. १५।८।३१.

गजानन नारायण कानिटकर,
देशसेवक.